CMYK

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, १ फेब्रुवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ८५ | पाने १२ | किंमत रु. ६/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com





### आज श्री गणेश जयंती



## महत्त्वाचे

### अर्थसंकल्पापूर्वी बाजार चमकला

**मुंबई** : अर्थसंकल्पापूर्वी शुक्रवारी शेअर बाजारात प्रचंड तेजी दिसून आली. निर्देशांक, निफ्टी प्रत्येकी एक टक्क्याहून अधिक वाढीसह बंद झाले. सलग चौथ्या दिवशी शेअर बाजार तेजीसह बंद झाले. निफ्टी २५८ अंकांनी वाढून २३,५०८ वर बंद झाला तर निर्देशांक ७४० अंकांनी वाढून ७७,५०० वर बंद झाला. निर्देशांकातील ३० पैकी २४ शेअर्स वाढीसह बंद झाले तर निफ्टीतील ५० पैकी ४४ कंपन्यांचे शेअर्स तेजीत राहिले. दिवसभरातील कारभारात लार्सन अँण्ड टूब्रोचे शेअर्स सर्वाधिक ४ टक्क्यांनी वाढले तर आयटीसी हॉटेल्सचे शेअर्स सर्वाधिक घसरले होते.



### सोन्याने प्रथमच ओलांडला ८२ हजारांचा टप्पा

**मुंबई** : सर्वसाधारण अर्थसंकल्प सादर होण्याच्या एक दिवस आधी सोन्याने आतापर्यंतचा उच्चांक गाठला. इंडिया बुलियन अँण्ड ज्वेलर्स असोसिएशननुसार, २४ कॅरेट सोन्याचा १० ग्रॅमचा भाव ८६२ रुपयांनी वाढून ८२,१६५ रुपये झाला आहे. गुरुवारी १० ग्रॅम (एक तोळा) सोन्याचा भाव ८१,३०३ रुपये होता. त्याचबरोबर शुक्रवारी दरातही वाढ झाली आहे. चांदी ९९३ रुपयांनी वाढून ९३,१७७ रुपये किलो झाली आहे. यापूर्वी चांदीची किंमत ९२,१८४ रुपये प्रति किलो होती. २३ ऑक्टोबर २०२४ रोजी चांदीने आपला सार्वकालिक उच्चांक गाठला. त्यानंतर ती ९९,१५१ रुपये प्रतिकिलोपर्यंत पोहोचली होती.

### ओलाच्या तिसऱ्या पिढीतील ई-स्कूटर लॉन्च

**नवी दिल्ली** : ओला इलेक्ट्रिक स्कूटरने त्यांच्या इलेक्ट्रिक स्कूटरची एस १ मालिका अपडेट केली आहे. यामध्ये कंपनीने भारतीय बाजारात २ थर्ड जनरेशन इलेक्ट्रिक स्कूटर लॉन्च केली आहे. यामध्ये एस१एक्स आणि एस१ प्रो मॉडेल्सचा समावेश आहे.

### राज्यात सात दिवसांत नवे वाळू धोरण

**अमरावती** : सरकारने महसूल विभागाचे नुकसान टाळण्यासाठी नवे वाळू धोरण तयार केले आहे. ते येत्या सात दिवसांत राज्यभरात लागू होईल. डेपो पॅटर्न आम्ही बंद करणार आहोत. दगडांमधून रेतीची निर्मिती केली जाईल. कालच आम्ही नवे वाळू धोरण तयार केले आहे, अशी माहिती महसूल मंत्री तथा अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. अमरावतीत पालकमंत्री म्हणून शुक्रवारी दिलेल्या भेटीदरम्यान त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, नवीन वाळू धोरणात रेतीची चोरी होणार नाही. ज्या भागात रेती डेपो असेल तेथील ग्रामपंचायतीला रेती मिळेल. राज्य शासनाने शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी पांदण रस्त्यांबाबत नवे धोरण तयार केले आहे. रकारने महसूल विभागाचे नुकसान टाळण्यासाठी नवे वाळू धोरण तयार केले आहे. आता पांदण रस्त्यांसह ग्रामीण रस्त्यांना क्रमांक दिले जातील. शेतकऱ्यांना त्यांचा फायदा होईल. राज्यासह जिल्ह्याच्या विकासाकरिता आम्ही विरोधकांनाही सोबत घेऊन त्यांचे मत ऐकून घेणार आहोत. त्यांच्या समस्येचे समाधान झाले नाही तरच मग आंदोलन करावे. प्रहारचे नेते माजी आ. बच्चू कडू यांना आंदोलन करण्याची सवय आहे. त्यांच्या सूचना माझ्यापर्यंत आल्या तर मी सरकार म्हणून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करीन, असेही ते म्हणाले.

# तिसऱ्या महाशक्तीकडे आशादायक वाटचाल

## आर्थिक सर्वेक्षणातील निष्कर्ष उच्चाकांक्षी ● अर्थव्यवस्था मजबूत, महागाई कमी होण्याची शक्यता

◆ **नवी दिल्ली, ३१ जानेवारी**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी शुक्रवारी संसदेत आर्थिक सर्वेक्षण सादर केले. यात देश आर्थिक आघाडीवर मजबूत राहणार असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. २०४७ पर्यंत म्हणजेच देश स्वातंत्र्याच्या शंभर वर्षात भारताला तिसरी महासत्ता बनविण्याच्या दिशेने सध्याची वाटचाल आशादायक असल्याचे दिसून आले. १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत जीडीपी वाढ ६.३ ते ६.८ टक्के राहण्याचा अंदाज आहे. तिसरी आर्थिक महासत्ता होण्यासाठी देशाला ८ टक्के या गतीने आर्थिक विकास साध्य करावा लागणार आहे. एकूणच, आजच्या आर्थिक सर्वेक्षणातून देश मजबूत स्थितीत असल्याचे स्पष्ट झाले.

२०२४ च्या आर्थिक वर्षात किरकोळ महागाई ५.४ टक्के होती, जी एप्रिल-डिसेंबर २०२४ मध्ये ४.९ टक्के झाली. आर्थिक सर्वेक्षणातील निष्कर्ष गगनाला भिडणारे नसले, तरी उंच उडीच्या प्रतिक्षेत असणाऱ्या उच्चाकांक्षेचे प्रतीक मानले जात आहेत. आज सादर झालेल्या सर्वेक्षणात देशाचा विकास दर, महागाई, रोजगार, गुंतवणूक आणि इतर आर्थिक संकेतांचा आढावा घेण्यात आला. देशांतर्गत अर्थव्यवस्थेतील मजबुती कायम राहील आणि महागाई कमी झाली, असे यात नमूद आहे. ग्रामीण भागात मागणी वाढल्यामुळे वापरात सुधारणा होईल. यामुळे विकासाची गती वाढेल आणि ग्रामीण भागाची स्थिती सुधारेल, अशी आशाही यात व्यक्त करण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)






### आर्थिक सर्वेक्षण म्हणजे काय? त्याचे महत्त्व काय?

वाचा पान ३ वर

### डिसेंबरमध्ये महागाईचा दर चार महिन्यांच्या नीचांकावर

डिसेंबरमध्ये किरकोळ महागाई चार महिन्यांच्या नीचांकी पातळीवर राहिली. गेल्या महिन्यात महागाई ५.२२ टक्क्यांपर्यंत कमी झाली. यापूर्वी नोव्हेंबरमध्ये महागाई दर ५.४८ टक्के होता. तर चार महिन्यांपूर्वी ऑगस्टमध्ये महागाई ३.६५ टक्के होती.

### ठळक वैशिष्ट्ये

- २०२५-२०२६ मध्ये अर्थव्यवस्था ६.३ ते ६.८ टक्के दराने वाढण्याची अपेक्षा आहे. आर्थिक २०२४-२०२५ मध्ये किरकोळ महागाई ५.४ टक्के होती, जी एप्रिल-डिसेंबर २०२४ मध्ये ४.९ टक्क्यांपर्यंत घसरली.
- खराब हवामान, कमी उत्पादन आणि पुरवठा साखळीतील व्यत्यय यामुळे अन्नधान्यांमधील महागाई वाढली.
- २०२५-२०२६ या वर्षाच्या पहिल्या सहामाहीत चांगले रबी उत्पादन झाल्यामुळे अन्नधान्याच्या किमती नियंत्रणात राहू शकतात.
- २०२४-२०२५ या वर्षाच्या चौथ्या तिमाहीत महागाई कमी होण्याची शक्यता.
- गेल्या सात वर्षांत कामगार बाजारपेठेतील परिस्थिती सुधारली. आर्थिक वर्ष २४ मध्ये बेरोजगारीचा दर ३.२ टक्क्यांपर्यंत घसरला.
- गेल्या सहा वर्षांत ईपीएफओमधील निव्वळ वेतन दुप्पट झाले, जे संघटित क्षेत्रात रोजगाराचे चांगले लक्षण आहे.
- एआयमुळे होणाऱ्या बदलांचे प्रतिकूल परिणाम कमी करण्याची गरज.
- पायाभूत सुविधांच्या विकासात खाजगी सहभाग वाढवण्याची गरज.
- भारतीय अर्थव्यवस्थेला जागतिक पातळीवर अधिक स्पर्धात्मक होण्याची तसेच जागतिक बाजारपेठेत आपली उपस्थिती मजबूत करण्यासाठी व्यावसायिक धोरणांमध्ये आणि गुंतवणुकीत आणखी सुधारणा करण्याची आवश्यकता.

### सचिन तेंडुलकरला ‘जीवनगौरव’

◆ **मुंबई, ३१ जानेवारी**

संपूर्ण जगाला आपल्या फलंदाजीने क्रिकेटचे वेड लावणारा मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर याला शनिवारी येथे मंडळाच्या वार्षिक बैठकीत ‘बीसीसीआय जीवनगौरव पुरस्कार’ प्रदान केला जाणार आहे. तो या पुरस्काराचा ३१ वा मानकरी असेल.



१९९४ मध्ये भारतीय संघाचे पहिले कर्णधार कर्नल सी. के. नायडू यांच्या सन्मानार्थ हा पुरस्कार सुरू करण्यात आला. तेंडुलकरच्या नावावर क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक कसोटी व एकदिवसीय धावांचा विक्रम आहे.

**बुमराह, स्मृती मंधानाला सर्वोत्तम क्रिकेटपटूचा पुरस्कार**

तथापि, पुरुष गटात बीसीसीआयच्या पॉली उम्रीगर पुरस्कारासाठी धडाकेबाज वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहची निवड झाली, तर महिला गटात उत्कृष्ट फलंदाज म्हणून स्मृती मंधानाला बीसीसीआयचा सन्मान मिळाला. (वृत्तसंस्था)

# विकसित भारताच्या प्रवासाला मिळाली नवीन ऊर्जा : राष्ट्रपती

◆ **नवी दिल्ली, ३१ जानेवारी**

एक दशकाच्या माझ्या सरकारच्या कार्यकाळात विकसित भारताच्या प्रवासाला नवी ऊर्जा मिळाली. विकसित भारताच्या प्रवासात जनसहभागाचे सामूहिक सामर्थ्य हे देशाच्या आर्थिक विकासाचा पाया असल्याचे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केले.



संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आजपासून प्रारंभ झाला. संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला राष्ट्रपती मुर्मू संबोधित करीत होत्या. यावेळी व्यासपीठावर उपराष्ट्रपती जगदीप धनकड, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला उपस्थित होते.

नवीन संसदभवनातील लोकसभेच्या सभागृहात झालेल्या राष्ट्रपती मुर्मू यांच्या अभिभाषणाला पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथसिंह, भूपृष्ठ वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, गृहमंत्री अमित शाह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी यांच्यासह दोन्ही सभागृहातील सदस्य उपस्थित होते.

सरकारच्या अथक आणि नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे देशाची जगातील तिसऱ्या मोठ्या अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. विकसित भारताच्या उड्डाणाला संविधानातील आदर्शांचे सातत्याने मार्गदर्शन मिळावे म्हणून सरकार सेवा, समृद्धी, सुशासन आणि स्वाभिमानाला केंद्रबिंदू मानून काम करीत आहे. सरकार रिफॉर्म, परफॉर्म आणि ट्रान्सफॉर्मची संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी वेगाने काम करीत आहे. विकसित भारताचे आपले लक्ष्य गाठण्यासाठी सरकार सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्वास या मंत्रानुसार चालत आहे, असे राष्ट्रपती म्हणाल्या.

**२५ कोटी लोक गरिबीतून बाहेर आले**

सरकारच्या प्रयत्नानेच २५ कोटी लोक गरिबीरेषेच्या वर आले, याचा अभिमानाने उल्लेख करीत मुर्मू म्हणाल्या की, सरकारच्या कल्याणकारी योजनांचा सर्वाधिक फायदा दलित, वंचित आणि आदिवासींना मिळत आहे. राष्ट्रपती मुर्मू यांनी तासभराच्या भाषणात सरकारने विविध क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा तसेच कल्याणकारी योजनांचा आढावा घेतला. (तभा वृत्तसेवा)

### पूंछमध्ये चकमकीत तीन अतिरेक्यांचा खात्मा

**श्रीनगर** : जम्मू-काश्मीरमधील पूंछ येथे सुरक्षा दलाचे जवान आणि अतिरेक्यांमध्ये चकमक उडाली. यात सुरक्षा दलांनी तीन अतिरेक्यांचा खात्मा केला. गुरुवारी सायंकाळी अतिरेक्यांचा एक गट नियंत्रण रेषा ओलांडून भारतीय हद्दीत प्रवेश करण्याच्या प्रयत्नात असताना ही चकमक उडाली. सैन्यदलाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, पूंछमधील नियंत्रण रेषेवरील खरमल भागात तैनात असलेल्या लष्करी जवानांना सीमेपलीकडून हालचाल होत असल्याचे दिसले. घुसखोरीची शक्यता लक्षात येताच, जवानांनी जवळच्या सुरक्षा चौक्यांना सतर्क केले.

# अर्थसंकल्पाकडून मध्यमवर्गीयांना अपेक्षा

### मोदी यांच्या संकेतानंतर आशा पल्लवित

◆ **नवी दिल्ली, ३१ जानेवारी**

१८ व्या लोकसभेच्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात तिसऱ्यांदा सत्तेत आलेल्या भाजपाप्रणित रालोआ सरकारचा पहिला अर्थसंकल्प शनिवारी सादर केला जाणार आहे. पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या एका वक्तव्याने देशातील मध्यमवर्गीयांचे व करदात्यांचे कान टवकारले आहेत. त्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. कारण, मोदी यांनी मध्यमवर्गीय व करदात्यांना अर्थसंकल्पाद्वारे सूट मिळण्याचे संकेत दिले आहेत.

अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी संसदेत दाखल झालेल्या पंतप्रधान मोदी यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, मी लक्ष्मीमातेला नमस्कार करतो. आपल्या संस्कृतीत अशा प्रसंगी देवी लक्ष्मीचे स्मरण केले जाते, तिला नमन केले जाते. मी लक्ष्मीमातेकडे प्रार्थना करतो की, देशातील गरीब व मध्यमवर्गावर तिची कृपादृष्टी राहो. मोदींच्या या वक्तव्याचा कराशी संबंध जोडला जात आहे. आयकरात सूट मिळाल्यास मध्यमवर्गीय लोकांच्या खिशात अधिक पैसे राहतील.

**मध्यमवर्गीय आशेवर**

अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडल्या जाणाऱ्या अर्थसंकल्पात आयकराबाबत नव्या घोषणा होण्याची शक्यता असते. यंदाच्या अर्थसंकल्पात नोकरदार वर्गासाठी कोणत्या नव्या घोषणा होणार, आयकर कमी होणार किंवा वाढणार, याबाबत काय तरतूद केली जाईल, याची उत्सुकता पाहायला मिळत आहे. सध्या जुन्या व नवीन अशा दोन प्रणालींपैकी एका व्यवस्थेची निवड आयकर भरण्यासाठी नोकरदार वर्गाला करावी लागत आहे. यावेळी आयकराच्या स्लॅब्समध्ये मोठे बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मध्यमवर्गाला तशीच अपेक्षा आहे.

करपात्र उत्पन्नाची मर्यादा थेट ८ किंवा १० लाखांपर्यंत वाढवली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यातून नोकरदार वर्ग, मध्यमवर्गीय जनतेला मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

दुसऱ्या बाजूला आयकर भरणा करण्यासाठी २५ टक्क्यांची नवी श्रेणी प्रस्तावित केली जाऊ शकते. त्यात १५ ते २० लाखांच्या उत्पन्नावर २५ टक्के कर लागू होण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)


# तुळजापुरात घरगुती पाच-सहा सिलेंडरचे स्फोट

### नागरिकांची धावपळ; भीतीचे वातावरण

**तुळजापूर, दि.३१ जानेवारी-**

येथील क्रांती चौकातील जुनी हैदराबाद बँकेच्या पाठीमागे असणाऱ्या वस्तीत अचानक घरगुती सिलेंडरचा स्फोट होऊन भीषण आग लागली आग लागल्यानंतर पाच सहा सिलेंडरचा स्फोट झाल्याने

जुने बस स्थानक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात असणाऱ्या बाजारपेठेत असणाऱ्या गर्दीच्या ठिकाणी झालेल्या अचानक स्पोटामुळे नागरिकांची पळापळ धावपळ चालू झाली घटनास्थळी तात्काळ पोलिस आणि अग्निशामक गाडी आली. सिद्धी लॉजच्या बोळात अग्निशामक गाडी आग विझवण्यासाठी गेली असता नंतर दोन-तीन सिलेंडरचा स्फोट झाल्यामुळे पोलिसांनी जमा झालेल्या नागरिकांना फागवण्यास सुरुवात केली. सुदैवाने कुठलीही जीवित हानी झाली नसल्याचे समजते पण त्या भागात हातगाडी वर व्यवसाय करणारे अनेक व्यावसायिक राहतात त्यामुळे स्फोट झाल्यानंतर देखील या ठिकाणी अधिक संख्येने गॅस सिलेंडर असल्याची शक्यता वर्तवली जात होती. घटनास्थळावर



बघ यांची गर्दी वाढल्यानंतर अग्निशामक दलाची केवल एक गाडी असल्याने आग आटोक्यात आणण्यामध्ये अडथळा निर्माण झाला होता. भीषण लागलेल्या आगीमध्ये अनेक घरे जळून खाक झाल्याचे निदर्शनास आले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस प्रशासनाने परिसर रिकामा करण्यास सुरुवात केली.

# प्रथमच राष्ट्रपती भवनात होणार शुभमंगल

## सीआरपीएफच्या असिस्टंट कमांडंट पूनम गुप्तांचे भाग्य उजळले ● मदर टेरेसा क्राऊन परिसरात दुमदुमणार सनईचे सूर

◆ **नवी दिल्ली, ३१ जानेवारी**

केंद्रीय राखीव पोलिस दल अर्थात् सीआरपीएफच्या असिस्टंट कमांडंट पदावर तैनात असणाऱ्या मध्यप्रदेशातील शिवपुरीच्या कन्या पूनम गुप्ता यांच्या विवाहाच्या सनईचे सूर थेट दिल्लीच्या राष्ट्रपती भवनात घुमणार आहेत. त्यांचा विवाह राष्ट्रपती भवन परिसरात होणार असून, पहिल्यांदाच या ठिकाणी एखादा लग्नसमारंभ होण्याचा योग जुळून आला आहे.

पूनम गुप्ता मागील काही कालावधीपासून राष्ट्रपती भवनात वैयक्तिक सुरक्षा अधिकारी पदावर कार्यरत असून, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या सुरक्षेत आहेत. जम्मू-काश्मिरात सेवा देत असलेले असिस्टंट कमांडंट अविनाश कुमार यांच्यासोबत पूनम यांची लगीनगाठ बांधली जाणार आहे. हा विवाह समारंभ १२ फेब्रुवारी रोजी होईल.



पूनम यांचे पिता शिवपुरीतील श्रीराम कॉलनीत वास्तव्यास आहेत. नवोदय विद्यालय मगरौनी येथे कार्यालय अधीक्षक पदावर कार्यरत आहेत.

पूनम यांचा सौम्य व्यवहार आणि मृदू स्वभाव तसेच कर्तव्यनिष्ठा या गुणांमुळे राष्ट्रपती मुर्मू अतिशय प्रभावित आहेत. जेव्हा त्यांना पूनम यांचे लग्न ठरल्याचे समजले, तेव्हा त्यांनी हा सोहळा राष्ट्रपती भवनातील मदर टेरेसा क्राऊन परिसरात करण्याचे ठरविले.

पूनम गुप्ता यांनी मागील वर्षी प्रजासत्ताक दिनी झालेल्या परेडमध्ये सीआरपीएफच्या महिला तुकडीचे नेतृत्व केले होते. त्यांनी पदवीचे शिक्षण घेत इंग्रजी साहित्यात पोस्ट ग्रॅज्युएट केले आहे. त्या जवाहर नवोदय विद्यालयाची विद्यार्थिनी होत्या. त्यांनी २०१८ मध्ये झालेल्या यूपीएससी परीक्षेत ८१ वी रँक मिळवून सीआरपीएफमध्ये असिस्टंट कमांडंट हे पद मिळविले.

दरम्यान, पहिल्यांदाच राष्ट्रपती भवनात अशा प्रकारचा लग्नसोहळा होणार असल्याने या विवाहासाठी विशेष सुरक्षा व्यवस्था असणार आहे. काही मोजकेच निमंत्रित या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. त्यात नातेवाईक आणि मित्र परिवार यांच्यातील मोजक्या लोकांना राष्ट्रपती भवनात उपस्थित राहण्यासाठी परवानगी दिली जाणार आहे. (वृत्तसंस्था)



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# तृतीयपंथीयांविषयी प्रत्येकांमध्ये आपुलकीची भावना हवी : शमीबा पाटील

### सोलापूर विद्यापीठात आंतरराष्ट्रीय तृतीयपंथीय परिषदेचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने महाराष्ट्रात प्रथमच तृतीयपंथीयांच्या समस्येवर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करून एका वेगळ्या विषयाला स्पर्श केले. त्यांच्या समस्येवर मंथन करण्याबरोबरच त्यांच्याविषयी एक आपुलकीची भावना दाखवत समाज जागृतीचे महत्त्वपूर्ण कार्य केले. याचा आदर्श राज्यातील इतर विद्यापीठांनी घेण्याबरोबरच माणूस म्हणून प्रत्येकानी तृतीयपंथीयांविषयी आपुलकीची भावना ठेवावी, असे आवाहन महाराष्ट्र तृतीयपंथीय कल्याणकारी मंडळाच्या सदस्या शमीबा पाटील यांनी केले.




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे संकुल आणि समाजसेवक ब्रिजमोहन फोफलीया यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात आयोजित दोन दिवसीय तृतीयपंथीयांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप शमीबा पाटील यांच्या प्रमुख उपस्थित झाला. यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर हे होते. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे, समाजसेवक ब्रिजमोहन फोफलीया, सामाजिकशास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे, कौशल्य विभागाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

शमीबा पाटील म्हणाल्या की, आज समाजात तृतीयपंथीयांविषयी दुजाभाव केला जातो. वास्तविक त्यांच्याकडे संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे. संघर्षमय जीवन जगताना त्यांच्या अनेक समस्या असतात. त्या सोडवण्याबरोबरच त्यांच्याविषयी प्रत्येकाच्या मनात आपुलकीची भावना निर्माण होणे आवश्यक आहे. तृतीयपंथी ऐवजी पारलिंगी हा शब्द वापरला पाहिजे. त्यांच्याविषयी गैरसमज व भेदभाव न करता माणुसकीची भावना ठेवून नेहमी मदत करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

कुलगुरू प्रा. महानवर म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे संकुल व ब्रिजमोहन फोफलीया यांच्या टीमने यशस्वीरित्या तृतीयपंथीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले. अभ्यासक व संशोधकांनी यात शोधनिबंध सादर केले. प्रत्यक्ष तृतीयपंथी देखील यात सहभागी झाले. भविष्यकाळात देखील विद्यापीठाकडून तृतीयपंथीयांसाठी सुविधा केंद्र, शिक्षणाची सोय आदी उपक्रम राबविण्यात येईल, असे ही त्यांनी यावेळी सागितले. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, समाजसेवक ब्रिजमोहन फोफलीया, डॉ. गौतम कांबळे, डॉ. प्रभाकर कोळेकर आदींनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे यांनी केले तर आभार डॉ. अंबादास भासके यांनी मानले

## संक्षिप्त वृत्त



### अणदूरच्या 'जवाहर'मध्ये निरोप समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ३१ जानेवारी-**

जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अणदूर येथे दहावी व बारावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव रामचंद्र आलुरे होते. यावेळी सेवानिवृत्त उपप्राचार्य मनोहर कबाडे, डॉ. अशोक चिंचोले, कल्याणी मुळे उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी यांनी केले. रूदाली सारणे, लक्ष्मी मुडके, समृध्दी अभिवंत, केतकी संगशेट्टी, प्रतिक्षा घोडके, समिक्षा मुळे, पल्लवी आडे, अमृता मुळे, रूपाली व्हंड्रे, श्रध्दा सावंत, श्रध्दा दुपारगुडे, शितल बनसोडे, नंदिनी कंटेकुरे, सानिका टिनवाले, लक्ष्मी नवगिरे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. प्रशांत भागवत, सिद्धेश्वर मसुते, माजी उपप्राचार्य मनोहर कबाडे यांनी मनोगत व्यक्त केले. आदर्श विद्यार्थी समृध्दी अभिवंत, भाग्यश्री घोडके यांचा सन्मानपत्र, शाल, पुष्पहार देऊन गौरविण्यात आले. यावेळी गुलाब सय्यद, किरण गायकवाड, कैलास बोंगरगे, लिंबाजी सुरवसे, जेष्ठ पत्रकार राजेंद्र स्वामी, कुरेशी उपस्थित होते. सूत्रसंचालन रोहित मोरे यांनी तर आभार मकरंद पाटील यांनी मानले.




### गणपती फार्मसीची न्यूलाईफ औषधनिर्माण कंपनीला भेट

**टेंभुर्णी, दि. ३१ जानेवारी-**

अकोले खु. (ता. माढा) येथील श्री गणपती फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने पिंपरी, पुणे येथील न्यूलाईफ फार्मास्युटिकल्स औषधनिर्माण कंपनीला बी. फार्मसीच्या विद्यार्थांनी भेट दिली. उत्पादन, गुणवत्ता निरसन, पॅकेजिंग आणि लेबलिंग, विपणन, कॅप्सुल फिलिंग मशीन, टॅबलेट पंचिंग मशीन स्ट्रिप पॅकेजिंग मशीन यामध्ये प्रोडक्शन, क्वालिटी, इन्स्पेक्शन आणि रिसर्च अँड डेव्हलपमेंट अशा विविध डिपार्टमेंटची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. कंपनीतील एंट्री आणि एक्झिट प्रोसिजर, गाउनिंग प्रोसिजर, सॅनिटेशन व हेल्थ हायजिन, प्रायमरी पॅकिंग, सेकंडरी पॅकिंग, रॉ मटेरियल स्टोरेज व प्रत्येक डिपार्टमेंटमध्ये येणाऱ्या अडचणी व त्यावर योग्य उपायावर मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे सचिव डॉ. आर. डी. बेंदगुडे, प्राचार्या डॉ. रूपाली बेंदगुडे, प्रा. नामदेव शिंदे, प्रा. शैलेश पेंडोर उपस्थित होते. प्रा. सोनाली तांबवे व प्रा. कल्याणी माने यांनी समन्वयक म्हणून कार्य केले.



### सुनंदा तेली, लक्ष्मी अचलेर यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि.३१ जानेवारी-**

अक्कलकोट येथील शहर वीरशैव महिला मंडळाच्या अध्यक्षपदी सुनंदा तेली, तर उपाध्यक्षपदी लक्ष्मी अचलेर यांची निवड करण्यात आली. यामुळे श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रा. शिवशरण अचलेर, विठ्ठल तेली, श्रीशैल गवंडी, विपुल जाधव, प्रसाद सोनार, खाजप्पा झंपले, संतोष जमगे, मनोज जाधव आदींसह भाविक भक्त उपस्थित होते.

### 'सहकार शिरोमणी'तर्फे मयताच्या वारसाला मदत

**पंढरपूर, दि.३१ जानेवारी-**

भाळवणी येथील सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे ऊस तोडणी मजूर रोहिदास किसन पवार यांचा अपघाती मृत्यू झाल्यामुळे त्यांच्या वारस पत्नी शीला रोहिदास पवार यांना तीन लाखांचा चेक कारखान्याचे व्हाईस चेअरमन भारत कोळेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी कारखान्याचे प्र. कार्यकारी संचालक पोपट घोगरे, डेप्यु.जनमॅनेजर, कैलास कदम, टेक्निकल जनरल मॅनेजर पी. टी. तुपे, व्ही.डी. आडत, बबन सोनवले, शेती अधिकारी पी. आर. थोरात, संतोष काळे आदी उपस्थित होते.

## निधन वृत्त...


### तुकाराम म्हेत्री



**अक्कलकोट, दि.३१ जानेवारी-**

तालुक्यातील चिक्केहळ्ळी येथील निवृत्त बसवाहक तुकाराम शेटेप्पा म्हेत्री (वय ७४) यांचे शुक्रवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. मराठा मंदिर श्री शहाजी प्रशालेतील सहशिक्षक ए. एस. कोरे यांचे ते सासरे होत.

### ईश्वर डोंबाळे



**अक्कलकोट, दि.३१ जानेवारी-**

आदित्य नगर येथील निवृत्त रेल्वे कर्मचारी ईश्वर मोहन डोंबाळे (वय-८०) यांचे वृद्धापकाळाने काळाने निधन झाले आहे, त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# भातंबरे येथे २०५ महिला, मुलींच्या आरोग्याची तपासणी



### एकता महिला मंच, साई होमिओपॅथी हॉस्पिटल वैराग यांच्यावतीने आरोग्य शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ३१ जानेवारी**

संत ज्ञानेश्वर विद्यालय भातंबरे येथे कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३व्या जयंतीनिमित्त महिला, मुली, माता-पालकांसाठी आरोग्य शिबीर, मार्गदर्शन मेळावा पार पडला. यावेळी २०५ जणांची तपासणी करण्यात आली. प्रारंभी महात्मा गांधी व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी डॉ. अशोक अनपट यांनी मार्गदर्शन केले.

अभिजीत गाटे म्हणाले, मुलींनी सोशल मीडियापासून दूर राहिले पाहिजे व आपल्या करिअरवर लक्ष करत आपल्या करिअर घडवून स्वतःचे उज्ज्वल्य भविष्य घडवावे. कोणत्याही मुलीला कोणत्याही प्रकारची अडचण असेल किंवा तक्रार असेल तर डायरेक्ट आमच्याशी संपर्क साधा. निर्भया पथक तुमच्या खंबीरपणे पाठीशी आहे. आरोग्य शिबिरामध्ये २०५ महिला व मुलींची तपासणी करण्यात आली. या शिबिरामध्ये महिलांची मासिक पाळी, बीपी, शुगर, थायरॉईड, संधिवात, आमवात, मधुमेह, हिमोग्लोबिन तसेच महिलांच्या व मुलींच्या विविध आजारावर आरोग्याची तपासणी करण्यात आली. डॉ. प्राचार्य अशोक अनपट, अभिजीत गाटे, निर्भया पथक बार्शी, हनुमंत खोकले पोलीस कॉन्स्टेबल, नीता गटकुळ महिला पोलीस, डॉ स्वप्नाली गंगावणे, डॉ. सपना मलमे, डॉ. वर्षा कुंभार, डॉ. कोमल जामदार, मुख्याध्यापक संजय मोरे, उद्योजक बालाजी पवार आदी उपस्थित होते. प्रास्ताविक संजय मोरे यांनी तर सूत्रसंचालन अरविंद माळकर यांनी केले.

# गावासाठी काम करुन नागरिक, सभासदांचा विश्वास सार्थ करा


### दिलीप माने; एकरुख मच्छ व्यवसाय संस्थेच्या नूतन संचालकांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

एकरुख मच्छ व्यवसाय संस्थेची निवडणूक बिनविरोध होणे अपेक्षित होते.मात्र संस्थेची निवडणूक लागली,मतदारांनी आपणास एकतर्फी कौल दिलेलाअसुन हा एकीचा विजय आहे.संस्था, ग्राम पंचायत, विकास सोसायटीच्या माध्यमातून गावच्या विकासासाठी व सर्वसामान्य नागरीकांना सहकार्य करण्यासाठी सदैव काम करा असे आवहान माजी आमदार दिलीपरावजी माने यांनी केले.

एकरुख (उत्तर सोलापूर) मच्छ व्यवसाय सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीत विजयी झालेल्या नुतन संचालक सत्कार वेळी बोलत होते. मच्छ व्यवसाय सहकारी संस्थेची निवडणूक बिनविरोध झाली असती परंतु आपल्या मधील काहींनी अंतर्गत विरोध केल्यामुळे निवडणूक प्रतिष्ठेची ठरली. सभासदांनी आपणावर एकतर्फी विश्वास दाखवला या विश्वासास पात्र राहून या संस्थेबरोबर ग्रामपंचायत, वि.का.स. सोसायटीचे माध्यमातुन सभासद,नागरीकांची कामे करा. विकासाचे कामास कसलीही अडचण येवू देणार नसल्याचे माने यांनी सांगीतले. यावेळी संस्थेचे नुतन संचालक मुझफ्फर जहागीरदार, तायप्पा उडाणशिवे, नवनाथ सोनवणे, हमीद पटेल, आखनाख जहागीरदार, वत्सलाबाई सोनवणे, नंदा उडाणशिवे, फय्याज जहागीदार, एजाज जहागीरदार, बळीराम सोनवणे, ईश्वर होळकर, मारुती भोरे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी सरपंच सिद्धू पारडे, उपसरपंच उमर जहागीदार, सदस्य मधु गुत्ती, श्याम उडाणशिवे, आप्पा उडाणशिवे, अजय सीताफळे, मुजफ्फर जहागीरदार, लहू भोरे, विकास सोसायटी चेअरमन मारुती गायकवाड, नागनाथ गूत्ती, मुबारक जहागीरदार, नवनाथ भोरे, हाजी काजी, ब्रह्मदेव गायकवाड, तात्या भोरे आदी उपस्थित होते.



### कन्नड मनावर राज्य करणारा

# मराठी मातीतला 'वरकवी' - डॉ. द. रा. बेंद्रे

**पातरगित्ती पक्का, नोडिदेन अक्का, हसरू हच्ची चुच्ची मेलक अरशिण हच्ची' या कन्नड काव्याच्या ओळी सहज ऐकताना माझ्या शालेय जीवनातील एक कविता आठवली, 'रंग रंगुल्या सान सानुल्या गवत फुला रे गवत फुला, असा कसा रे मला लागला सांग तुझा रे, तुझा लळा' या गाण्याचा आठवणीने बालपण हिंदकळून गेलं. या कन्नड काव्याचे कवी कोण असावेत ? असा प्रश्न मनाशी पडला. कन्नड शिकवणाऱ्या माझ्या एका मित्राला मी सहजच विचारलं या सुंदर कवितेचे कवी कोण आहेत? त्या मित्राने मोठ्या अभिमानाने सांगितलं की या काव्याचे कवी 'कर्नाटकचे वरकवी' म्हणून ज्यांना ओळखले जाते ते पद्मश्री डॉक्टर दत्तात्रेय रामचंद्र बेंद्रे. डॉ. बेंद्रे यांचे नाव ऐकताच अनेक स्मृती जाग्या झाल्या. मला आठवलं ते अजरामर कन्नड भावगीत 'नी हिंग नोडब्याड नन्ना, तिरीगी ना ह्यांग नोडले निंना' कन्नड जानपद विश्वामध्ये डॉ. बेंद्रे रचित आणि सि. अश्वत्थ यांनी गायलेलं या जानपदातील आर्तता जरी काव्याचा अर्थ कळला नसला तरी माझ्यासारख्या आकाशवाणी गुलबर्गा केंद्राच्या नियमित श्रोत्याच्या काळजापर्यंत पोहोचण्यास खूप वेळ लागला नाही.... कुतूहल वाढल, साहित्य क्षेत्रात वावरणाऱ्या अनेक मित्रांबरोबर चर्चा करताना डॉ. बेंद्रे आणि सोलापूर यांचं अतूट नातं कसं आहे हे बऱ्याच वेळा ऐकलं होतं, त्या सर्व स्मृती जाग्या झाल्या आणि मनाशी ठरवलं या महाकवीची संपूर्ण माहिती घ्यायचीच. म्हणून गुगल, युट्युब, विश्वकोश यांच्या मदतीने डॉ. द. रा. बेंद्रे यांची साहित्यसंपदा शोधण्याचा प्रयत्न सुरू केला. हा शोध घेताना अनेक प्रकारची माहिती मिळत गेली,.... एक मराठी माणूस आपल्या प्रतिभेच्या बळावर संपूर्ण कर्नाटक प्रांताच्या मनावर अधिराज्य करतो आणि 'वरकवी' हा किताब मिळवतोय या गोष्टींचा विलक्षण अभिमान वाटू लागला. दत्तात्रेय रामचंद्र बेंद्रे.. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते, प्रख्यात कन्नड कवी, यांचे मूळ घराणे महाराष्ट्रातील कोकण प्रांताचे, परंतु विविध कारणाने स्थलांतरित होत हा कुटुंब तासगाव, शिरहट्टी आणि शेवटी धारवाड येथे स्थायिक झाला.**

--------------------------------

डॉ. दत्तात्रेय रामचंद्र बेंद्रे यांचा जन्म ३१ जानेवारी १८९६ रोजी श्री. व सौ. अंबिका रामचंद्र बेंद्रे यांच्या पोटी झाला. डॉ. बेंद्रे यांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण धारवाड येथे झाले आणि पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातून त्यांनी बी.ए.पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. एक प्रतिभासंपन्न कवी त्यांच्या प्रतिभेला साक्षात सरस्वतीने वरदान दिले असावे अशा या महान कविचा साहित्य प्रवास जसा रसिकांना भुरळ पाडणारा तसाच त्यांचा जीवन प्रवास हा देखील हृदय हेलावून टाकणारा,थक्क करणारा असाच. प्रतिभेचं वरदान लाभलेला या कवीने स्वाभिमानाला थोडीशी मुरड घातली असती तर आयुष्याची परवड, अनिश्चितता, दैन्य या साऱ्या गोष्टी थांबवता आल्या असत्या, परंतु विवेकवादी आयुष्य अंगिकारणाऱ्या या महाकवीला स्वतःच्या स्वार्थासाठी तत्त्वांशी तडजोड करणं साफ नामंजूर होतं, बी. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना व्हिक्टोरिया हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून नोकरी मिळाली. याठिकाणी ते कार्यरत असताना त्यांच्या चिंतनशील कविमनाला देशाचे पारतंत्र्य पाहवत नव्हते, त्यादरम्यान देशात घडलेल्या जालियनवाला बागेतील भीषण हत्याकांडानं त्यांचं संवेदनशील मन हेलावून गेलं आणि त्यांच्या मनातील खदखद 'नरबली' या काव्यातून बाहेर पडलं.

**'नितिय भुतवे व्हरडू इलिंदा, दैव द्यववे नि व्हरडू,**
**करुळीना मरळे ओडू इलिंदा, न्याय राक्षसने नि ओडु,**
**बलगाल बुडदिंद बिडूगडे बिडीसलू, नरबळी ये बेकू,**
**कोळीय क्वयदरे क्यरळूवर उंटू, कुरियन क्वंदरे केळुवर उंटू,**
**कोणनं कडीदरू कायवरू उंटू,**
**गुब्बी मानवन क्वयदरू, क्वंदरू कडीदरु येनु?**
**क्वंदनू आतनु तन्नने तानु,**

स्वार्थ त्याग इदू आत्माहुती, नरबली नरमेधवू केळू, अश्व मेधकू सरिमेलू, इदुवे काळीय पूजवे शुद्धा, इदुके हुंबरू यंबरू युद्धा'.

अशा या ओजस्वी काव्यातील एक एक शब्द ब्रिटिश राजसत्तेच्या विरोधात चिड निर्माण करणारा होता. या महाकवीच्या उत्कट देशभक्तीचा त्रास ब्रिटिश सरकारला झाला नसता तरच नवल! शेवटी व्हायचं तेच झालं डॉ. द.रा.बेंद्रे यांना देशद्रोही ठरवून एका वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आणि या शिक्षेमुळे त्यांची नोकरी गेली. याशिवाय राज्य सत्तेविरुद्ध लिखाण केल्याची शिक्षा म्हणून त्यांना पुढील दहा वर्षे कोणत्याही सरकारी अथवा खाजगी शाळेत किंवा संस्थेत नोकरी मिळणार नाही अशी व्यवस्था केली गेली. आयुष्याच्या सुरुवातीला येणारी स्थिरता संपली होती. डॉ. बेंद्रे यांच्या अनेक हितचिंतकांनी त्यांना ब्रिटिश सरकारकडे माफीनामा लिहून शिक्षेतून स्वतःची सुटका करून घ्यावी, असा सल्ला दिला. परंतु त्यांनी अशा प्रकारच्या माफीनाम्यास साफ नकार दिला आणि येणाऱ्या प्रत्येक संकटांना सामोरे जाण्याचा निर्धार केला. त्यामुळे डॉ. बेंद्रे यांची रवानगी धारवाड येथील 'हिंडलगा' जेलमध्ये करण्यात आली. या एक वर्षाच्या शिक्षेच्या कालावधीत तीन महिने कारावास आणि नऊ महिने नजरकैदेत त्यांना ठेवण्यात आले . या संकटाचा देखील डॉ. बेंद्रे यांनी संधी मध्ये रूपांतर केले. या कालावधीत त्यांनी अनेक उत्तमोत्तम कवितांची निर्मिती केली. विविध विषयांवर लेखन केले. डॉ. बेंद्रे यांचे साहित्य म्हणजे अजरामर साहित्य, जीवनातल्या अनेकविध अनुभवांवर भाष्य करणार्या त्यांच्या कविता म्हणजे रसिकांसाठी मेजवानीच, त्यांच्या काव्यात अध्यात्म, निसर्ग , मानवीजीवन , विज्ञान , संख्याशास्त्र , देशाभिमान ,महापुरुषांप्रति असणारी श्रद्धा, कौटुंबिक नाते संबंधातील हळुवारपणा, भावनिक गुंता , विविध संकटांना सामोरे जाण्याची धैर्यशील वृत्ती, धर्माच्या नावाखाली माजवले जाणारे अवडंबर अशा अनेकविध गोष्टींची अनुभूती येते. 'नाद बेकु, नाद बेकु, नादान नाद बेकु, ना -दान आदमेले ब्यारे वादा याक बेकु, वळगिन देवर साकु बेकु, व्हरगिन देवर याक बेकू....' अशा रचनेतून अंतरीच्या परमात्म्याला जागा करण्यासाठी मी पणाचा त्याग केला पाहिजे हे त्यांनी ना-दान करण्याचा सल्ला दिला. यामध्ये ना म्हणजे ' मी' हा मी पणा आपण सोडला तर आपल्या अंतरातला परमात्मा भेटतो अशी भावना त्यांनी व्यक्त केली. त्यांची ही रचना ऐकताना' 'तीर्थी धोंडा पाणी, संत रोकडा सज्जनी' या तुकोबांच्या ओळींची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. धर्म शास्त्राचा अवडंबर माजवून लोकांना उपदेशाचे डोस पाजणारे पंडित व्यक्तिगत जीवनात त्यांच्याच उपदेशाच्या विपरीत कसे वागतात हे त्यांनी 'करी मरी नाई ' या त्यांच्या काव्यातून व्यक्त केले आहे.

**'करी मरी नाई कुई गुडतितू,**
**भट्टर बाई वट गुडतितू'**

अश्या शब्दात पावसात भिजणाऱ्या कुत्र्याच्या पिल्लाचे जिवाच्या आकांताने ओरडणे त्या भटाच्या कानी जाते, परंतु त्या लहानग्या जीवाला वाचवण्याची दयाबुद्धी त्यांच्या मनात निर्माण होत नाही, उलट त्या पिलाला हाकलून देतात आणि दरवाजा बंद करतात, असे निर्दयी वागणाऱ्या भटांच्या तोंडी प्रवचनातील 'भूतदयेची' भाषा किती तकलादू असते याचा विचार करण्यास ते प्रवृत्त करतात.

आपल्याच देशातील जनता यांच्यात निर्माण झालेले जातिभेद, वर्णभेद, वंशभेद , धर्मभेद ,पक्षभेद यामुळे देशाची होणारी हानी, लोकांमध्ये निर्माण झालेला स्वार्थ, त्यातून होणारी मूल्यांची घसरण या सगळ्या गोष्टींने दुःखी झालेली 'भारतमाता'. तिचा उद्वेग - 'मक्कळ इवरे नम्म, मक्कळ इवरे नम्म मुवत्तू मुरू कोटी ना हडीद, मुवत्तू मुरू कोटी'

या काव्यातून ३३ कोटी जनसंख्याची माता भारतमाता आपली लेकरे कशी विभागली गेली याचे दुःख मांडते, ही कल्पना रेखाटताना डॉ. बेंद्रे यांनी तत्कालीन समाज व्यवस्थेचे जिवंत चित्र आपल्यासमोर उभे केल्याचा प्रत्यय तर येतोच सोबतच विद्यमान परिस्थिती यापेक्षा काही वेगळी नाही याचेच प्रत्यंतर येते.

डॉ. बेंद्रे यांचे आयुष्य म्हणजे 'एक धागा सुखाचा शंभर धागे दुःखाचे' या पंक्तीप्रमाणे होते. सोलापुरातील सेवानिवृत्तीनंतर पुढे काय हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा होता, त्याचे उत्तर मात्र त्यांच्याकडे नव्हते. अशा वेळी डॉ. व्ही. के. गोकाक यांच्या प्रयत्नाने डॉ. बेंद्रे यांना 'धारवाड आकाशवाणी केंद्रात' कार्यक्रम सल्लागार समिती सदस्य म्हणून दहा वर्षासाठी नोकरी मिळाली आणि पुढे काय या प्रश्नाचे उत्तर देखील मिळाले. धारवाडच्या आकाशवाणी केंद्रात काम करताना डॉ. बेंद्रे यांच्या सहवासात अनेक मान्यवर मंडळी आली. डॉ. बेंद्रे यांचे व्यक्तिमत्व अनेकांना कसे वाटले, याचे देखील अनेक किस्से मोठ्या अभिमानाने सांगितले जातात.

मास्ती व्यंकटेश अय्यंगार यांच्या 'जीवन पत्रिका' या पत्रिकेची संपादकीय जबाबदारी देखील डॉ. बेंद्रे यांनी पाच वर्षे यशस्वीरीत्या सांभाळली. या पत्रिकेत मिळालेली ही जबाबदारी त्यांच्या अस्थिर आयुष्याला आधार देणारी ठरली, असा विनम्र उल्लेख डॉ. बेंद्रे यांनी त्यांच्या एका लेखामध्ये केला आहे. या लेखातून मास्ती व्यंकटेश अय्यंगार यांच्याप्रती त्यांच्या मनामध्ये असलेली कृतज्ञतेची भावना व्यक्त होते. महाराष्ट्रातील कवींचे जसे 'रविकिरण मंडळ' होते, तसे डॉ. बेंद्रे यांनी 'ग्यळीयर गुंपू' नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेमध्ये डॉ. व्ही. के. गोकाक, श्री. मुगळी, श्रीधर खानोलकर, शं. बा. जोशी इत्यादी नामवंत कानडी साहित्यिक सहभागी होते. 'मानवी भावभावनांबरोबरच धर्म, भाषा, संस्कृती, व्यक्तिचित्रे, साहित्याचे स्वरूप, भारतीय तत्त्वज्ञान, अध्यात्म, सांख्य शास्त्र हे बेंद्रे यांच्या अनुभूतीचे व चिंतनाचे खास विषय राहिले आहेत.' हे मराठी विश्वकोशातील वर्णन १०० टक्के वास्तवदर्शी आहे. कर्नाटक- महाराष्ट्र, कानडी-मराठी या दोन संस्कृतींना जोडणारा या' 'वरकवीने' आयुष्याचा शेवटचा श्वास मराठी मातीत मुंबई येथे घेतला, तो दिवस होता २६ ऑक्टोबर १९८१. उपचार घेता घेता या महाकवीची प्राणज्योत महाराष्ट्रामध्ये मालवली. डॉ. द. रा. बेंद्रे, अंबिकातनयदत्त, बेन रॅमसन या विविध नावाने लेखन करणारा हा' शब्दप्रभू' जरी आपल्यात नसले तरी अक्षर वांड्मयाच्या अस्तित्वापर्यंत त्यांचे नाव अमर राहील. ३१ जानेवारी हा त्यांचा जन्म दिवस. अशा या महान साहित्यिकांची आज १२७ वी जयंती, त्यानिमित्ताने त्यांच्या पवित्र स्मृतीस ही शब्द पुष्पांजली!

**-प्रा. अशोक निंबर्गी,**
संगमेश्वर महाविद्यालय,
सोलापूर

CMYK

सोलापूर SOLAPUR TARUN BHARAT

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित


सोलापूर | शनिवार, १ फेब्रुवारी २०२५ | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

# आयएसएसमध्ये जाणारे पहिले भारतीय ठरणार शुभांशू शुक्ला

### स्पेस एक्स ड्रॅगनचा पायलट बनणार

**नवी दिल्ली, ३१ जानेवारी**

भारतीय वायुसेनेचे अधिकारी शुभांशू शुक्ला यांची नासाच्या एक्झियम मिशन ४ साठी पायलट म्हणून निवड झाली आहे. लवकरच ते स्पेसएक्स ड्रॅगन अंतराळयानासह आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर (आयएसएस) जातील. आयएसएसमध्ये जाणारे शुभांशू पहिला भारतीय असतील. हे मिशन १४ दिवस चालणार आहे. या अंतर्गत संशोधन केले जाणार आहे. शुभांशू इस्रोच्या गगनयान मिशनसाठी प्रशिक्षण घेत आहेत.



पेगी व्हिटसन या मिशनचे नेतृत्व करतील. शुभांशू पायलट असतील. त्यांच्यासोबत मिशन विशेषज्ञ स्लावोज उझनान्स्की-विष्णीव्स्की आणि टिबोर कापू एप्रिल ते जून २०२५ दरम्यान एक्झियम मिशन-४ वर जातील.

**१४ दिवस आयएसएसवर संशोधन**

आयएसएसची पहिली खाजगी अंतराळवीर मोहीम एक्झियम मिशन १ एप्रिल २०२२ मध्ये प्रक्षेपित करण्यात आली आणि १७ दिवस परिभ्रमण प्रयोगशाळेत राहिली.

दुसरे एक्झियम मिशन मे २०२३ मध्ये लाँच करण्यात आले. या मोहिमेने आयएसएसवर आठ दिवस घालवले. तिसरी मोहीम जानेवारी २०२४ मध्ये लॉन्च झाली. त्यांनी स्टेशनवर १८ दिवस घालवले. एक्झियम मिशन ४ साठी १४ दिवसांची कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

### अंतराळात योग करणार पायलट शुभांशू

शुभांशूचा जन्म १० ऑक्टोबर १९८५ रोजी लखनौ, उत्तरप्रदेश येथे झाला. त्यांचे वय ३८ वर्षे आहे. ते एक फायटर पायलट आहेत. २००६ मध्ये ते हवाई दलात नियुक्त झाले. त्यांनी सुखोई, मिग, डोनियर यासारखी बहुंताश विमाने हाताळली आहेत. त्यांना दोन हजार तासांचा उड्डाणाचा अनुभव आहे. नावाच्या घोषणेसोबतच नासाने एक्झियम मिशन ४ वर पत्रपरिषद घेतली, ज्यात पायलट शुभांशू यांनी सांगितले की, आगामी मिशनमध्ये मी माझ्यासोबत काही भारतीय पदार्थ घेईन, जे मी माझ्या सहकाऱ्यांना खायला देईन. मी अंतराळात योगही करेन, तिथून फोटो आणेल, जेणेकरून भारतीयांना अभिमानाची संधी मिळेल.



संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला शुक्रवारपासून सुरुवात झाली. अधिवेशनाची सुरुवात राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने होत असते. यावेळी संयुक्त सभागृहाला संबोधित करण्यासाठी विशेष बग्गीतून संसद भवन परिसराकडे जाताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

# व्यापारातून अमेरिकन डॉलर वगळल्यास १०० टक्के कर

### ट्रम्प यांचा ब्रिक्स देशांना इशारा

**वॉशिंग्टन, ३१ जानेवारी**

ब्रिक्स देशांनी आंतरराष्ट्रीय व्यापारातून अमेरिकन डॉलर काढून टाकण्याचा प्रयत्न केल्यास १०० टक्के कर लावणार असल्याचा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. गुरुवारी समाज माध्यमवर पोस्ट करताना ट्रम्प यांनी लिहिले, ब्रिक्स देश डॉलरपासून दूर जाण्याचा प्रयत्न करतील आणि आपण फक्त बघत राहू, असे होणार नाही.

ट्रम्प यांनी पोस्टमध्ये लिहिले की, ब्रिक्स देशांकडून नवीन चलन तयार न करण्याची आणि डॉलरशिवाय इतर कोणत्याही चलनाला पर्याय न देण्याची हमी मागितली आहे. ब्रिक्स देशांनी असे केले नाही, तर अमेरिकेत या देशांतील वस्तूंवर १०० टक्के कर आकारला जाईल. याशिवाय अमेरिकेसोबत या देशांचे व्यापारी संबंध संपुष्टात येऊ शकते. चलन निर्मितीबाबत ब्रिक्समध्ये समाविष्ट सदस्य देशांमध्ये एकमत झाले नाही. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये रशियात झालेल्या ब्रिक्स देशांच्या शिखर परिषदेपूर्वी तेथील चलनाबाबत जोरदार चर्चा झाली होती. मात्र, शिखर परिषदेपूर्वीच रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी ब्रिक्स संघटना स्वत:चे चलन तयार करण्याचा विचार करीत नसल्याचे स्पष्ट केले होते. शिखर परिषदेत ब्रिक्स देशांच्या स्वत:च्या पेमेंट सिस्टमबाबत चर्चा झाली. गेल्या काही वर्षांपासून रशिया आणि चीन अमेरिकन डॉलरला पर्याय म्हणून ब्रिक्स चलन तयार करण्याचा प्रयत्न करीत आहे, ज्यावर एकमत झालेले नाही. ब्रिक्सच्या आगामी बैठकीत यावर चर्चा होण्याती शक्यता असताना ट्रम्प यांनी सदस्य देशांना इशारा दिला आहे.

**जयशंकर यांनी स्पष्ट केली भूमिका**

चलन निर्मितीबाबत ब्रिक्स सदस्य देशांमध्ये एकमत झालेले नाही तसेच यासंदर्भात अधिकृत घोषणाही करण्यात आलेली नाही. गेल्या वर्षी ब्रिक्स देशांच्या शिखर परिषदेत स्विफ्ट पेमेंट प्रणालीच्या धर्तीवर प्रणाली तयार करण्याबाबत चर्चा झाली. भारताने ब्रिक्स देशांना पेमेंट सिस्टमसाठी यूपीआय ऑफर केले होते. भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी एका निवेदनात म्हटले होते की, भारत व्यापारात अमेरिकन डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्याच्या बाजूने नाही तसेच ब्रिक्स चलनाचा कोणताही प्रस्ताव देण्यात आलेला नाही. (वृत्तसंस्था)

# आर्थिक सर्वेक्षण म्हणजे काय?

आपण अशा देशात राहतो, जिथे मध्यमवर्गीय लोकांची संख्या खूप जास्त आहे. आपल्या बहुतेक घरांमध्ये डायरी बनवली जाते. या डायरीत संपूर्ण हिशेब ठेवतो. वर्ष संपल्यानंतर आपण मागे वळून पाहतो, तेव्हा कळते की, आपल्या घराची परिस्थिती कशी आहे? आम्ही कुठे खर्च केला? किती कमावले? किती बचत केली, याच्या आधारे आपण पुढील वर्षात कसा खर्च करायचा, हे ठरवतो.

आर्थिक सर्वेक्षण हे आपल्या घरातील डायरीसारखे असते. यावरून आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेची स्थिती काय आहे, याची माहिती मिळते. आर्थिक सर्वेक्षणात मागील वर्षाचा लेखाजोखा असतो आणि आगामी वर्षासाठीच्या सूचना, आव्हाने तसेच उपायांचा उल्लेख असतो. अर्थसंकल्पाच्या एक दिवस आधी आर्थिक सर्वेक्षण सादर केले जाते.



**आर्थिक सर्वेक्षण कोण तयार करतात?**

आर्थिक घडामोडी हा वित्त मंत्रालयाच्या अंतर्गत येणारा विभाग आहे. हा आर्थिक विभाग मुख्य आर्थिक सल्लागार म्हणजेच सीईएच्या देखरेखीखाली आर्थिक सर्वेक्षण तयार करतो. सध्या सीईए डॉ. व्ही. अनंत नागेश्वरन् आहेत.

**आर्थिक सर्वेक्षण का महत्त्वाचे आहे?**

ते अनेक प्रकारे आवश्यक आहे. एक प्रकारे आर्थिक सर्वेक्षण आपल्या अर्थव्यवस्थेसाठी दिशा म्हणून कार्य करते; कारण आपली अर्थव्यवस्था कशी चालली आहे आणि ती सुधारण्यासाठी आपल्याला काय करण्याची आवश्यकता आहे, हे ते दर्शवते.

**सरकारने याची ओळख करून देण्याची गरज आहे का?**

सर्वेक्षण सादर करून त्यात केलेल्या सूचना किंवा शिफारशी स्वीकारण्यास सरकार नाही. सरकारला हवे असल्यास त्यात दिलेल्या सर्व सूचना फेटाळू शकतात. तरीही ते महत्त्वाचे आहे. कारण त्यात गेल्या वर्षाच्या अर्थव्यवस्थेचा लेखाजोखा दिला आहे.

**पहिले आर्थिक सर्वेक्षण १९५०-५१ मध्ये सादर झाले**

१९५०-५१ मध्ये केंद्रीय अर्थसंकल्पाचा एक भाग म्हणून भारताचे पहिले आर्थिक सर्वेक्षण सादर करण्यात आले. मात्र, १९६४ पासून हे सर्वेक्षण केंद्रीय अर्थसंकल्पापासून वेगळे करण्यात आले. तेव्हापासून अर्थसंकल्प सादर होण्याच्या एक दिवस आधी आर्थिक सर्वेक्षण जाहीर केले जाते.

### गंगा नदीत प्रवाशांनी भरलेली नौका उलटली

**प्रयागराज, ३१ जानेवारी**

प्रयागराजच्या मान मंदिर घाटाजवळ गंगा नदीत ६० प्रवाशांना घेऊन जाणारी नौका उलटली. या अपघातात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. एनडीआरएफ आणि खलाशांच्या मदतीने सर्व प्रवाशांना वाचवण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. नौकेतील सर्व भाविक ओडिशाचे रहिवासी आहेत.

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, गंगा नदीच्या मध्यभागी मान मंदिर घाट ओलांडून एक मोठी नौका आणि लहान नौका यांच्यात टक्कर झाल्यानंतर हा अपघात झाला. नौकेतील सर्व भाविकांनी लाईफ जॅकेट घातले होते, यामुळे सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे वाचवता आले. घटनास्थळी एनडीआरएफचे पथक उपस्थित होते. नौका उलटल्याचे लक्षात येताच त्यांनी भाविकांना वाचविण्यासाठी अपघातस्थळाकडे धाव घेतली. वेळीच मदत मिळाल्याने भाविकांना वाचविता आले. (वृत्तसंस्था)




### रशियन महिला पडली अघोरी साधूच्या प्रेमात



**हिंदू धर्म स्वीकारून झटपट उरकला विवाह?**

रशियातील एक महिला चक्क भारतातील एका अघोरी साधूच्या प्रेमात पडली. इतकेच नाही, तर अघोरी साधूसाठी ती रशिया सोडून भारतात स्थायिक झाली आहे. या दोघांचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्यांच्या प्रेमप्रकरणाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. मीडिया रिपोर्टनुसार, ही महिला भारतात पर्यटनासाठी आली होती. त्यावेळी तिची भेट एका अघोरी साधूशी झाली. काही दिवसांतच या भेटीचे रूपांतर प्रेमात झाले. अघोरी साधूसाठी संबंधित महिलेने हिंदू धर्म स्वीकारला तसेच तिने तिच्या पाठीवर श्रीगणेशाचा टॅटू गोंदवला. साधूच्या प्रेमापोटी या महिलेने सनातन धर्म स्वीकारला असून, ती हिंदू धर्माचा प्रचार करताना दिसत आहे.

या दोघांचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. व्हायरल झालेल्या या व्हिडीओत रशियन महिला अघोरी साधूला तिचा पती असल्याचे म्हणत आहे तसेच आपण श्रीगणेशाची भक्त असल्याचे म्हटले आहे. विशेष म्हणजे, रशियन महिलेशी लग्न केल्यानंतर तुमची तपस्या भंग होत नाही का? असा प्रश्न विचारले असता, अघोरी साधूने हसून प्रतिक्रिया दिली.

महत्त्वाचे म्हणजे, या दोघांनी खरोखरच विवाह केला आहे का? याची पुष्टी होऊ नाही. मात्र, हा व्हिडीओ एका युजरने इंस्टाग्राम या सोशल मीडिया हँडलवर शेअर केला आहे. यावर अनेकांनी प्रतिक्रियाही दिली आहे. खरं तर, अखोरी साधू सांसारिक मोहमायेपासून दूर असतात, अशावेळी दोघांनी खरच विवाह केला का? यावर अनेकांनी संशय व्यक्त केला आहे.

# आता पायीच गाठावे लागणार यात्रास्थान

महाकुंभातील चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर या परिसरात अनेक निर्बंध लागू झाले आहेत. विशेषत: या परिसरात वाहनांना पूर्णत: मज्जाव करण्यात आला असल्याने कोणीही चारचाकी वाहन घेऊन यात्रास्थळाला जाऊ शकत नाही.

प्रयागराज जंक्शन, संगम प्रयाग, प्रयाग स्टेशन, दारागंज, रामबाग, नैनी, सुभेदारगंज, आणि छिवकी स्टेशन या स्थानकांपासून संगमचे अंतर अनुक्रमे १२, ६, ७, ३, ८, १२, १५, ८ आणि १६ किलोमीटर आहे. जत्रेच्या बाहेर जाईपर्यंत पायी किंवा दुचाकीने येथे यावे लागेल. जत्रेत पायी प्रवेश मिळणार आहे.



विमानतळावर उतरल्यानंतर भाविक उच्च न्यायालयाच्या उड्डाणपुलापर्यंत कारने येऊ शकता. त्यानंतर बाईकने जत्रेच्या बाहेर जाऊ शकतात. येथून समोर जाण्यासाठी आठ किलोमीटर चालावे लागेल. शहराबाहेर वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. तिथून मात्र भाविकांना संगमस्थळी जाण्यासाठी दुचाकीशिवाय अन्य पर्याय म्हणजे पायी चालत जाणे हाच आहे. दुचाकीलाही यात्रास्थानी प्रवेश नाही.

शनिवारी आणि रविवारी भाविकांची संख्या वाढण्याची शक्यता असल्याने दुचाकीवरही बंदी येणार की काय, अशी चर्चा आहे. अद्याप तशी सूचना प्रशासनाकडून जारी झालेली नाही. विशेष म्हणजे, सर्व प्रकारचे व्हीआयपी पास रद्द करण्यात आले आहेत. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या विशेष सुविधेअंतर्गत पासवर वाहनांना प्रवेश मिळणार नाही. या परिसरातील सर्व 'वन वे' करण्यात आले आहेत.

# ममता कुलकर्णी, लक्ष्मी नारायण यांचे महामंडलेश्वर पद काढले

### आखाड्यातूनही बाहेर

बॉलिवूडची माजी अभिनेत्री ममता कुलकर्णी आणि आचार्य महामंडलेश्वर लक्ष्मी नारायण त्रिपाठी यांना किन्नर आखाड्याचे संस्थापक अजेय दास यांनी आखाड्यातून बाहेर केले आहे.

प्रयागराजमध्ये सुरू असलेल्या महाकुंभ दरम्यान किन्नर आखाड्याने ही कारवाई केली. किन्नर आखाड्याचे संस्थापक ऋषी अजय दास यांनी ममता कुलकर्णीला महामंडलेश्वर पदावरून हटवून आखाड्यातून बाहेर केले आहे तसेच लक्ष्मी नारायण त्रिपाठीला आचार्य महामंडलेश्वर पदावरून हटवले आणि आखाड्यातून बाहेर करण्यात आले.



ममताने प्रयागराजमध्येच महाकुंभमेळ्यात संन्यास घेण्याची घोषणा केली होती. ममताने महाकुंभ दरम्यान किन्नर आखाड्यात आचार्य महामंडलेश्वलर डॉ. लक्ष्मी नारायण त्रिपाठीची भेट घेतली होती. त्यानंतर ममताने संगमवर पिंडदान विधी केला होता. तिचा राज्याभिषेक किन्नर आखाड्यात झाला होता. संन्यास घेतल्यानंतर ममता कुलकर्णीला नवे नाव 'श्री यमई ममता नंद गिरी' देण्यात आले होते तसेच तिला किन्नर आखाड्याच्या महामंडलेश्वरपदी नियुक्त केले होते.

# साधूंची नक्कल करणाऱ्या तरुणाच्या श्रीमुखात भडकावली

महाकुंभातील अनेक व्हिडीओ रोज सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. या व्हिडीओत एक साधू तरुणाच्या थोबाडीत लगावताना दिसत आहे. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर नेटकरी त्याच्यावर कमेंट करीत आहेत. काही जण यामागील कारण विचारत असून, काही जण त्यांनी योग्य केल्याचं सांगत आहेत.

महाकुंभात एकीकडे लोक आस्थेची डुबकी लगावत असताना, काही युट्यूबर हातात मोबाईल फोन घेऊन प्रसिद्ध होण्याच्या प्रयत्नात आहेत. यादरम्यान एका युट्यूबरचा व्हिडीओ व्हायरल झाला. एक्सवर शेअर करण्यात आलेल्या व्हिडीओच्या कॅप्शनमध्ये लिहिण्यात आले की, भाईने बाबांची नक्कल करण्याचा प्रयत्न केला आणि त्याला एक कानाखाली मिळाली. बाबाने ज्या तरुणाला कानाखाली मारली, तो युट्यूबर आहे. तो एक हात उचलून महाकाल गिरी बाबाची नक्कल करीत कंटेंट तयार करण्याचा प्रयत्न करीत होता.

कथित यूट्यूबरला थप्पड मारणारी व्यक्ती म्हणजे महाकाल गिरी बाबा आहेत; ज्यांनी आपला संकल्प दाखवण्यासाठी गेल्या नऊ वर्षांपासून एक हात वर ठेवला आहे. मध्यप्रदेशातून आलेल्या महाकाल गिरी बाबा यांनी गायींचे रक्षण आणि धर्माचे रक्षण करण्याची आजीवन प्रतीज्ञा घेतली आहे. अनेक वर्षांच्या तपश्चर्येमुळे हातावरची नखे खूप वाढली आहेत, पण तपश्चर्या करताना नखे कापली जात नाहीत. या साधनेमुळे लोक त्यांना हठयोगी म्हणू लागले आहेत.

# पत्नी अंकितासोबत महाकुंभात पोहोचला मिलिंद सोमण

मिलिंद सोमण आणि त्याची पत्नी अंकिता कोंवर यांनी नुकतेच महाकुंभला हजेरी लावली. मौनी अमावास्येच्या दिवशी या जोडप्याने संगमात स्नान केले. मिलिंदच्या आधी कबीर खान, हेमा मालिनी हे अनेक कलाकार महाकुंभला पोहोचले आहेत.

अभिनेता-मॉडेल मिलिंद सोमणने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. पोस्ट शेअर करून त्याने प्रयागराज महाकुंभमध्ये स्नान करण्यासाठी गेल्याचे सांगितले. कॅप्शनमध्ये अनुभव शेअर करताना अभिनेत्याने लिहिले, मी खूप भाग्यवान आहे की, मला मौनी अमावस्येच्या शुभ दिवशी अंकितासोबत महाकुंभात स्नान करण्याची संधी मिळाली.



अभिनेत्याने पुढे लिहिले, अशी पवित्र जागा आणि असा अनुभव मला जाणवतो की, मी या जगात किती लहान आहे आणि आपण येथे घालवलेले क्षण किती खास आहेत. चेंगराचेंगरीच्या घटनेने मला खूप दु:ख झाले आहे, ज्यांनी आपले प्रियजन गमावले आहेत, त्यांच्या कुटुंबांसोबत माझी प्रार्थना आहे.

## चित्रपट वार्ता

### महाकुंभात प्रकाशझोतात आलेल्या मोनालिसाने साईन केला चित्रपट

**मुंबई** : प्रयागराज महाकुंक्षान पुष्पहार विकताना व्हायरल झालेली महेश्वरची मोनालिसा लवकरच चित्रपटात दिसणार आहे. 'द डायरी ऑफ वेस्ट' हा चित्रपट बनवणारे लेखक-दिग्दर्शक सनोज मिश्रा यांनी मोनालिसाला त्यांच्या आगामी 'द डायरी ऑफ मणिपूर' चित्रपटासाठी साईन केले आहे. बुधवारी महेश्वरमध्ये चित्रपट साईन केलेली मोनालिसा मुख्य भूमिकेत आर्मी मॅनच्या मुलीची भूमिका साकारणार आहे. या चित्रपटात मणिपूर हिंसाचारातील प्रेमकथा आणि मुलीचा संघर्ष दाखवण्यात येणार आहे. २० कोटींचे बजेट असलेल्या या चित्रपटाचे चित्रीकरण फेब्रुवारीमध्ये सुरू होणार आहे. ऑक्टोबरमध्ये चित्रपट प्रदर्शित करण्याचा विचार आहे. विशेष म्हणजे, याचे चित्रीकरण लंडनमध्येही होणार असल्याने मोनालिसाला लंडनलाही जाण्याची आयतीच संधी मिळणार आहे.




### टीनाला लग्न न करता व्हायचेय् आई

**मुंबई** : टीव्ही अभिनेत्री टीना दत्ताने तिच्या करिअरची सुरुवात बालकलाकार म्हणून केली. त्यानंतर ती कलर्स टीव्हीच्या 'उत्तरन' या मालिकेत दिसली. या मालिकेने टीआरपीचे अनेक रेकॉर्ड तोडले. सोशल मीडियावर टीना प्रचंड सक्रिय आहे. सध्या ती अविवाहित आहे. रिलेशनशिपमध्ये राहण्याचा तिचा कोणताही विचार नाही. अलिकडेच टीना दत्ताने तिच्या भविष्यातील नियोजनाबद्दल सांगितले. तिला सिंगल मदर होण्यास कोणताही आक्षेप नाही आणि सध्या ती अशा व्यक्तीचा विचार करीत आहे, जिच्यासोबत लग्न न करताही आई होऊ शकते. मात्र, यावेळी टीनाने असे देखील म्हटले की, तिला लग्नाची घाई नाही. भविष्यात मूल दत्तक घेऊन आई होण्याचा विचार ती करीत आहे. मला विश्वास आहे की, मी एक चांगली आई होऊ शकते. मूल दत्तक घेऊन आई होण्याचा पर्याय मी माझ्यासाठी खुला ठेवला आहे.



### भूमिका साकारल्याने पूजाचा पत्रकारांविषयी आदर वाढला



**मुंबई** : 'देवा' चित्रपटात अभिनेत्री पूजा हेगडे एका वेगळ्या भूमिकेत दिसली. चित्रपटातील तिची व्यक्तिरेखा एका शोध पत्रकाराची आहे. पत्रकारिता या विषयावर बनलेले चित्रपट मी पाहिले आहेत. पत्रकार कसे काम करतात, ते समजून घेतले. चित्रपटातील माझी व्यक्तिरेखा एका विशिष्ट हेतूने ठेवण्यात आली आहे. हा चित्रपट केल्यानंतर विशेषत: शोध पत्रकारांबद्दलचा माझा आदर वाढला आहे. आपले काम करण्यासाठी ते कसे जीव धोक्यात घालतात, लोकांशी कसे वागतात, याचे कौतुक करायला हवे. या चित्रपटात पूजा हेगडेसोबत शाहिद कपूर मुख्य भूमिकेत झळकत आहे.

## अग्रलेख...

# देशातही लागू व्हावा समान नागरी कायदा

उत्तराखंडमध्ये समान नागरी कायदा (युनिफॉर्म सिव्हिल कोड यूसीसी) लागू झाला आहे. असे करणारे उत्तराखंड हे देशातील दुसरे राज्य ठरले आहे. गोव्यात आधीपासूनच समान नागरी कायदा लागू आहे; मात्र तो गोवा पोर्तुगीजांच्या ताब्यात होता, तेव्हापासूनचा आहे. त्या अर्थाने समान नागरी कायदा लागू करणारे उत्तराखंड देशातील पहिले राज्य ठरते. समान नागरी कायद्याचा पुरस्कार भाजपा आधीपासूनच करत आहे. उत्तराखंडमध्ये भाजपाचे सरकार असल्यामुळे हे शक्य झाले आहे, हे नाकारता येणार नाही. उत्तराखंड सरकारने देशातील अन्य राज्यांसमोर विशेषत: भाजपाशासित राज्यांसमोर असे करत पथप्रदर्शक मार्ग घालून दिला आहे. घटनेतील अनुच्छेद ४४ अंतर्गत जी मार्गदर्शक तत्त्वे सांगितली आहेत, त्यातील एक समान नागरी कायदा लागू करणे हे आहे. असे करत उत्तराखंड सरकारने घटनेतील आणखी एका मार्गदर्शक तत्त्वाची पूर्तता केली, असे म्हणायला हरकत नाही. त्यामुळे उत्तराखंड सरकार आणि त्या राज्याचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांचे अभिनंदन केले पाहिजे. उत्तराखंडच्या पावलांवर पाऊल टाकत देशातील अन्य राज्ये आता समान नागरी कायदा आपल्याकडे लागू करण्याच्या दृष्टीने कामाला लागतील, अशी अपेक्षा करायला हरकत नाही. आपल्या देशात खरं म्हणजे खूप आधीच समान नागरी कायदा लागू व्हायला पाहिजे होता. पण त्याची सुरुवात देवभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अतिशय छोटे राज्य असलेल्या उत्तराखंड सरकारने केली. त्यामुळे 'देर आये दुरुस्त आये' असे त्याचे वर्णन करायला पाहिजे. किमान यानिमित्ताने देशात त्याची सुरुवात झाली हेही नसे थोडके. देशात फौजदारी कायदे सर्व जाती-धर्मांच्या लोकांसाठी समान आहेत, त्यामुळे कोणत्याही जाती-धर्माच्या व्यक्तीने गुन्हा केला, तरी तिला फौजदारी कायद्यानुसार सारखीच शिक्षा होते. त्यात जाती-धर्माच्या आधारावर भेदभाव केला जात नाही. मात्र दिवाणी कायद्यानुसार असे होत नाही. विवाहविधी, संपत्ती हस्तांतरण आणि वारसाहक्क याबाबत मात्र प्रत्येक धर्माच्या लोकांना आपल्या धर्मातील तरतुदींनुसार आचरण करण्याचे स्वातंत्र्य आहे. त्यामुळे याबाबतीतही समान नागरी कायदा लागू करण्याची मागणी गेल्या काही वर्षांपासून केली जात होती.

मुस्लिम व्यक्तीला चार महिलांशी विवाह करण्याची अनुमती आहे. हिंदू व्यक्ती मात्र एकापेक्षा जास्त महिलांशी विवाह करू शकत नाही. मुस्लिम व्यक्तीने चार महिलांशी विवाह केला तरी तो गुन्हा ठरत नाही; मात्र हिंदू व्यक्तीने पहिली पत्नी हयात असताना दुसऱ्या महिलेशी विवाह करणे हा गुन्हा ठरतो. त्यासाठी त्याला शिक्षाही होऊ शकते. त्यामुळे एकाच देशात राहणाऱ्या दोन भिन्न धर्माच्या व्यक्तींना दोन वेगवेगळे न्याय लावणे हे भेदभावपूर्ण तसेच अन्यायकारक ठरत होते. यातूनच समान नागरी कायद्याची मागणी रेटली जात होती. किमान उत्तराखंड सरकारने त्याची सुरुवात केल्यामुळे त्याचे अभिनंदन करायला हरकत नाही. मुस्लिमांचे तुष्टीकरण करत काँग्रेसने आतापर्यंत देशात राज्य केले. त्यामुळे मुस्लिमांच्या म्हणजे आपल्या व्होट बँकेच्या भावना दुखावतील, असा कोणताही निर्णय घेण्याची काँग्रेसची तयारी नव्हती. त्यामुळेच समान नागरी कायदा लागू करण्याच्या दृष्टीने काँग्रेसने कोणत्याही हालचाली केल्या नाहीत. मुस्लिमांच्या हितासाठी काँग्रेसने देशहिताला तिलांजलीही दिली होती. पण भाजपाची भूमिका पूर्णपणे याच्याविरोधात आहे. भाजपात आधी देश, मग पक्ष आणि सर्वांत शेवटी मी म्हणजे व्यक्तीचा विचार केला जातो. त्यामुळे व्यापक समाज आणि देशहितासाठी आवश्यक असलेला समान नागरी कायदा लागू करताना मुस्लिमांची मते आपल्याला मिळाली नाही तर मग काय, असा स्वार्थी विचार भाजपाने केला नाही. याचा अर्थ भाजपा मुस्लिमविरोधी आहे, असाही नाही. भाजपाने मुस्लिमांना न्याय दिला आहे. कारण 'सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्वास' हे भाजपाचे राज्य कारभाराचे सूत्र आहे. त्यामुळे मुस्लिमांचे तुष्टीकरण न करताही भाजपाने कधीच त्यांच्यावर अन्याय होईल, अशी भूमिका घेतली नाही, तसा विचारही केला नाही. समान नागरी कायद्याला अनेक पैलू आहेत, जे अजून समोर आले नाहीत. या कायद्याचा फक्त मुस्लिमच नाही तर हिंदू, जैन, शीख आणि पारशी या धर्मांच्या आणि पंथांच्या लोकांवरही परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्वांना काही गमवावे लागू शकते. मात्र काही तरी कमावण्यासाठी नेहमीच काही तरी गमवावे लागत असते. थोडे गमावून समाजाचा आणि देशाचा खूप मोठा फायदा होणार असेल तर असे गमावण्याचे कोणाला फारसे दु:ख होणार नाही. उलट आनंदाने सगळे यासाठी तयार होतील, यात शंका नाही. कारण हिंदू असो, जैन असो, शीख असो की पारशी या सर्वांचे प्राधान्य नेहमी व्यक्तिगत हितापेक्षा समाज आणि देशहितालाच राहात असते, याबाबत शंका नाही. उत्तराखंड सरकारने लागू केलेल्या समान नागरी कायद्यातून आदिवासी जमातींना वगळले आहे. त्याचे कारण त्यांच्या चालीरीती आणि संस्कृतीत आहे. कोणताही निर्णय घेताना त्यात काही अपवाद असतात, तसाच हा अपवाद समजायला हरकत नाही. मात्र यामुळे तेथे लागू झालेल्या समान नागरी कायद्याचे महत्त्व कमी होत नाही, हे नक्की.

घटनेतील अनुच्छेद ४४ मधील मार्गदर्शक तत्त्वानुसार सरकारने समान नागरी कायदा निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पण असे मार्गदर्शक तत्त्वात म्हटल्यामुळे त्याची जबरदस्ती करता येत नव्हती. १९८५ मध्ये उद्‌भवलेले शहाबानो प्रकरण तसेच १९९५ च्या सरला मुद्‌गल प्रकरणाच्या सुनावणीतही सर्वोच्च न्यायालयाने समान नागरी कायद्याची आवश्यकता प्रतिपादित केली होती. उत्तराखंड सरकारने राज्यात समान नागरी कायदा लागू करत एकप्रकारे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचेच पालन केले आहे, असे म्हणावे लागेल. उत्तराखंडमध्ये समान नागरी कायदा लागू झाल्यामुळे काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील काही मित्रपक्ष त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे देशातील आणि उत्तराखंडमधील कट्टरपंथी मुस्लिम संघटनाही याला विरोध करण्याची शक्यता आहे. ऑल इंडिया रजा ॲक्शन कमेटीचे मौलाना अदनान रजा कादरी यांनी शरियतसोबत कोणत्याही प्रकारची छेडछाड खपवून घेतली जाणार नाही, सडकेपासून न्यायालयापर्यंत संघर्ष करण्याचा इशारा दिला आहे. व्यक्तिगत फायद्याच्या बाबतीत शरियतचा आग्रह धरणाऱ्या मौलाना अदनान रजा कादरी यांना या मुद्यावर दुटप्पी भूमिका घेता येणार नाही. जिथे फायदा आहे, तिथे ते शरियतचा आधार घेणार आणि जिथे नुकसान आहे, तिथे ते देशातील फौजदारी कायद्याच्या आड लपणार, असे चालणार नाही. व्यक्तिगत फायद्यासाठी शरियतचा आधार घेणाऱ्या मुस्लिमांनी फौजदारी गुन्ह्याच्या बाबतीतही शरियतने सांगितल्यानुसार शिक्षा भोगायची तयारी ठेवली पाहिजे. त्यांना या मुद्यावर सरसकट एक भूमिका घ्यावी लागेल, त्यांना एकाच वेळी तबल्यावर आणि डग्ग्यावर हात ठेवता येणार नाही. समान नागरी कायदा ही देशातील संविधानासोबत होत असलेली चेष्टा आहे, असेही रजा कादरी म्हणाले. कादरी साहेब, समान नागरी कायदा ही देशातील संविधानासोबत होत असलेली चेष्टा नाही, तुम्हीच आतापर्यंत आपल्या कृतीने देशातील संविधानाची चेष्टा आणि टिंगलटवाळी केली, ते पायदळी तुडवण्याचा प्रकार केला आहे. त्यामुळे तुमच्या तोंडी संविधान हा शब्द शोभत नाही. भारतीय संविधानावर ज्यांची श्रद्धा आणि विश्वास आहे, त्यांच्याच तोंडी संविधान हा शब्द शोभून दिसतो. मुस्लिम समाज या मुद्यावरून रस्त्यावर उतरून आपला मूळ स्वभाव दाखवल्याशिवाय राहणार नाही; मात्र त्यांच्या या दबावतंत्राला उत्तराखंड सरकारने तसेच केंद्रातील मोदी सरकारने बळी पडू नये. उलट ही संधी साधत देशातही समान नागरी कायदा लागू करत 'न रहेंगा बांस न बजेंगी बांसरी' अशी कठोर भूमिका घेण्याची वेळ आता आली आहे.

## यंगिस्तान

# बुल्डोझ करण्याच्या लायकीचा मेंदू...

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

तुम्ही सर्वांनी अमिताभ बच्चन, रजनीकांत आणि गोविंदाचा 'हम' चित्रपट पाहिला असेलच. या चित्रपटामध्ये अनुपम खेर यांनी इन्स्पेक्टर गिरधर ही भूमिक साकारली आहे. इन्स्पेक्टर गिरधर लाळघोट्या, लबाड आणि स्वार्थी असतो. तो नेहमीच चेहरा हसरा ठेवतो, बोलतानाही तो हसत (लाळघोटेपणा करत) बोलतो. मात्र त्याच्या मनात काळंबेरं असतं. तो स्वार्थासाठी, पैशांसाठी कोणाशीही मैत्री करतो. मी तुमचाच वफादार आहे असं प्रत्येकाला दाखवण्याचा प्रयत्न करतो. पण मुळात तो कोणाचाच नसतो. तो स्वतःचाच असतो... स्वार्थी, लबाड, आतल्या गाठीचा... हा चित्रपट सुरुवातीला पाहताना असं वाटतं की बख्तावरची भूमिका साकारलेले डॅनी हे मुख्य खलनायक आहेत. पण चित्रपट जसजसा पुढे सरकतो, तसतसं कळतं की हा गिरधर सर्वांत मोठा खलनायक आहे. कारण वफादार होण्याचं नाटक करून तो बख्तावरलाच फसवतो. हा चित्रपट आणि गिरधर ही भूमिका आठवण्याचं कारण म्हणजे आज एक गिरधर आपल्या महाराष्ट्रामध्ये, भारतामध्ये मुक्तपणे वावरताना दिसतोय्. या खऱ्या आयुष्यातल्या गिरधरने दादर येथील मुंबईतील सावरकर स्मारक बुल्डोझ करा असं हिंसक, फासिस्ट आणि संविधानाच्या विरोधात विधान केलं आहे. या गिरधरच्या भाषणाचा व्हिडीओ युट्यूबवर उपलब्ध आहे.

हा गिरधर मुळात सगळ्या वैचारिक मंचावर फिरून डाव्या कंपूत घुसला आहे. सुरुवातीला हा पत्रकार म्हणून वावरत होता. नंतर अण्णा हजारेंच्या आंदोलनातही हा घुसला होता. पण अण्णा हजारेंनी हे बरोबर ताडलं की हा 'हम' चित्रपटातला गिरधर आहे आणि अण्णांनी त्याची हकालपट्टी केल्यानंतर आता कुठल्या फांदीवर जाऊन बसायचं या विचारात असतानाच नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले. मग समाजवादाचा बुरखा घालून फिरणाऱ्या या गिरधरने भगवा टिळा लावला आणि टुणकन उडी मारून हिंदुत्वाच्या विशाल सागरात झेप घेतली. याने मोदींवर स्तुतिसुमने उधळायला सुरुवात केली. पण कुणीच भीक घालेना. कारण हिंदुत्वाच्या विशाल सागरात खऱ्याखुऱ्या देशभक्तांच्या समृद्ध नौका आहेत. चाचेगिरी करणाऱ्या गिरधरची नौका तग धरू शकली नाही आणि नोटबंदीनंतर ही नौका बुडाली. मग याने टुणकन डाव्या कंपूत उडी घेतली. आता हा गिरधर डाव्या मंडळींमध्ये ब्राह्मण म्हणून हिंडतो. हिंदुत्ववाद म्हणजेच ब्राह्मणवाद असं सांगून डाव्या लोकांमध्ये लाळघोटेपणा करून आपलं स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करतोय्. ज्या व्हिडीओमध्ये या गिरधरने सावरकर स्मारक बुल्डोझ करण्याचं विधान केलंय, त्यात त्याने ब्राह्मण जातीला प्रचंड दूषणे वाहिली आहेत. जणू ब्राह्मण ही जात मानवजातीची शत्रू आहे, अशाप्रकारे हा गिरधर या जातीची बदनामी करत असतो. पण लक्षात ठेवा, याला कशाशीच काही देणं घेणं नाही. कारण गिरधर हा स्वार्थी असतो, त्याचा इमान फक्त स्वतःच्या तिजोरीशी आहे. उद्या पुरोगामी कंपूतून याला हाकलून लावलं तर हा पुन्हा दुसऱ्या कंपूत शिरून तिथे लाळघोटेपणा करेल.

आता आपण गिरधरने सावरकर स्मारकावर केलेल्या विधानाकडे वळूया. याचं म्हणणं असं की मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी महापुरुषांची स्मारके उभी राहायला हवीत. सावरकर स्मारक कुठून आलं? असा प्रश्न याच्या दूषित मेंदूला पडला आहे. तर निःसंशय छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्मारके मुंबईतच काय तर जगभरात उभारायला हवीत. कारण हे महापुरुष अनुकरणीय आहेत. मात्र गिरधर ज्या विचारांचा आहे, त्यात या दोन्ही महापुरुषांना स्थान नाही. गिरधर वरवर पाहता अहिंसेची भाषा करत असला तरी याच्या पूर्ण भाषणातून हा संविधानाच्या विरोधात जायला सांगतो. याला संघावर बंदी हवीय्, सावरकरांचं स्मारक तोडलेलं हवंय्. हाच पुरोगाम्यांचा खरा चेहरा आहे. या भाषणाचा विषय मनुस्मृती की संविधान असा होता. मुळात किती हिंदूंनी मनुस्मृती वाचली आहे? गिरधरनेही वाचली नसेल. मनुस्मृती आजच्या आधुनिक हिंदूंचे श्रद्धास्थान नाही, हे सत्य आहे. पण मनुस्मृतीला जिवंत ठेवण्याचं काम गिरधरसारखे स्वयंघोषित पुरोगामी लोक करत असतात. कारण मनुस्मृतीमुळे यांचं 'दुकान' चालतं.

दादर येथील स्वा. सावरकर स्मारक हे सर्वसामान्य सावरकरवाद्यांच्या कष्टातून उभारलेले आहे. जातीयवादाची बेडी मोडून एकत्वाची जाणीव करून देणारं हे राष्ट्रीय तीर्थस्थळ आहे. स्वा. सावरकरांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा समृद्धपणे चालवला आणि हा गिरधर हे दोन्ही महापुरुष वेगळ्या विचारांचे असल्याचे दाखवतोय्. या माणसाच्या मनात जात इतकी भिनली आहे की 'मी ब्राह्मण आहे' असं सगळीकडे सांगत फिरतो. मुळात सावरकर खऱ्या अर्थाने पुरोगामी होते. सावरकर केवळ क्रांतिकारक नव्हते, राजकारणी नव्हते तर समाजसेवक, समाजसुधारकही होते. समाजातील रंजल्या गांजलेल्या लोकांसाठी सावरकर पुढे सरसावले होते. पण दुर्दैव असे की सावरकरांच्या जीवनाचा हा अध्याय लोकांसमोर प्रकर्षाने आला नाही. सावरकरवाद्यांनाही तो मांडता आला नाही, हे मान्य करावेच लागेल ना! सावरकरांचे रत्नागिरीतील सामाजिक कार्य खूप थोर आहे. त्यांचे कार्य पाहून कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनीही प्रशंसा केली आहे. ज्ञानेश्वरांचा वैश्विक धर्म सावरकरांना मान्य आहे. श्रीकृष्णाचं 'वसुधैव कुटुंबकम्' हे तत्त्व सावरकरांनी स्वीकारलेलं आहे. मात्र 'हे विश्वचि माझे घर' ही संकल्पना सत्यात उतरवण्यासाठी जगाला बेचिराख करण्याची मनीषा ठेवणाऱ्या, माझाच देव खरा-तुमचा देव खोटा असं म्हणत जगाला कब्रस्थान बनवण्याची आकांक्षा ठेवणाऱ्या विचाराविरुद्ध प्रतिकार केल्याशिवाय वैश्विक धर्माची संकल्पना रुजू शकणार नाही, ज्ञानदेवांचे पसायदान आकार घेऊ शकणार नाही. म्हणूनच भगवान श्रीकृष्ण आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या तत्त्वाचे अनुसरण करून हिंदू धर्माचा ध्वज फडकवूनच वैश्विक धर्माची स्थापना करता येणार आहे, याचे भान सावरकरांना होते. आंबेडकर आणि सावरकर, बुद्ध आणि कृष्ण असा वाद पुरोगामी मंडळी पेटवण्याचा प्रयत्न करतात. पण हे एकच तत्त्व आहे. गंतव्य एकच आहे, मार्ग वेगळे असतील. त्यामुळे सावरकरांचे विचार मुळातून समजून घेतले पाहिजेत. त्यांचे विचार गिरधरने नक्कीच वाचले आहेत. पण हा लबाड गिरधर अर्धवट आणि खोट्या गोष्टी सांगून लोकांच्या मनात संभ्रम निर्माण करतोय्. २०१४ साली हा सावरकरांची स्तुती करत होता. कारण 'हम' चित्रपटाप्रमाणे गिरधर हा बख्तावरचाही (डॅनी) नाही आणि टायगरचाही (बच्चन) नाही. त्यामुळे सावरकर स्मारक बुल्डोझ करण्याचा विचार ज्या मेंदूतून आला, खरं तर तो मेंदूच बुल्डोझ करण्याच्या लायकीचा आहे. पण हिंदुत्वात बुल्डोझ करण्याची परंपरा नाही. तोडण्याची-मोडण्याची-फाडण्याची परंपरा वाळवंटातून आली आहे. आपली परंपरा उभारण्याची आहे, फुलवण्याची आहे. जरी गिरधरचा मेंदू बुल्डोझ करण्याच्या लायकीचा असला तरी तो शाबूत राहिला पाहिजे. कारण त्यामुळे लोकांचे मनोरंजन होत असते. आणि मुलांवर संस्कार करण्यासाठी सुद्धा उपयुक्त ठरत असते. 'आयुष्यात कसे व काय व्हायचे नाही', याचे उत्तम उदाहरण म्हणजे गिरधर. एवढ्यासाठी का होईना, गिरधर उपयुक्त आहे!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**हेमंत सालोडकर**

# धार्मिक यात्रेतून सामाजिक सलोखा

प्रयागराज येथे महाकुंभ सुरू आहे. या महाकुंभाचे आयोजन भव्य दिव्य आहे. तेथे अनेक भाविक मोठ्या श्रद्धेने येऊन गंगेत पवित्र स्नान करत आहेत. भारतातीलच नव्हे, तर जगभरातील हिंदू बांधव आणि विविध धर्मांतील लोक या अमृतकुंभाचा लाभ घेत असतानाच, वर्धा जिल्ह्यातील तरोडा या लहान गावातही छोट्या प्रमाणात असलेला, पण भक्ती आणि श्रद्धेत कुठेही कमी नसलेला संतमेळा मागील आठवडाभर सुरू होता. त्याची सांगता शनिवारी पहाटे प्रक्षाळपूजेनंतर झाली. अनेक थोर पुरुषांच्या स्पर्शाने पवित्र असलेल्या वर्धा जिल्ह्यात केजाजी महाराजांचे आगमन झाले आणि तेथील लोकांनी त्यांना आपलेसे करून घेतले. लोकांच्या आदरातिथ्याला ते नाकारू शकले नाहीत. अशा लोकानुनय केजाजी महाराजांची पुण्यतिथी तरोडा येथे मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाली. मागील काही दिवस तरोडा गाव संतांच्या मांदियाळीने फुलून गेले होते. आठवडाभर संतांचे कीर्तन, नामजप, टाळ, मृदंग, हरिनाम यांचा अखंड अमृतप्रवाह सुरू होता. यानिमित्त येथे यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवासाठी कुणालाही आमंत्रणाची गरज पडत नाही. कुणाचे औपचारिक आगतस्वागत होत नाही. तरीही इतर गावांतील लोक महाराजांच्या आशीर्वादासाठी येथे येतात आणि भक्ती-सागरात स्नान करतात. आठवडाभर तर गावात अक्षरश: चहलपहल होती. गावात दसरा, दिवाळीसारखे वातावरण होते. केजाजी महाराजांच्या मंदिरावर विद्युत दिव्यांची आकर्षक रोषणाई केलेली होती. मंदिर परिसरात मंडप टाकून तेथे कीर्तनकारांची प्रवचने झाली. यात समाजातील सर्व प्रकारचे लोक सहभागी झाले होते. गावाच्या प्रत्येक घरातील व्यक्तीचा उत्सवात सहभाग होता. गरीब, श्रीमंत, जातपात याला कुठेही थारा नव्हता. प्रत्येक जण केजाजी महाराजांच्या ओढीने एकत्र आले होते. माझाही काही या उत्सवात सहभाग असावा म्हणून प्रत्येक जण सेवा अर्पण करत होता.

गावातून लग्न होऊन सासरी गेलेल्या मुली उत्सवाच्या निमित्ताने एकत्र आल्या होत्या आणि जुन्या मैत्रिणींच्या भेटीने आनंदून गेल्या. विशेष म्हणजे मोठ्या लोकांच्या मार्गदर्शनात या उत्सवात तरुणांचा उत्साह पाहण्यासारखा होता. कुठेही तरुणाईचा उन्माद नाही, होता फक्त उत्साह. मोठ्यांपासून लहानांपर्यंत सर्वच जण कामात व्यस्त होते. उत्सवाच्या यशस्वितेसाठी झटत होते. कुणालाही त्रास होणार नाही याची काळजी घेत होते. उत्सवाच्या शेवटच्या दिवशी गोपालकाल्याचे कीर्तन झाल्यानंतर दहीहंडी झाली. यात दहीहंडी फोडल्यानंतर प्रत्येक जण एकमेकांवर दही उडवत होते, त्याचा प्रसाद म्हणून स्वीकार करत होते. आठवडाभराच्या उत्सवात रोज कीर्तनातून समाजप्रबोधन होत होते. यात श्रोत्यांमध्ये मोठ्यासंह तरुणांचा सहभाग सर्वाधिक होता. कीर्तनाच्या माध्यमातून आपल्या संतांची थोरवी ते ऐकून घेत होते. या कीर्तनकारांना, साधुसंतांना शेवटच्या दिवशी बिदागी देण्यात आली आणि त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. उत्सवाची परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे. यात कुठेही खंड पडला नाही. उलट यात तरुणांचा सहभाग वाढत आहे. महाप्रसादाला तर तरुणांचा सहभाग पाहण्यासारखा असतो. सर्व जण जमिनीवर बसून भोजन घेत होते. एक पंगत उठली की दुसरी पंगत बसण्याअगोदर उष्ट्या पत्रावळी उचलून झाडून पुन्हा भोजनासाठी जागा तयार करण्यात येत होती. यात कुठेही कुणाचेही उणेदुणे काढत नव्हता. अशा सहभागातून सामाजिक सलोख्याची भावना प्रबळ होत होती.

या उत्सवाच्या निमित्ताने शेजारच्या गावातील, नागपूरसह अनेक शहरातील लोक येथे भेट देतात आणि यात्रा म्हटली की दुकाने आलीच. त्यानुसार वेगवेगळ्या साहित्याची, खाद्यपदार्थांची दुकाने येथे मोठ्या प्रमाणात थाटली होती. अनेकांना रोजगार मिळाला. हातात पैसा खेळत असल्याने आनंद दुणावला होता. आधुनिकीकरणाच्या काळात यात्रेत काही बदल झाले, पण ते स्वीकारणेही आवश्यक आहेत. पारंपरिक पदार्थांसह चिनी खाद्यपदार्थांचीही दुकाने मोठ्या प्रमाणात होती. पण गावातील आर्थिक बळकटीसाठी ते स्वीकारल्याशिवाय पर्याय नाही. यात्रेच्या निमित्ताने बैल बाजारही लागला होता. यात अनेक प्रकारच्या बैलांची खरेदी-विक्री झाली. बैल खरेदीची प्रक्रिया अनुभवणे मोठे रंजक असते. तो अनुभवही अनेकांनी घेतला. यात्रेच्या निमित्ताने विविध प्रकारचे लोक एकत्र येत असल्याने सामाजिक एकरूपता साधली जाते. सर्वच जण सर्वांमध्ये एकरूप होतात आणि एकात्मतेची भावना वाढीस लागते. हा संदेश केजाजी महाराजांच्या पुण्यतिथी उत्सवाच्या निमित्ताने सर्वांना आला. गावाच्या प्रवाही, निर्मळ, स्वच्छ वातावरणात, मानवतेच्या विचारांचा अमृतकुंभ कायम राहावा, हीच अपेक्षा.

९८५०७५३२८१

## मुंबई वार्तापत्र

# सर्व काही शांत हीच अशांतता!

**नागेश दाचेवार**



केंद्रात वाटा नाही, उलट केंद्र सरकार विरोधात, राज्यात वाटा नाही, उलट राज्य सरकार विरोधात, मुंबई महापालिकेत कधीचेच बाहेर आहेत. आता निवडणुका कधी होतील याची शाश्वती देखील नाही. झाल्यातरी उबाठा सत्तेत येईलच याचीही शक्यता धूसरच आहे. त्यामुळे उद्धव ठाकरेंना आता आपले उरलेले ९ खासदार आणि २० आमदार कसे टिकवायचे याची चिंता लागली आहे. या हताशेतून, उबाठा गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि त्यांचे विश्वप्रवक्ते संजय राऊत या दोघांची अलिकडल्या काळात जाहीर होत चाललेली घालमेल, कालवाकालव यातून त्यांची अस्वस्थता लक्षात येते. मुळात ही घालमेल आणि अस्वस्थता केवळ सत्तेत सहभागी होण्यासाठीची आहे. सतत प्रयत्न करून देखील भाजपा मात्र, यांना ताकास तूर लागू देत नसून, सरकार शांत आणि संयमाने अग्रेसर होताना दिसत आहे. सरकारचं कामकाज शांततेत चाललं असल्यामुळे "सर्व काही शांत शांत त्यामुळेच ठाकरेंचं मन अशांत", अशी ठाकरे ॲण्ड कंपनीची परिस्थिती झालेली आहे.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर शिवसेना आणि भाजपाची २५ वर्षांची युती तुटली, नव्हे मुख्यमंत्रिपदाच्या मोहापोटी उद्धव ठाकरेंनी निवडणुकीपश्चात तोडली. भाजपासोबत निवडणूक युतीत लढली आणि गद्दारी करत युती तोडून उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर हातमिळवणी केली. रडत रडत अडीच वर्षे कशीबशी निघाली आणि एकेदिवशी एकनाथ शिंदे यांनी ४० आमदारांसह भाजपाबरोबर जाण्याचा निर्णय घेतला. शिवसेनेत उभी फूट पडल्याने महाविकास आघाडीचं सरकार कोसळलं. परिणामी नाईलाजाने उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. पदावरून पायउतार करण्यात भाजपाचाच हात असल्याचा समज करत, उद्धव ठाकरे यांनी सातत्याने भाजपाला, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांच्यावर अत्यंत खालच्या पातळीवर टीका करण्याचा धंदा चालवला. तसं तर, हा प्रकार ठाकरे ॲण्ड कंपनीने २०१९ मध्ये भाजपाच्या पाठीत खंजीर खुपसून युती तोडत काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत गेल्यानंतर लगेचच सुरू केला होता. पण तेव्हा तो विजयाचा उन्माद होता. त्यानंतर २०२२ मध्ये सत्ता असताना, एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांच्या नाका खालून आमदार पळवून, उद्धव ठाकरेंना खुर्चीतून अपमानास्पदरीत्या खाली खेचत सत्तेतून बेदखल केले आणि भाजपासोबत सरकार स्थापन केले. त्यामुळे एक आपला नोकर, चपला उचलायचा सोडून, माझी अर्थात मालकाची सत्ता उलथवून गेला. या धक्क्यातून ठाकरे सावरले नाहीत. त्यांना झोंबलेली मिरची बदल्याच्या भावनेतील उत्युच्च शिखरावर घेऊन गेली. मग काय सूड सूड आणि सूड उगवायचा... अशीच यांची बोल भाषा नेहमी राहिली. त्यानंतर गद्दारांना धडा शिकवायला निघालेल्या ठाकरेंना लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या प्रचंड यशानंतर तर हे कुठेच मावेनासे झाले होते. तरीही तो विजय केवळ ०.४२ टक्के मतांच्याच फरकाचा होता. मात्र, मोठा विजय असल्याने आता निवडणूक लागण्यापूर्वीच राज्यात आपली सत्ता येणारच, नव्हे आलीच आहे अशा भावनेतून, दिल्लीपासून, गल्लीपर्यंत उद्धवसाहेबांनी मुख्यमंत्री मला करा, यासाठी चपला झिजवल्या. जणू निकाल लागले, बहुमत आलं आता केवळ सरकार स्थापन करायचं तेवढं राहिलं असल्याच्या नंदनवनात वावरताना ते दिसत होते. मात्र, विधानसभा निवडणुकीत त्यांचा अहंकार महाराष्ट्राच्या जनतेने चक्काचूर केला. केवळ २० जागा कशाबशा त्यांच्या वाट्याला आल्या. त्याचवेळी धडा शिकवायला निघालेल्या, ठाकरेंच्या लेखी गद्दार असलेल्यांना ५७ जागा देत भक्कम पाठिंबा महाराष्ट्राच्या जनतेने एकनाथ शिंदेंना दिला. आता शिंदेंचं राजकीय भविष्य भाजपासोबत उज्ज्वल दिसत आहे. दुसरीकडे शरद पवारांनी १९७८ मध्ये केलेल्या गद्दारीचा कित्ता उद्धव ठाकरेंकडून २०१९ मध्ये गिरवून घेत, महाराष्ट्रात पुन्हा सत्तेत येण्याचा डाव यशस्वी केला. मात्र, शरद पवारांच्या या खेळीने उद्धव ठाकरेंच्या पक्षाच्या जीवावर बेतेल याची किंचितही कल्पना ठाकरेंना आली नाही. ते खुर्ची आणि पुत्र मोहात गेले. ठाकरेंची हीच नस पकडत अर्थात फायदा घेत पवारांनी स्वतः सत्तेत येण्याचा डाव रचला आणि तो यशस्वी देखील झाला. हे करत असताना पवारांनी मात्र, 'बॅक डोअर डिप्लोमसी' सुरूच ठेवली. त्यांनी भाजपासोबत चर्चेसाठीचा एक दरवाजा सुरू ठेवला. मात्र, त्याचवेळी पवारांच्या चक्रव्यूहात अडकलेल्या ठाकरेंनी भाजपासोबत थेट दुश्मनी घेतली. आता शरद पवार, सुप्रिया सुळे आणि त्यांचे नेते भाजपा नेत्यांसोबत थेट भेटतात संवाद साधतात. मात्र, त्याचवेळी ठाकरे ॲण्ड कंपनीला भाजपानेते फाट्यावर मारत असल्याचे चित्र दिसते. अशा परिस्थितीत आता सत्तेत नव्हे तर किमान राज्याच्या राजकारणात टिकून राहायचे असेल तर, भाजपासोबत जुळवून घेतले पाहिजे असे आता उद्धव ठाकरेंना कळून चुकले आहे. त्यामुळे आता भाजपासोबत जाण्यासाठी, ज्या मुखपत्रातून टीका करता करता दिवसं लोटली त्यातून कौतुक केलं जात आहे. एका भाजपा आमदाराच्या लेकीच्या लग्नात चंद्रकांत पाटलांनी शिष्टाचार म्हणून दोन शब्द गोड बोलले काय तर, यांच्या आशा एकदम पल्लवित झाल्या. पण भाजपाला शिंदेंची गरज नसली तरी, युतीत दिलेला शब्द आणि बांधिलकी जपणार आणि शिंदेंना कधीही सोडणार नाही असेच संकेत ते देत आहेत.

बरं ठाकरेपेक्षा माध्यमांनाच ठाकरेंचं भाजपासोबत सूत जुळविण्याचा अतिउत्साह आहे. फडणवीस, ठाकरे लिफ्टमध्ये भेट, लगेच भाजपा-उबाठा एकत्र येणारच्या बातम्या सुरू, ठाकरे, फडणवीसांच्या भेटीला... भाजपा-उबाठा छुपी युती, बातम्या सुरू, चंद्रकांत पाटील हसून बोलले, अनेकांच्या भुवया उंचावल्या... बातम्या सुरू. पण वस्तुस्थिती, अमित शाहांनी शिर्डीच्या आपल्या भाषणातून स्पष्ट केली. कितीही लाईन लावा, यांचा नंबर लागणार नाही, हीच वस्तुस्थिती आहे.

९२७०३३३८८६

### विकासासोबतच अस्तिनीतल्या सापांवर कारवाई हवीच

भारतातले हिंदू सहिष्णू आहेत. त्यांच्या याच गुणांमुळे भारतावर म्लेंच्छ, पोतुर्गीज, मोगल, इंग्रजांनी आक्रमणे केलीत व येथील संस्कृतीचे अतोनात नुकसान केले. पर्यायाने जागतिक शांततेला सुद्धा धक्का पोहोचला. कुठल्याही प्रकारचे नियंत्रित वा प्रसार करणारी संघटना नसतानाही हिंदू धर्म जगात लोक आपणहून अवलंबित आहेत. हिंदूची शांततामय संस्कृती लोकांना भावते व लोक आकर्षित होतात.

पण या सहिष्णुतेचा फायदा काही हिंसक लोक घेतात. भारतात घुसखोरी करणारे काही परदेशी नागरिक उदात्त हेतूने येत नाहीत, भारतीय संस्कृतीविषयी त्यांना कवडीचेही प्रेम नाही. उलट काही काळानंतर येथे उत्पात करणे, हेच त्यांचे ध्येय असते. हे स्पष्ट माहीत असूनही सरकार अशा समाजकंटकांविरुद्ध कठोर कारवाई का करत नाही, हे एक कोडेच आहे. अशा मवाळ धोरणांमुळे छुपे भारतद्वेषी व भ्रष्टाचारी यांचे फावते व उपद्रवी घुसखोरांना ते नकली कागदपत्रे बनवायला मदत करतात. बहुसंख्य भारतीयांची मागणी आहे की असे अस्तिनीतले साप असलेल्या राष्ट्रद्रोही लोकांवर सरकारने कुठलाही मुलाहिजा न ठेवता कठोर कारवाई करावी व देशावर येऊ घातलेले संभाव्य संकट टाळावे. विकासाबरोबरच अशा कारवाईला सरकारने विनाविलंब प्राथमिकता द्यावी.

**गणेश ज. हजारे**/८६९८८१५५५९

### प्रसार माध्यमांचे हिंदुद्वेषी स्वरूप !

१४४ वर्षांनी येणाऱ्या या महाकुंभमेळ्याचे दैवी महत्त्व सूर्य आणि गुरू ग्रह यांच्या विशिष्ट राशींमधील योगावर आधारित आहे. या अभूतपूर्व मेळ्याने भारताची सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरा जागतिक स्थरावर पोहचवण्याची सुवर्णसंधी निर्माण केली आहे.

महाकुंभमेळा केवळ हिंदू धर्मासाठीच नव्हे, तर मानवी जीवनात अध्यात्माचे महत्त्व सांगणारा सोहळा आहे. जगभरातील जिज्ञासू, भक्त आणि साधक या मेळ्याला उपस्थित राहून आध्यात्मिक अनुभूती घेतात. तरीही, काही विदेशी प्रसारमाध्यमे यांचा महाकुंभमेळ्याविषयी नकारात्मक दृष्टिकोन असणे चिंतेचा विषय आहे. नागा साधूंवर होणारी टीका आणि कुंभमेळ्याचे विकृत चित्रण हा भारतीय संस्कृतीवर झालेला दुर्दैवी हल्लाच आहे.

## वाचक पत्रे



वारेमाप प्रसिद्धीसाठी महाकुंभमेळ्यात काही व्यक्तींवर माध्यमांनी केंद्रित होणे, ही आध्यात्मिक घटनेच्या मूळ उद्देशाला बाधा आणणारी बाब आहे. कुंभमेळ्याचा मूळ उद्देश 'धर्म' आणि 'मोक्ष' यांचे महत्त्व अधोरेखित करणे आहे, 'अर्थ' आणि 'काम' यांचे नव्हे. माध्यमांनी आपल्या उथळ विचारांवर नियंत्रण ठेवून या महोत्सवाचे खरे सौंदर्य आणि आध्यात्मिक मूल्य जगासमोर मांडणे आवश्यक आहे. महाकुंभमेळा ही भारताची सांस्कृतिक परंपरा आणि आध्यात्मिक साक्ष आहे. ही घटना भारताची पत उंचावणारी आहे आणि तिचा योग्य सन्मान राखणे, तसेच प्रसारमाध्यमांनी प्रामाणिक दृष्टिकोन ठेवणे हे अत्यावश्यक आहे. ईश्वर कृपेने जागृत हिंदू संघटना, संत, महंत, भक्तांनी मिळून प्रसार माध्यमांना वेळीच आवर घालण्यासाठी भाग पाडले. देशातील सुज्ञ नागरिकांनी अशा प्रकारच्या हिंदुद्वेषी प्रसार माध्यमांकडे लक्ष न देता कुंभमेळ्याचा आध्यात्मिक लाभ करून घ्यावा ही विनंती. तसेच अपप्रचार करणाऱ्या प्रसार माध्यमांना चोख उत्तर देणे आवश्यक आहे. जेणे करून पुन्हा अशी कृती करण्यास कुणी धजावणार नाही.

**हृषीकेश हरदास**/वर्धा

### सदैव सकारात्मक असावे

समाजात आज नकारात्मकता मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. बालपणापासून ते वृद्धांपर्यंत पदोपदी व क्षणोक्षणी प्रत्येक बाबतीत नकारात्मकता वाढलेली दिसून येत आहे. व्यक्ती जीवनातील ही नकारात्मकता त्या व्यक्तीच्या दैनंदिन व व्यावहारिक जीवनावर अनिष्ट व घातक परिणाम करते. नकारात्मक वृत्तीने व्यक्ती नैराश्य अवस्थेत राहते. यामुळे नको त्या जीवघेण्या आजाराला बळी पडते. नकारात्मकतेने मन:स्थिती अस्थिर बनते व दैनंदिन कामे, व्यावहारिक कामे, कौटुंबिक कामे यात मन रमत नाही. शारीरिक,



मानसिक, भावनिक, वैचारिक दुर्बलता जडते व व्यक्ती कमालीची दुबळी व दुर्बल बनते. यास्तव समाजातील प्रत्येकाने जे आहे त्यात समाधान, सुख व आनंद मानावा. नित्य गोष्टी, नित्य कामे, सुस्थिर मन व्यक्तीला भरभरून सुख, समृद्धी व वैभव देतात. अनित्य व अनिष्ट गोष्टी माणसाला सदैव दुःख, पीडा व असमाधान देतात. यासाठी माणसाने सदैव सकारात्मक असावे, आशावादी असावे, आनंदी असावे, समाधानी असावे. यामुळेच तो सुखी व समाधानी राहू शकतो, हे नक्की.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

## संक्षिप्त वृत्त



### सोनामाता विद्यालयात वह्या वाटप

**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा गांधी फोरमतर्फे महात्मा गांधीजींच्या पुण्यतिथीनिमित्त सोनामाता कन्या विद्यालय सात रस्ता सोलापूर येथील शाळेमध्ये गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना गांधी फोरमचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री पुरुषोत्तम बलदवा यांच्या हस्ते वह्या वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी जिल्हा गांधीफो रमचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, राज्याचे अध्यक्ष उपेंद्र ठाकर, सचिव नंदकुमार यल्ला, मुख्याध्यापक जिलानी पटेल उपस्थित होते. सुरुवातीला सर्व मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधीजींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. स्वागत व प्रास्ताविक सौभाग्यवती अत्रे यांनी केले. यावेळी जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी सकारात्मक व वैज्ञानिक दृष्टीने विचार करून विज्ञानाची कास धरा असे त्यांनी आवाहन केले. यावेळी प्रशालेतील सर्व विद्यार्थ्यांना वह्या वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला.



### डॉ. आंबेडकर उद्यानातील कामाचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणी

**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

न्यू बुधवार पेठ येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात बसवण्यात येणारा माता रमाई यांचा पुतळा मूळ स्वरूपात करावा.या उद्यानातील आतापर्यंतच्या कामाचे स्ट्रक्चरल ऑडिट करावे यांसह विविध मागण्यांचे निवेदन बहुजन समाज पार्टीच्या वतीने महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांना देण्यात आले. मागील दोन वर्षापासून उद्यानाचे काम बंद आहे महापालिकेच्या अधिकारी जाणून बुजून दुर्लक्ष करीत आहेत. मक्तेदारास पाठीशी घालण्याचे काम महापालिकेच्या वतीने सुरू आहे. मक्तेदाराकडून चुकीच्या पद्धतीने बिल दाखवण्यात आल्याचा संशय आहे. त्यामध्ये बांधण्यात आलेल्या चबुतऱ्याचे बिल ८० ते ९० लाख दाखवण्यात आला असल्याचा आरोप ही यावेळी केला आहे. यासंदर्भात बहुजन समाज पार्टीच्या पदाधिकाऱ्यांसोबत तत्काळ बैठक घेण्यात यावी अन्यथा बहुजन समाज पार्टीच्या वतीने दि. ७ फेब्रुवारी २०२५ रोजी माता रमाई आंबेडकर यांच्या जयंती दिवशी तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. याप्रसंगी प्रदेश कार्यकारणी सदस्य ॲड. संजीव सदाफुले, प्रशांत लोकरे, जिल्हा प्रभारी तिपन्ना लोहार, शहराध्यक्ष देवा उघडे, शहर प्रभारी सुहास सुरवसे, शहर युवा अध्यक्ष अमरसेन साळवे, प्रवीण कांबळे, संजय गायकवाड, महेंद्र कांबळे, युवराज बडेकर, आनंद माने आदी उपस्थित होते.

**वाहतूक नियम मोडणाऱ्यांवर कठोर कारवाईसाठी**

# आरसी आणि लायसन्स आधारशी जोडले जाणार

### वाहनधारकांसाठी नवी प्रक्रिया सुरू होणार

### नियम मोडणाऱ्यांवर अंकुश

**नवी दिल्ली, दि. ३१ जानेवारी -**

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांवर कठोर कारवाई करण्यासाठी केंद्र सरकारने नवा निर्णय घेतला आहे. यानुसार, वाहनांचे नोंदणी प्रमाणपत्र (आरसी बुक) आणि चालक परवाना (लायसन्स) आधारशी जोडले जाणार आहेत. यामुळे वाहतूक नियम मोडणाऱ्यांना शोधून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणे सोपे होणार आहे.

**काय आहे कारण?...**

वाहतूक नियम मोडणारे अनेक लोक वेगवेगळ्या युक्त्या वापरून दंड टाळतात. मोबाइल आणि पत्ता बदलणे हे त्यातील मुख्य उपाय आहेत. परिणामी, नियम मोडल्यावर त्यांना ई-चलन किंवा इतर दंडात्मक नोटीस पाठवणे कठीण होते. आरसी आणि लायसन्स आधारशी जोडल्यास ही समस्या दूर होईल आणि दंड वसुलीस गती मिळेल.

#### परिणाम आणि फायदे

१. वाहनधारकांची अचूक माहिती, वाहनांच्या मालकांची खरी माहिती आधार डेटाबेसच्या साहाय्याने मिळू शकेल.

२. वाहतूक नियम मोडणाऱ्यांवर त्वरित कारवाई, ई-चलन आणि नोटिसा थेट वाहनधारकांच्या आधारशी संलग्न मोबाइल क्रमांक आणि पत्त्यावर पाठवता येतील.

३. नव्या धोरणामुळे जुने विक्रमी डेटा अद्ययावत होणार, परिवहन विभागाकडे अजूनही ६०, ७० आणि ८० च्या दशकातील वाहनांची नोंदणी माहिती आहे, परंतु ती कालबाह्य झालेली आहे. आधार जोडणीमुळे ही माहिती अद्ययावत करता येईल.

४. दंड वसुलीस गती मिळेल, जुने आणि नवीन दोन्ही प्रकारच्या प्रकरणांमध्ये दंड वसूल करणे सोपे होईल.

५. वाहतूक व्यवस्थापन सुधारेल, नियम मोडणाऱ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी सरकारला नवीन तंत्रज्ञानाचा लाभ घेता येईल.

#### नागरिकांनी काय करावे?...

आपले ड्रायव्हिंग लायसन्स आणि आरसी लवकरात लवकर आधारशी लिंक करावे. जर मोबाइल क्रमांक किंवा पत्ता बदलला असेल तर तो अपडेट करावा, अन्यथा महत्त्वाच्या नोटिसा मिळणार नाहीत.वाहतूक नियमांचे पालन करावे, अन्यथा ई-चलन आणि दंडातून सुटका मिळणार नाही. आरसी आणि लायसन्सला आधारशी जोडण्याच्या निर्णयामुळे वाहतूक नियमांची अंमलबजावणी अधिक प्रभावी होईल आणि वाहतूक व्यवस्थापन सुधारेल. तसेच, प्रलंबित दंड वसूल करून सरकारच्या तिजोरीत मोठी रक्कम जमा होण्यास मदत होईल. वाहनधारकांनीही या प्रक्रियेत सहकार्य करणे आवश्यक आहे, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल.

#### नवीन नियमांमुळे कायदा मोडणाऱ्यांना बसणार दणका

हा निर्णय अमलात आल्यानंतर वाहतूक नियम मोडणाऱ्यांना स्वतःहून दंड भरण्याशिवाय पर्याय उरणार नाही. सरकारकडून दंड वसुलीसाठी पगार कपात, बँक खाते जप्ती आणि मालमत्ता जप्ती यासारख्या कठोर उपाययोजना लागू करण्याचाही विचार केला जात आहे.

#### सरकारची पुढील पावले

परिवहन विभाग लवकरच वाहनधारकांसाठी एक अधिकृत नोटिफिकेशन जारी करेल. त्यात आरसी आणि ड्रायव्हिंग लायसन्स आधारशी जोडण्यासाठी ऑनलाईन व ऑफलाईन पद्धती स्पष्ट केल्या जातील. यासाठी परिवहन कार्यालये, वाहन डिलर्स आणि इतर एजन्सींकडून मदत घेतली जाणार आहे.

**१२,००० कोटींचा दंड प्रलंबित**

वाहतूक नियम मोडणाऱ्या वाहनचालकांकडून तब्बल १२,००० कोटी रुपयांचा दंड प्रलंबित असल्याचे सरकारी अहवालात स्पष्ट झाले आहे. अनेकांनी आपल्या वाहनांची खरी माहिती नोंदवलेली नाही किंवा त्यांचे संपर्क तपशील चुकीचे आहेत. त्यामुळे सरकारला दंड वसूल करण्यास अडचणी येतात. आधार जोडणीमुळे हे थेट दंडित व्यक्तीपर्यंत पोहोचवता येईल.

॥ जो जे वांछिल तो ते लाहो ॥
मनोरमा परिवार अंतर्गत
**सोलापूर जिल्हा मनोरमा सखी महिला नागरी सह. पतसंस्था मर्या., सोलापूर**
अंकुर रोपवाटीकेसमोर कोटणीस नगर, विजापूर रोड, सोलापूर
ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना
९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर
६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर
९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना
अधिक महितीसाठी संपर्क
सौ. येरगुंटे स्वाती सिद्राम, चेअरमन (मो.७९७२६४९८७१)
सौ. जयश्री भोरे, व्यवस्थापिका (मो. ९९२१९११०१०)

### बर्ड फ्लूबाबत सतर्कता पाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.३१ जानेवारी-**

राज्यातील काही जिल्ह्यामध्ये बर्ड फ्लू एव्हिएन इन्फ्लूएन्झा आजाराने कुक्कुट पक्षी व कावळ्यांमध्ये मरतुक झालेली आढळल्याने या रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रक्षेत्रावरील रोजची स्वच्छता व निर्जंतुकीकरण करून जैवसुरक्षा विषयक बाबींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे, असे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. एन. एल. नरळे यांनी सांगितले.

संशयित ठिकाणाहून पक्षांची वाहतूक टाळावी आणि ज्या ठिकाणी स्थलांतरीत पक्षी मोठ्या प्रमाणात आढळतात तेथील नागरिकांनी सतर्कता बाळगावी. मानवी आहारामध्ये व्यवस्थित उकडलेली अंडी व शिजवलेले चिकन खाणे पूर्णपणे सुरक्षित आहे, याबाबत कोणीही अनावश्यक गैरसमज व अफवा पसरवू नयेत, असे आवाहन पशुधन विकास अधिकारी, सधन कुक्कुट विकास गट, नेहरू नगर डॉ. स्नेहंका बोधनकर यांनी केले आहे. अचानक मोठ्या प्रमाणावर पक्षांमध्ये मरतुक आजाराचे लक्षणे आढळल्यास नजीकच्या पशुवैद्यकिय दवाखान्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.



### बँक ऑफ बडोदातर्फे मनपा देशमुख वस्ती शाळेत दप्तर वाटप

**सोलापूर, दि.३१ जानेवारी-**

मनपा देशमुख वस्ती शाळेमध्ये सी एस आर फंडातून बँक ऑफ बडोदाच्या वतीने विद्यार्थ्यांना दप्तर वाटप करण्यात आले. बँक ऑफ बडोदा चे मुख्य प्रबंध सुदिष्ट कुमार यांच्या हस्ते दप्तर वाटप करण्यात आले.

महानगरपालिकेमार्फत मिळालेल्या स्मार्ट टीव्हीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी बँक ऑफ बडोदाच्या जॉईन मॅनेजर श्वेता बनसूडे, ऑफिसर कल्याणी शिंदे व संगीता जोडमोठटे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुधीर येणकीकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बबन ऐवळे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक राहुल पाटील यांनी केले. सूत्रसंचालन नागेश गोसावी तर आभार संतोष सुतार यांनी मानले.

### नियोजन भवन येथील पालकमंत्री कार्यालयाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

नियोजन भवन इमारतीमधील पहिल्या मजल्यावर पालकमंत्र्यांसाठी संपर्क कार्यालय तयार करण्यात आलेले असून, या कार्यालयाचे उद्घाटन ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री गोरे यांनीच आज फित कापून केले. यावेळी त्यांनी कार्यालयाची पाहणीही केली.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, आमदार सर्वश्री सुभाष देशमुख, समाधान आवताडे, सचिन कल्याणशेट्टी, महापालिका आयुक्त शितल उगले तेली, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. यावेळी राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर



जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जिल्हा नियोजन समितीची बैठक झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाला भेट दिली व कार्यालयाची सविस्तर पाहणी केली. पालकमंत्री झाल्यानंतर प्रथमच गोरे यांनी आज प्रथमच जिल्हाधिकारी कार्यालयाला भेट

दिली. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाची रचना सांगून प्रत्येक शाखेच्या अधिकाऱ्याची व त्याच्या कामकाजाची माहिती पालकमंत्री महोदयांना दिली. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात आल्यानंतर अभ्यागतासाठी स्वतंत्र अभ्यागत कक्ष तयार करण्यात आलेला असून त्या कक्षाची ही पाहणी पालकमंत्री यांनी केली. यावेळी महापालिका आयुक्त शितल उगले तेली, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, तहसीलदार श्रीकांत पाटील व अन्य महसूल अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

#### जाहीर प्रसिद्धीकरण

दि. कि. अर्ज नं. १०/२०२५ नि.नं.०६
पुढील नेमलेली तारीख ०४/०३/२०२५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनि. डिव्हीजन साहेब यांचे कोर्टात**

**श्री. अविनाश गणपत झोळ, वगैरे ५ ----- अर्जदार**
**- विरुद्ध -**
**कोणी नाही ----- सा.वाला**

ज्याअर्थी यातील प्रस्तुत अर्जातील मयत गणपत सोपान झोळ याचे मौजे बार्शी येथे तारीख १९/०६/२०१५ रोजी मयत झालेले आहेत. त्यांना मौजे पांगरी, ता. बार्शी येथील जमीन आहे. अर्जदार हेच वर नमूद मयत व्यक्तीस कायदेशीर वारस आहेत. त्या अनुषंगाने प्रस्तुत अर्जदार यांनी मयत गणपत सोपान झोळ यांचे कायदेशीर वारस दाखला मिळणेकरीता अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविणेत येते की, वर नमूद अर्जदारांचे अर्जातील मागणीबाबत जर कोणाचे काही आक्षेप, हरकती असतील तर संबंधितानी हे जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत व पुढील नेमली तारखेस तारीख ०४/०३/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः अगर वा आपल्या विधीज्ञामार्फत म्हणणे मांडावे, लेखी स्वरुपात तक्रार करावी. मुदतीत कोणाची हरकत, तक्रार न आलेस सदर प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील याची नोंद घ्यावी.

हे जाहीर प्रसिद्धीकरण मे. कोर्टाचे सही व शिक्क्यानिशी दिले असे.
हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले. तारीख : २७/०१/२०२५

सही/- **कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा गोल शिक्का)
सही/- **सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

#### जाहीर प्रसिद्धीकरण

दि. कि. अर्ज नं. ११/२०२५ नि.नं.०५
पुढील नेमलेली तारीख ०४/०३/२०२५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनि. डिव्हीजन साहेब यांचे कोर्टात**

**श्रीमती गंगा उर्फ शिवगंगा शंकर झोळ, वगैरे ३ ----- अर्जदार**
**- विरुद्ध -**
**कोणी नाही ----- सा.वाला**

ज्याअर्थी यातील प्रस्तुत अर्जातील मयत शंकर सोपान झोळ याचे मौजे बार्शी येथे तारीख २०/०३/२०१५ रोजी मयत झालेले आहेत. त्यांना मौजे पांगरी, ता. बार्शी येथील जमीन आहे. अर्जदार हेच वर नमूद मयत व्यक्तीस कायदेशीर वारस आहेत. त्या अनुषंगाने प्रस्तुत अर्जदार यांनी मयत शंकर सोपान झोळ यांचे कायदेशीर वारस दाखला मिळणेकरीता अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविणेत येते की, वर नमूद अर्जदारांचे अर्जातील मागणीबाबत जर कोणाचे काही आक्षेप, हरकती असतील तर संबंधितानी हे जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत व पुढील नेमली तारखेस तारीख ०४/०३/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः अगर वा आपल्या विधीज्ञामार्फत म्हणणे मांडावे, लेखी स्वरुपात तक्रार करावी. मुदतीत कोणाची हरकत, तक्रार न आलेस सदर प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील याची नोंद घ्यावी.

हे जाहीर प्रसिद्धीकरण मे. कोर्टाचे सही व शिक्क्यानिशी दिले असे.
हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले. तारीख : २७/०१/२०२५

सही/- **कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा गोल शिक्का)
सही/- **सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

#### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः डि. व सब डि. ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील मौजे सदलापूर येथील लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन डि. व सब डि. सोलापुर पैकी ता. अक्कलकोट येथील मौजे सदलापूर शिवारातील बागायत शेतजमिन जीचा गट नं.२४८/१ पैकी खाते क्र.१३८५ याचे एकुण क्षेत्र १ हेक्टर २३ आर आकार २ रु.२१ पैसे यांसी चतुःसीमा पुर्वेस गट नं. २४८/२, पश्चिमेस गट नं. २४७/१, २४७/२/अ, २४७/२/ब, दक्षिणेस गट नं. २५१, उत्तरेस सदलापुर शिरवळ शिव रस्ता येणेप्रमाणे चतुःसीमेतील मिळकतीमधील बांध, झाडे-झुडपे, दगड, माती व स्वतंत्र व सामाईक वहिवाटीसह व इतर तद्भुत वस्तुसह वर नमुद केलेली मिळकत ही सचिन चंद्रकांत जकापुरे यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. सदर मिळकतीमधील वर नमुद मिळकत आमचे अशिलास कायम खुषखरेदीने विक्री करण्याचे मान्य व कबुल करुन आमचे अशिलांच्या नांवे विक्री करण्याचे ठरविले आहे. तसेच सदरची संपुर्ण मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे त्यांनी आमचे अशिलास खात्री दिलेली आहे. तथापि सदर मिळकतीवर कोणाचेही गहाण, दान, लिज, भाडे, लिव्ह ॲन्ड लायसेन्स, बक्षीस, साठेखत, खरेदी खत, पोटगी, टाच, जप्ती या व इतर अन्य कोणत्याही स्वरुपाचा बोजा, हक्क व हितसंबंध असल्यास अथवा सदर मिळकती संबंधी कोणाचेही, कोणत्याही न्यायालयात वाद-विवाद प्रलंबित असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर समक्ष भेटून तशी खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही, कसलीही तक्रार व हरकत न आल्यास सदरची मिळकत ही संपुर्ण निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे, असे समजुन आमचे अशील पुढील खरेदी खताचा व्यवहार पुर्ण करतील. तद्नंतर मात्र कुणाचेही, कसलीही तक्रार व हरकत चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन ही जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

ही जाहीर नोटीस दिली तारीख ०१/०२/२०२५

**सही /-**
**ॲड. बी.टी. जाधव**
**बी.कॉम., (ऑ.), एम.एस.डब्ल्यु., एल.एल.बी.**
**कार्यालय - ४०१, विजयराज मार्बल,**
**प्रेम नगर, जुळे सोलापूर - ४१३००४**
**मो.नं. ८८५७८७९९१० / ९०७५२८४१७०**

#### नोटीस

(U/O 5 Rule 20 CPC **प्रमाणे**)

**विद्यमान सहदिवाणी न्यायाधीश (व. स्तर) अचलपूर यांच्या न्यायालयात**

**एच.एम.पी. नं. १७६/२०२१** **चौ.ता. २१/०२/२०२५**

**स्वेता ----- वादी**
**- विरुद्ध -**
**विवेक ----- प्रतिवादी**

**बनाम :-** **विवेक देविदासराव मुंढे,**
रा. बार्शी, दत्तनगर, स्टेशन रोड, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

ज्याअर्थी, उपरिनामित वादी यांनी या न्यायालयाकडे अर्ज केला आहे की, सोबतच्या अर्जाप्रमाणे,

त्याअर्थी, याद्वारे तुम्हाला फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही सदर अर्जाविरुद्ध कारण दाखवण्याकरीता **दिनांक २१/०२/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता** या न्यायालयात व्यक्तिगत किंवा रीतसर निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर व्हावे, तसे न केल्यास उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

तुम्हाला अशी समन्स वृत्तपत्र जाहिरात मार्फत देण्यात येत आहे की, तुम्ही निर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी बजावणीकरीता पत्ता देण्यात कसूर केल्यास तुमचा बचाव विचारात घेतला जाणार नाही.

आज दिनांक १३/०१/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.
समक्ष प्रतिज्ञेवर

(कोर्टाचा गोल शिक्का)
आदेशानुसार
सही/-
**सहा. अधीक्षक (प्रशासन)**
दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर), अचलपूर

#### जाहीर प्रकटन

**लोकमंगल को–ऑप. बँक लि., सोलापूर** या बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेच्या संचालक मंडळातील इतर मागास वर्गीय मतदारसंघ या मतदारसंघातील एक जागा रिक्त झाली आहे. सदरची नैमित्तिक रिक्त झालेली पदे भरण्यासाठी **शनिवार दि. ०८/०२/२०२५ सकाळी ११.०० वाजता बँकेच्या १२८–अ, मुरारजी पेठ, सेवासदन शाळेजवळ, सोलापूर – ४१३००१** येथील प्रधान कार्यालयात संचालक मंडळ सभेचे आयोजन **मा. श्री. यू. यू. पवार, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सोलापूर** यांचे अध्यक्षतेखाली केलेले आहे.

सदर नैमित्तिक रिक्त पद भरण्यासाठीचा निवडणूक कार्यक्रम व मतदार यादी सभेच्या ठिकाणी नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेली आहे. इच्छुक उमेदवारांनी आपल्या ओळखपत्रांच्या छायांकित प्रतीसह सभेच्या ठिकाणी विहित वेळेत उपस्थित राहावे.

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक :०१/०२/२०२५**

**स्वाक्षरी**
**प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी**
**लोकमंगल को–ऑप. बँक लि., सोलापूर.**

#### जाहीर समन्स/नोटीस

**अर्ज नं. ४२/२०२३**
**पुढील नेमलेली तारीख : १८/०३/२०२५**

**बार्शी येथील मा. तहसीलदार साहेब यांचे कोर्टात**

**प्राजक्ता पोपट यादव ----- अर्जदार**
**- विरुद्ध -**
**अंबऋषी आगतराव मोरे, वगैरे ----- सामनेवाला**

**प्रति,**
**अंबऋषी आगतराव मोरे,** वय- सज्ञान,
धंदा- शेतील रा. मु.पो. नांदणी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

ज्याअर्थी, अर्जदार यांनी सामनेवाला यांचे विरुद्ध मा. तहसीलदार साहेब बार्शी यांचेकडे सामनेवाला नं. १ अंबऋषी आगतराव मोरे यांचे मौजे नांदणी येथील गट नं. २२०/१, २२०/२ या शेतजमिनीचे इतर अधिकारातील नाव कमी करणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जाकामी मे. कोर्टाने वेळोवेळी सामनेवाला नं. १ यांचे विरुद्ध त्यांचे पत्त्यावरती समन्स/नोटीसा रजि. पोस्टाने काढलेल्या आहेत. सदर अर्जाचे समन्स/नोटीस घेवून संबंधित पोस्टमन, महसूल कर्मचारी सरनाम्यात दिलेल्या नमूद पत्त्यावर बजावणीकरिता गेले असता, सदर पत्त्यावर समन्स/नोटीस बजावणी होत नाही/झाली नाही. तुम्ही जाणीवपूर्वक समन्स/नोटीसची बजावणी हेतुपुरस्सर टाळाटाळ करीत आहात. तुम्हास सदर अर्जाचे समन्स/नोटीस बजावणी होणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे.

त्याअर्थी, या जाहीर समन्स/नोटीसीद्वारे आपणास सूचित करण्यात येते कील, आपण सदर अर्जाचे कामी हे जाहीर समन्स/नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अथवा पुढील नेमलेली तारीख १८/०३/२०२५ रोजी स्वतः अथवा माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होवून मुदतीत आपले म्हणणे लेखी स्वरुपात मा. न्यायालयात सादर करावे. मुदतीत आपण हजर होवून आपले म्हणणे दिले नाही तर आपणांस सदर समन्स/नोटीस बजावणी होवूनही आपणांस काहीही सांगायचे नाही असे समजून मा. न्यायालय सदरकामी पुढील यथायोग्य हुकूम/आदेश होतील/करतील याची नोंद घ्यावी.

सदरचे जाहीर समन्स आमचे सहीनिशी व मे.कोर्टाचे सही शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे.
तारीख : ३०/०१/२०२५

(तहसीलदार बार्शी गोल शिक्का)
सही/-
**तहसीलदार बार्शी**

#### सावधानतेची जाहिर नोटीस

जिल्हा: सोलापूर, तालुका: करमाळा, गाव : करमाळा (ग्रामीण) येथील तमाम रहिवाश्याना सदर सावधानतेच्या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

१) सदर जिल्हा सोलापूर, तालुका करमाळा, गाव करमाळा (ग्रामीण) येथील शेतजमीन याचा गट नं. २२५/४ त्याचे क्षेत्र १.६६ आर. आणि गट नं. २२५/२ त्याचे क्षेत्र १.८० आर. सदरची शेतजमीन आमचे अशिलांचे आजोबा कै. विश्वनाथ भणगे यांचे स्वकष्टार्जित मालकीची व कब्जेवहिवाटीची होती व आहे. सदर विश्वनाथ भणगे यांना सौ. अंबिका व विजया अशा दोन विवाहीत पत्नी होत्या. सदर विश्वनाथ भणगे व त्यांच्या दोन्ही पत्नी मयत झालेल्या आहेत. सदर. कै. अंबिका विश्वनाथ भणगे यांना त्यांचे पती विश्वनाथ भणगे यांच्यापासुन प्रकाश आणि मंगला ऊर्फ प्रमिला अशी अपत्ये आहेत. सदर प्रकाश हा मयत असुन, त्याला अमित, राहुल आणि गायत्री अशी अपत्य आहेत. सदर मंगला ऊर्फ प्रमिला हिस सुरेखा, सुहासिनी, सुनंदा, सुधा, कल्पना, प्रतिभा, शुभांगी अशा सात मुली असुन प्रशांत नावाचा एक मुलगा आहे.

२) सदर कै. विजया हिला विश्वनाथ भणगे याचे पासुन प्रभाकर, प्रमोद, दिपक, प्रविण अशी चार मुले तर विमल ऊर्फ वैशाली अशी मुलगी अशी अपत्ये झालेली आहेत. सदर विजया ही विश्वनाथ भणगे यांची विवाहाची दुसरी पत्नी आहे.

सदर वंशावळी व वारसाची वर नमुद केल्याप्रमाणे खरी वस्तुस्थिती असताना, सदर सुनंदा व्यंकटेश सत्येगिरी आणि प्रतिभा जगदीश कुलकर्णी आणि प्रशांत दत्तात्रय दुसे यांनी मिळून संगंनमताने सदर वर नमुद परिच्छेद १ मधील शेतजमीन ही इतर वारसांचा हक्क व हिस्सा डावलून सुनंदा हिने तिचा मुलगा राघवेंद्र तर प्रतिभा हिने तिचा मुलगा ओंकार आणि . प्रशांतने स्वत:ची नावे सदर मिळकतीवर बेकायदेशीररित्या नाव लावून घेतले आहे आणि सदरची शेतजमीन फक्त त्यांच्या मालकीची आहे असे दर्शवुन व भासवुन विक्री करणार असल्याचे आमचे अशिलांना खात्रीपुर्वक समजलेले आहे. सदर शेतजमीनीमध्ये आमचे अशिल सौ. सुधा ऊर्फ प्राजक्ता प्रशांत बडवे रा. सोलापूर मो. नं. ९८२२०९७६८८ यांचा प्रत्यक्ष असा अविभक्त हिस्सा असून ते त्याचे मालक आहेत. सदर शेतजमीनीच्या कोणत्याही लेखी अथवा तोंडी वाटण्या झाल्या नसुन, सदर आमचे अशिलांचे आजोबा कै. विश्वनाथ भणगे अथवा आमचे अशिलांच्या आजी अंबिका. आणि विजया यांनी मृत्यूपुर्वी सदर शेतजमीनीबाबत कोणतेही मृत्यूपत्र लिहून ठेवलेले नाही अथवा वाटण्या देखील केलेल्या नाहीत.

सबब तमाम लोकांस कळविण्यात येते की, सदर वर नमुद शेतजमीनीमध्ये आमचे अशिलांचा अविभक्त हिस्सा असल्याने, सदरची शेतजमीन आमचे अशिलांच्या संमतीशिवाय कोणीही कोणाकडुन ही विकत घेऊ नये अथवा त्याबाबतचा कसलाही व्यवहार करु नये याउपर तसे केल्यास सदरचा व्यवहार हा बेकायदेशीर ठरुन, तो आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही. तसेच सदर व्यवहारातून कोणाचीही फसगत अथवा फसवणुक झाल्यास त्यास आमचे अशिल अथवा इतर वारसदार जबाबदार असणार नाहीत. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन सदरची सावधानतेची जाहिर नोटीस दिली आहे. सदरची नोटीस आजरोजी सोलापूर मुक्कामी दिली आहे.

हि सावधानतेची जाहिर नोटीस दिली तारीख: ३१/०१/२०२५.

**अशिल**
**सौ. सुधा उर्फ प्राजक्ता प्रशांत बडवे**
रा. ५४१, उत्तर कसबा, चौपाड,
सोलापूर ४१३ ००७. मो. ९८२२०९७६८८


अशिला तर्फे ॲडव्होकेट
**ॲड. प्रदिपसिंग मो. राजपुत**
ऑफिसः फ्लॅट नं. २, गिरीराज अपार्टमेंट,
उत्तर सदर बझार, लष्कर, सोलापूर.
मो. ९८२२४९८५०२, ९१३००४२१५७

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### मोदींच्या 'फिटनेस' उपक्रमात सहभागी व्हा : विजेंदर सिंग



**नवी दिल्ली** : ऑलिम्पिक कांस्यपदक विजेता मुष्टियोद्धा विजेंदर सिंगने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'फिट-इंडिया इनिशिएटिव्ह'चे स्वागत केले आणि संतुलित आहार आणि तंदुरुस्तीला प्रोत्साहन देण्यासाठी ही एक उत्तम चळवळ असल्याचे म्हटले. या मोहिमेचा अनेकांना फायदा होऊ शकतो. जर तुम्ही मधुमेहाचे रुग्ण असाल किंवा लठ्ठपणाने ग्रस्त असाल तर आहारात काही बदल करा आणि व्यायामाला महत्त्व द्या, असे विजेंदर म्हणाला. विजेंदरने २००८ च्या बीजिंग ऑलिम्पिकमध्ये मध्यम वजन गटात कांस्यपदक व २००९ च्या इटलीतील मिलान येथे झालेल्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक जिंकले. हरयाणातील भिवानी येथील रहिवासी विजेंदर म्हणाला की, पंतप्रधानांच्या फिट इंडिया इनिशिएटिव्हमध्ये आपल्या दैनंदिन दिनचर्येत लहान बदल करण्यावरही भर दिला जातो व त्यामुळे आपले आरोग्य सुधारेल. मला वाटते की हा एक उत्तम उपक्रम आहे आणि आम्ही पंतप्रधानांच्या मोहिमेला पाठिंबा देतो व सर्वांनी पुढे येऊन पंतप्रधानांच्या 'फिट इंडिया इनिशिएटिव्ह'ला उत्साहाने पाठिंबा द्यावा, असे ऑलिम्पिक पदक जिंकणारा पहिला मुष्टियोद्धा विजेंदर म्हणाला.

### भारोत्तोलक बिंद्याराणीने विक्रमासह जिंकले सुवर्ण

**डेहराडून** : शुक्रवारी डेहराडून येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महिलांच्या ५५ किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकण्याच्या प्रयत्नात मणिपूरची स्टार भारोत्तोलक एस. बिंद्याराणी देवी हिने स्नॅचमध्ये राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक विजेती बिंद्याराणी हिने स्नॅच प्रकारात ८३ किलो वजन उचलण्याच्या प्रयत्नात सुरुवातीच्या अडचणींवर मात केली. तिने उल्लेखनीय लवचिकता दाखवली आणि राष्ट्रीय विक्रम मोडण्याच्या आपल्या शेवटच्या प्रयत्नात ८८ किलो वजन उचलले. तिने मीराबाई चानूचा ८६ किलो वजनी गटाचा विक्रम मोडला. बिंद्याराणीने क्लिन अ‍ॅण्ड जर्कमध्येही वर्चस्व गाजवले. तिने पहिल्या प्रयत्नात १०७ किलो वजन उचलले. दुसऱ्या प्रयत्नात ती ११२ किलो वजन उचलण्यात अपयशी ठरली असली तरी, तिने शेवटच्या प्रयत्नात ११३ किलो वजन उचलून पुनरागमन केले. तिचे एकूण २०१ किलो वजन उचलणे तिच्या २०२ किलो वजनाच्या राष्ट्रीय विक्रमापेक्षा फक्त एक किलो कमी होते. मणिपूरच्या आनंदात भर घालत एल. निलम देवीने कांस्यपदक मिळवले.

### दोन्ही खो-खो संघ जेतेपदापासून एक पाऊल दूर!

**हलद्वानी** : गतविजेत्या महाराष्ट्राच्या महिला व पुरुष या दोन्ही खो-खो संघांनी ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत अपेक्षेप्रमाणे अंतिम फेरीत धडक दिली. जेतेपदापासून एक पाऊल दूर असलेल्या महाराष्ट्राच्या मुली अंतिम फेरीत ओडिशा संघाशी भिडतील. महाराष्ट्राच्या महिलांनी उपांत्य लढतीत दिल्लीचा ८ गुण आणि एक डावाने (२४-१६) धुव्वा उडविला. महाराष्ट्राकडून प्रियंका इंगळे व अश्विनी शिंदेने प्रत्येकी २ मिनिटे ४० सेकंद वेळ पळती करत जबरदस्त संरक्षण केले. प्रियंकाने ६ गुणही मिळविले. कर्णधार संपदा मोरे (२ मिनिटे ३० सेकंद), संध्या सूर्वसे (२ मिनिटे) व गौरी शिंदे (२ मिनिटे) यांनीही संरक्षणात चोख भूमिका बजावली. दिल्लीकडून लक्ष्मी ओझा (१ मिनिट ४० सेकंद) व नंदिता प्रेमीने (१ मिनिट २५ सेकंद) उत्तम खेळ केला. पुरुष गटात महाराष्ट्राने पश्चिम बंगालची १० गुण व ७ मिनिटे राखून दाणादाण उडवली. शुभम थोरात व सुयश गरगटेने उत्तम खेळ केला. राहुल मंडल व सौरभ आढावकरनेही उत्कृष्ट कामगिरी केली.

### महाराष्ट्राचा महिला कबड्डी संघ उपांत्य फेरीत

**हरिद्वार** : कबड्डीमध्ये अपेक्षेप्रमाणे महाराष्ट्राच्या खेळाडूंनी ३८वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील महिला गटात उपांत्य फेरीकडे वाटचाल करीत पदकाच्या आशा कायम राखल्या. अटीतटीने झालेल्या लढतीत महाराष्ट्राने पश्चिम बंगाल या तुल्यबळ संघावर ३०-२२ अशी मात केली. महाराष्ट्राकडून सोनाली शिंगटे व मंदिरा कोमकरने उत्कृष्ट चढाया केल्या. रेखा सावंत हिने जोरदार पकडी करीत त्यांना चांगली साथ दिली. उपांत्य फेरीत महाराष्ट्राची हरयाणा संघाशी गाठ पडणार आहे.

### चॅम्पियन्स चषकासाठी धोनीचा थंडावा देणारा इशारा

**नवी दिल्ली** : आयसीसी पुरुषांच्या चॅम्पियन्स चषक २०२५ क्रिकेट स्पर्धेच्या एका आकर्षक नवीन प्रोमोमध्ये क्रिकेटचा दिग्गज खेळाडू महेंद्रसिंह धोनी पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. ज्यामध्ये स्पर्धेची 'सर्व काही असो वा नसो' ही तीव्रता दाखवण्यात आली आहे. 'हर मॅच डू-ऑर-डाय' या थीमभोवती बांधलेली ही मोहीम या प्रतिष्ठित स्पर्धेत संघांना येणाऱ्या अथक दबावाचे स्पष्टपणे चित्रण करते. धोनी एका अनपेक्षित अवतारात दिसतो- बर्फाळ प्रदेशात बर्फाने भरलेल्या बाथटबमध्ये बसलेला, तरीही प्रचंड दबावाखाली घाम गाळलेला दिसत आहे.

# इंग्लंडला नमवून भारत अंतिम फेरीत

## आयसीसी १९ वर्षांखालील महिला टी-२० क्रिकेट विश्वचषक

◆ **क्वालालम्पूर, ३१ जानेवारी**

निक्की प्रसादच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघाने गोलंदाजी व फलंदाजीचे जबरदस्त प्रदर्शन करत उपांत्य सामन्यात इंग्लंडचा ३० चेंडू शिल्लक ठेवत ९ गड्यांनी धुव्वा उडवला आणि आयसीसी १९ वर्षांखालील महिला टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. आता गतविजेत्या भारताला आपले विजेतेपद कायम राखण्यासाठी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध निर्णायक फेरीत खेळावे लागणार आहे.

पारुनिका सिसोदिया व वैष्णवी शर्मा व आयुषी शुक्ला या डावखुऱ्या फिरकी गोलंदाजांनी प्रभावी मारा करत इंग्लंडला मर्यादित षटकांत ८ बाद ११३ धावांवर रोखले. सलामीवीर जी. कमलिनी (५६) व त्रिशा गोंगाडीनेच्या (३५) दमदार फलंदाजीच्या बळावर भारताने अवघ्या १५ षटकांत १ बाद ११७ धावा काढून आपला विजय साकार केला व अंतिम फेरीत प्रवेश केला. २१ धावांत ३ बळी टिपणारी पारुनिका सिसोदिया सामनावीर पुरस्काराची मानकरी ठरली. कमलिनीने ब्रेटच्या चेंडूवर चौकार हाणत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.



जी. कमलिनीचे अर्धशतक



सामनावीर पारुनिका सिसोदियाचे ३ बळी

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या इंग्लंडकडून सलामीवीर डेव्हिना पेरीन (४५), कर्णधार अबी नोरग्रोव्ह (३०) व अमु सरेनकुमारने (१४) तेवढ्या दोन अंकी धावसंख्या रचल्या, परंतु इतर फलंदाज लवकरच आयुषी शुक्ला (२-२१), पारुनिका सिसोदिया (३-२१) व वैष्णवी शर्माच्या (३-२३) फिरकीला बळी पडलेत.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना जी. कमलिनी व त्रिशा गोंगाडीने ९ षटकांत ६० धावांची सलामी भागीदारी करून भारताला आर्धी लढाई जिंकून दिली. पुढे कमलिनी व सानिका चलकेने नाबाद खेळी करत भारताचा विजय साकारला. कमलिनीने ५० चेंडूंत ८ चौकारांसह नाबाद ५६ धावांची व सानिकाने नाबाद ११ धावांची विजयी खेळी केली. त्रिशा गोंगाडीने अवघ्या २९ चेंडूंत ५ चौकारांसह ३५ धावांची भर घातली. (वृत्तसंस्था)

# भारताने मालिका जिंकली

## चौथ्या टी-२० सामन्यात इंग्लंडचा १५ धावांनी पराभव

## मालिकेत 3-1 अशी आघाडी, हार्दिक पंड्याचे अर्धशतक

**पुणे** : इंग्लंडने गोलंदाजी आणि फलंदाजी या दोन्ही विभागांत दमदार सुरुवात केली होती. तरीही अखेर त्यांना चौथ्या टी २० सामन्यात पराभव पत्करावा लागला.

भारताने संयमी खेळ करत यावेळी फक्त चौथा टी २० सामनाच नाही तर मालिकाही आपल्या नावावर केली. चारपैकी तीन सामने जिंकत भारताने या मालिकेत ३-१ अशी विजयी आघाडी घेतली. शिवम दुबे आणि हार्दिक पंड्या यांनी मोक्याच्या क्षणी अर्धशतके झळकावली. या दोघांच्या अर्धशतकांच्या जोरावर भारताला प्रथम फलंदाजी करताना १८१ धावा करता आल्या. भारताच्या १८२ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना इंग्लंडची दमदार अर्धशतकी सुरुवात झाली होती. पण त्यानतर इंग्लंडचे फलंदाज एकामागून एक बाद होत गेले आणि भारताने इंग्लंडवर १५ धावांनी विजय साकारला.

भारताकडून शिवम दुबेच्या कन्केशन सब्स्टिट्यूट खेळाडू हर्षित राणाने ३ विकेट्स घेतल्या. रवी बिश्नोईनेही ३ तर वरुण चक्रवर्तीने २ विकेट्स घेतल्या. अर्शदीप सिंग आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली. फलंदाजीत



हार्दिक पंड्या आणि शिवम दुबे यांनी ५३-५३ धावा केल्या. शिवम आणि हार्दिक यांनी पाचव्या विकेटसाठी ७३ धावांची भागीदारी रचली आणि त्यामुळेच भारताला १८१ धावांपर्यंत मजल मारता आली. शिवमने यावेळी ३४ चेंडूत सात चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर ५३ धावांची खेळी साकारली. हार्दिकनेही ३० चेंडूत ५३ धावा केल्या. यामध्ये चार चौकार आणि चार षटकारांचा समावेश होता.

# सिंहगड अभियांत्रिकीचा क्रीडा सप्ताह उत्साहात

**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

केगाव येथील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात क्रीडा सप्ताह उत्साहात पार पडला. यात ३५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. याचे उद्घाटन कॅम्पस डायरेक्ट संजय नवले यांच्या हस्ते झाले. यावेळी उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. रवींद्र व्यवहारे, प्रो. करीम मुजावर यांची उपस्थिती होती. क्रीडा सप्ताहात सांघिक सहा आणि वैयक्तिक नऊ अशा १५ प्रकारात क्रीडा सप्ताह पार पडला. क्रीडा समन्वयक प्रो. करीम मुजावर, क्रीडा शिक्षक प्रशांत, विद्यार्थी क्रीडा सरचिटणीस अभिजित चव्हाण, क्रीडा सचिव महेश घोगे, क्रीडा सहसचिव म्हणून अमर नवले, प्राजक्ता सोनटक्के यांनी यासाठी परिश्रम घेतले.



### अंतिम निकाल (विजयी व उपविजयी) :

**व्हॉलीबॉल** : मुले : एईसीएच (एस वाय अ), सिव्हिल विभाग. मुली : ईएलईसी विभाग, रामानुजन विभाग.

**फुटबॉल** : मुले : एमईसीएच, ईएनटीसी विभाग. मुली : सीएसई विभाग , ईएनटीसी.

**कबड्डी** : मुले : एमईसीएच (एसवाय अ), एमईसीएच (टीवाय) मुली : कल्पना विभाग, एमईसीएच.

**हॉकी** : मुले : ईएनटीसी, एमईसीएच विभाग. मुली : सीएसई, एमईसीएच

**क्रिकेट** : मुली : सीएसई, ईएनटीसी.

**खो-खो** : मुली सीएसई, कल्पना विभाग.



सोलापूर : त्रिपुराविरुद्धच्या सामन्यात जेऊर शाळेतील विद्यार्थ्यांसमवेत महाराष्ट्र कर्णधाराने संवाद साधला.(छाया-केवल तिवारी)

# त्रिपुरा सर्वबाद २७०; महाराष्ट्र दुसऱ्या दिवस अखेर ३ बाद २३५

## महाराष्ट्र विरुध्द त्रिपुरा रणजी सामना


## गुर्बानी व वाळुंजचे ४ बळी

## सिद्धेश वीर शतकाच्या उंबरठ्यावर

## यश शिरसागरचे दमदार अर्धशतक



हितेश वाळूज



रजनीश गुरबानी



सिद्धेश वीर



यश क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

येथील प्रसिद्ध इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर कालपासून सुरू झालेल्या शेवटच्या रणजी सामन्यात दुसऱ्या दिवशी खेळ थांबला तेव्हा महाराष्ट्राने पहिल्या डावात ३ बाद २३५ धावा (७२ षटके) केल्या असून कर्णधार अंकित बावणे ३१ तर सिद्धेश वीर शतकाच्या उंबरठ्यावर असून ९३ धावांवर खेळत असून महाराष्ट्राला पहिल्या डावात आघाडी घेण्यासाठी अद्यापि ३५ धावांची गरज आहे.

दुसऱ्या दिवशीचे वैशिष्ट्य म्हणजे सकाळच्या सत्रातील रजनीश गुर्बानी चे चार बळी व नंतर दुपारच्या व शेवटच्या सत्रात सिद्धेश वीरच्या नाबाद ९३ धावा आणि यश शिरसागर चे दमदार अर्धशतक सह दोघात १४४ धावांची भागीदारी. दुसऱ्या दिवशी सकाळी केवळ १ तासात १२ षटकात त्रिपुरा संघाचा पहिला डाव तेज गोलंदाज रजनीश गुर्बाणी ने घेतलेल्या ४ बळी व हितेश वाळुंजचा ४था बळी मुळे १०१.२ षटकात २७० धावांवर आटोपला. कालच्या ५ बाद २३० वरून सकाळी शरथ आणि रजत ने डाव पुढे केला तेंव्हा कर्णधार अंकित ने चेंडू पुन्हा रजनीश कडे सोपविला आणि ४थ्या, ६व्या नंतर १०व्या षटकात रजनीश ने एस. शरथ (७१), एम.बी.मुरा सिंग (१), संकर पॉल (१७) यांना बाद करत धक्के दिले. सोबतच हितेश ने देखील रजत डे (१७) ला पायचीत करत ४था बळी मिळविला. लगेच पुढच्या षटकात गुर्बानीने चरण पॉल (१) ला त्रिफळाची करत त्रिपुराचा पहिला डाव संपविला. रजनीश गुरबानी ३७/४, हितेश वाळुंज ६७/४, रामकृष्ण घोष व वीर ने प्रत्येकी १ बळी मिळविला. १० मिनिटांच्या अवधी नंतर महाराष्ट्राचा पहिला डाव रणजी पदार्पण करणारा किरण चोरमले ने पवन शाह सोबत सुरू केला खरा पण ३ ऱ्याच षटकात एम.बी मुरा सिंगने किरण चोरमले (२) याला यष्टीरक्षकाकडे झेल देण्यास भाग पाडले. नंतर आलेल्या सिद्धेश वीर सोबत जेवणाला खेळ थांबला तेंव्हा फलकावर ३५ धावा (१६ षटके) होत्या.

जेवणानंतर खेळ सुरू झाल्यावर वीरने पवन सोबत एकूण ४५ धावांची भागीदारी केली असताना पवन (२४) गोलंदाज एस सरकार कडेच झेल देऊन बाद झाला. यश क्षीरसागर ने वीर सोबत चहापान पर्यंत संघाचा धावफलक हलता ठेवत ४२ षटकात २ बाद १२० धावा केल्या. दुसऱ्या दिवसाच्या शेवटच्या सत्रात ३० शक्य गोलंदाजी खेळून काढताना महाराष्ट्राचा दम दार फलंदाज सिद्धेश वीर ने यश शिरसागर सोबत दुसऱ्या गड्यासाठी १४४ धावांची भागीदारी रचली. यश क्षीरसागर (७१) वर संकर पॉल कडून बाद झाल्यावर कर्णधार अंकित बावणे फलंदाजीला आला असून सिद्धेश सोबत ४२ धावांची भागीदारी केली आहे. रणजी स्पर्धेतील पहिल्या सामन्यात दमदार शतक ठोकलेल्या सिद्धेश्वरला या सामन्यात शतक साजरे करण्यासाठी अद्यापि ७ धावांची गरज असून उद्या तिसऱ्या दिवशी महाराष्ट्र संघ किती धावांची आघाडी घेतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

आज दुसऱ्या दिवशी करमाळा तालुक्यातील जेऊरच्या भारत हायस्कूलचे २०० विद्यार्थी प्राचार्य श्री.सरोदे यांचेसह तसेच शिक्षक वृंद मोठ्या संख्येने मैदानावरती खेळ पाहण्यासाठी आले होते. तसेच उप आयुक्त अशिश लोकरे, मनपा सह आयुक्त शशिकांत भोसले हे देखील सामना पाहण्यासाठी आले होते.

# महाराष्ट्राच्या नेमबाजांचा अचूक निशाणा!

## पार्थ मानेला पदार्पणात सुवर्ण, रुद्रांक्ष पाटीलला रौप्य, किरण जाधवला कांस्य

### ३८ वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, उत्तराखंड

◆ **डेहराडून, ३१ जानेवारी**

मराठमोळ्या नेमबाजांनी सुवर्णासह रौप्य व कांस्य पदकाच्या कमाई करीत ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत त्रिशूल शूटिंग रेंजवर महाराष्ट्राची पताका अभिमानाने फडकवली. शेवटपर्यंत रंगतदार झालेल्या १० मीटर एअर रायफल्स स्पर्धेत महाराष्ट्राच्या पार्थ मानेने सुवर्ण लक्ष्य साधले, तर विश्व सुवर्णपदक विजेता रुद्रांक्ष पाटील याने रुपेरी यश संपादन केले. सेनादलाचे प्रतिनिधित्व करणारा सातारा जिल्ह्यातील नेमबाज किरण जाधव याला कांस्यपदक मिळाले.

एअर रायफल्स स्पर्धेत अखेरच्या क्षणापर्यंत चुरस पहावयास मिळाली. १७ वर्षीय खेळाडू पार्थने २५२.६ गुण, रुद्रांक्ष याने २५२.१ गुण, तर किरणने २३०.७ गुणांची नोंद करीत महाराष्ट्राला तिन्ही पदके जिंकून देण्याचा पराक्रम केला. एका फेरीचा अपवाद वगळता पार्थने सुरुवातीपासून शेवटपर्यंत आघाडी टिकवत सुवर्ण यश संपादन केले. रुद्राक्ष हा मधल्या टप्प्यात सहाव्या स्थानावर होता. मात्र शेवटच्या टप्प्यांमध्ये त्याने एकाग्रता दाखवीत अतिशय अचूक नेम साधले आणि जोरदार मुसंडी मारत दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली. अर्थात त्याला पार्थ याची आघाडी मोडता आली नाही.



रुद्रांक्ष पाटील, पार्थ माने व किरण जाधव

पार्थ हा मूळचा सोलापूरचा खेळाडू असून गेले चार वर्षे तो सुमा शिरूर यांच्या पनवेल येथील अकादमीमध्ये प्रशिक्षण घेत आहे. त्याने कनिष्ठ गटाच्या जागतिक स्पर्धेत सोनेरी घेतला होता तसेच २०२३ मध्ये त्याने सांघिक विभागात भारतात सुवर्णपदक मिळवून दिले होते. तो पनवेल येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेत बारावी विज्ञान शाखेत शिकत आहे.

### सोनेरी यशाची खात्री होती : पार्थ

अंतिम फेरीत स्थान मिळवल्यानंतर मी केवळ सुवर्णपदक जिंकण्याचाच विचार केला होता, त्या दृष्टीनेच सुरुवातीपासूनच मी अचूक लक्ष्य कसा साधल्या जाईल याचे नियोजन केले होते, सुदैवाने माझ्या नियोजनानुसारच घडत गेले. या स्पर्धेत प्रथमच भाग घेताना सुवर्णपदक मिळवता आले याचा आनंद मला खूप झाला आहे, असे पार्थ याने सांगितले. आता जागतिक स्पर्धांसाठी होणाऱ्या राष्ट्रीय चाचणी स्पर्धांमध्ये भाग घेत भारतीय संघात स्थान मिळवण्याचे माझे ध्येय आहे आणि अर्थातच ऑलिम्पिक मध्ये प्रतिनिधित्व करणे माझे स्वप्न आहे व ते मी साकार करू शकेन अशी मला आशा आहे, असेही पार्थ याने सांगितले. (वृत्तसंस्था)

### वुशूमध्ये श्रावणी कटकेला कांस्यपदक

पुण्याच्या श्रावणी कटके हिने येथे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत वुशूच्या ताईचीक्वॉन प्रकारात कांस्यपदक जिंकले. श्रावणीने यापूर्वीही विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रिय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तिच्या या यशामुळे महाराष्ट्रातील युवा खेळाडूंना प्रेरणा मिळेल आणि वुशू खेळात अधिक सहभाग वाढेल, अशी आशा श्रावणीने व्यक्त केली आहे.

श्रावणीच्या या यशामुळे महाराष्ट्राच्या क्षेत्रात अभिमानाची भर पडली आहे. कठोर परिश्रम, समर्पण आणि सातत्यपूर्ण सरावामुळे तिने हे यश संपादन केले आहे.

# पूजा दानोळेला आणखी एक पदक

## ६० कि.मी.शर्यतीत रौप्य

◆ **रुद्रपूर, ३१ जानेवारी**

येथे सुरु असलेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत कोल्हापूरच्या पूजा दानोळेने आणखी एका पदकांची कमाई करीत रोड सायकलिंगमध्ये महाराष्ट्राला महिला गटाचे विजेतेपद जिंकून दिले. पूजाने शुक्रवारी ६० किलोमीटरच्या शर्यतीत रौप्यपदक पटकावले.

आपली पदकांची मालिका कायम राखत सायकलिंग मधील वैयक्तिक ट्रायलमध्ये सुवर्णपदक जिंकणारी पूजा हिने शुक्रवारी ६० किलोमीटर अंतराच्या शर्यतीत रुपेरी कामगिरी केली. तिच्या या कामगिरीबरोबरच महाराष्ट्राने रोड सायकलिंगच्या विजेतेपदावर नाव कोरले. पूजाने हे अंतर एक तास ४५ मिनिटे १०.५९० सेकंदात पार केले. सुवर्णपदक जिंकणाऱ्या गुजरातच्या मुस्कान गुप्ता हिला हे अंतर पार एक तास ४५ मिनिटे १०.५१२ सेकंद वेळ लागला. स्पर्धेत १ सुवर्ण, १ रौप्य पदके जिंकून महाराष्ट्राने रोड सायकलिंगमधील महिला गटाचे विजेतेपदावर नाव कोरले. ही दोन्ही पदके पूजा दानोळेने जिंकून महाराष्ट्राची शान राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत उंचविली आहे. (वृत्तसंस्था)



पूजा दानोळे

### महाराष्ट्राला रग्बीमध्ये १ रौप्य, १ कांस्य

#### पुरुष संघाला रौप्य, महिलांना कांस्य

**डेहराडून** : राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत रूग्बी सेव्हनमध्येही महाराष्ट्राने खाते उघडून १ रौप्य व १ कांस्य पदकांची कमाई केली. अंतिम लढतीत दिल्लीकडून पराभूत झाल्यामुळे पुरूष संघाला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले, तर महिला संघाने दिल्लीला नमवून कांस्यपदक प्राप्त केले.

महाराणा प्रताप क्रीडा संकुलात संपलेल्या रूग्बी सेव्हन स्पर्धेत महाराष्ट्राने प्रथमच दुहेरी पदकाची करिश्मा घडविला. पुरूषांच्या अंतिम सामन्यात बलाढ्य हरयाणाने महाराष्टाला २२-७ गुणांनी पराभूत केले. ओरिसा व दिल्ली संघाना नमवून अंतिम फेरीत धडक मारणाऱ्या माराष्ट्र संघाला अंतिम फेरीत सूर गवसला नाही. प्रशांत सिंग व तेजस पाटीलने आक्रमण करून ७ कमाई केली. सांघिक खेळाच्या जोरावर हरियाणाने सुवर्णपदक जिंकले. गत गोवा स्पर्धेत महाराष्ट्राला कांस्य पदक मिळाले होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त



### करकंब रोटरीच्या शिबिरात ९४ रुग्णांची नेत्र तपासणी

**करकंब, दि. ३१ जानेवारी-**

प्रजासत्ताक दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ करकंबने घेतलेल्या शिबिरात चंद्रभागा हॉस्पिटलतर्फे ९४ रुग्णांची मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू, मधुमेह, उच्चरक्तदाब तपासणी करण्यात आली. यामध्ये उच्चरक्तदाबाच्या ८ रुग्णांना ७ दिवसांची मोफत औषधे देण्यात आली. मधुमेहाचे ५० रुग्ण तर नेत्र तपासणीमध्ये १७ मोतीबिंदूचे रुग्ण मिळाले. सर्व रुग्णांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया २९ जानेवारीला एच. व्ही. देसाई नेत्र हॉस्पिटल पुणे येथे मोफत करण्यात आल्या. नेत्रतपासणी व मधुमेह तपासणीसाठी डॉ. सरस्वती मोरे, डॉ. अशिष चौधरी, सहाय्यक दीपक सादगिले, दत्तात्रय करडे यांचेही सहकार्य लाभले. करकंब रोटरी क्लबचेवतीने आतापर्यंत ६ शिबिरे घेण्यात आली असून त्यामध्ये १ हजार ५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी १८१ रुग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या. सांगवी येथील गगनगिरी विद्यालयातील २५६ विद्यार्थी व शिक्षकांची विशेष तपासणी करण्यात आली. त्या तपासणीत ४ मोतीबिंदूचे रुग्ण मिळाले. ४९ ग्रामस्थांच्या तपासणीत १७ रुग्ण मोतीबिंदूचे होते. यावेळी करकंब रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. अक्षय मोरे, सचिव शार्दुल शहा, क्लब डायरेक्टर रघुनाथ जाधव, संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांत मोरे, डॉ. विनोद शिंगटे, लक्ष्मण जाधव, सुनील दुधाणे आदी उपस्थित होते.



### राष्ट्रवादी काँग्रेस पुणे, पिंपरी चिंचवडच्या निरीक्षकपदी मांडवेचे सुरेश पालवे-पाटील

**नातेपुते, दि. ३१ जानेवारी-**

पिंपरी चिंचवड व पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पक्ष निरीक्षकपदी मांडवे (ता. माळशिरस) येथील सुरेश पालवे-पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे. महानगरपालिकेच्या निवडणुका जवळ आल्या असल्याने सर्वच पक्षाने आपापल्या परीने महानगरपालिकेमध्ये जास्तीत जास्त नगरसेवक निवडून येण्यासाठी कंबर कसलेली आहे. यामध्येच राष्ट्रवादी पक्षाने कर्तव्यनिष्ठ कोणतेही काम हाती घेतले तर त्या कामांमध्ये यश संपादन करण्यासाठी अहोरात्र धडपड करणारे अजित पवार यांच्यावर निष्ठा असलेले बारामती विधानसभा मतदारसंघांमध्ये यशस्वीरित्या पक्षनिरीक्षक म्हणून काम केलेले पालवे-पाटील यांची निवड करण्यात आली आहे.



### मोहोळच्या फिनिक्स इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

**मोहोळ, दि. ३१ जानेवारी-**

फिनिक्स इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी संस्थापक अध्यक्ष कृष्णदेव मदने, मुख्याध्यापक प्रशांत मदने, यशोदा मदने, उद्योजक संतोष वायचळ, माजी नगरसेविकाअर्चना वायचळ, महंम्मद तलफदार, दत्ता कदम, रामचंद्र मोरे, बिलाल झारेकरी, गणेश वाघमारे, मार्तंड काळे, कांबळे आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी भाषणांबर देशभक्तीपर गीत सादर केले. अश्वमेध मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे बाळासाहेब जाधव आणि बशीर आत्तार यांनी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक प्रशांत मदने यांनी मुलांची कवायत करून घेतली. प्रास्ताविक यशोदा मदने यांनी मानले. सूत्रसंचालन सारिका नाईकनवरे यांनी केले.

### कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाचे गांधी विचार संस्कार परीक्षेत दैदिप्यमान यश

**पिलीव, दि. ३१ जानेवारी-**





माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या विद्यार्थिनी गांधी रिसर्च फाउंडेशन जळगावच्या वतीने घेण्यात आलेल्या गांधी विचार संस्कार परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन केले. यामध्ये विद्यालयातील विद्यार्थिनी क्रांती राजेशवर झाडे हिने पाचवीच्या गटातून जिल्ह्यात तृतीय क्रमांक पटकाविला तर दहावीच्या गटातून वैष्णवी बापू रणदिवे हिने जिल्ह्यात तृतीय क्रमांक पटकाविला. या यशाबद्दल मुख्याध्यापक शिवाजी कापसे, पर्यवेक्षक मोरे, वरिष्ठ लेखनिक भोरकडे, विभाग प्रमुख इंगळे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



### नातेपुते येथील महाकिडस्‌मध्ये योगा प्रत्यक्षिके

**नातेपुते, दि. ३१ जानेवारी-**

नातेपुते येथील महाकिडस् इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये ध्वजारोहण संस्थेचे सचिव अलका पांढरे यांच्या हस्ते करण्यात आहे. महाकिडस्‌च्या मुलांनी विविध योगासनाचे प्रकार प्रत्यक्षिकाच्या माध्यमातून सादर केले. योगा काळाची गरज आहे, असा संदेश पालकांना देण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष ॲड. शिवशंकर पांढरे, संचालक निशाताई सरगर, अमोल शिंदे, संदिप कदम, सुजाता मुंजी उपस्थित होते.

# यंदा तरी नव्या रेल्वे गाड्या धावणार का?

## कोल्हापूर-कलबुर्गी इंटरसिटी, कोल्हापूर-हैदराबाद रेल्वे अर्थसंकल्पात मंजूर करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३१ जानेवारी-**

सांगोल्यातील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना रेल्वेच्या विविध मागण्याचे निवेदन देण्यात आले.

यामध्ये सकाळी सत्रात कोल्हापूर-सोलापूर-कलबुर्गी- कोल्हापूर इंटरसिटी रेल्वे सेवा, मिरज-कुर्डूवाडी डेमो रेल्वेचा विस्तार कोल्हापुरपर्यंत करावा, सायंकाळी ७ च्या सुमारास कोल्हापूर-पंढरपूर-हैदराबाद रेल्वे, कलबुर्गी-कोल्हापूर एक्स्प्रेस, मिरज-सोलापूर रेल्वे या रेल्वे सेवा सुरू कराव्यात, या रेल्वेस सलगरे, ढालगाव, जत रोड, म्हसोबा डोंगरगाव या स्थानकांवर अधिकृत थांबे मिळावेत, दादर-सातारा-दादर रेल्वे सेवा दररोज करावी, कुर्डूवाडी-कोल्हापूर मार्गावर क्रॉसिंग पॉईंटची संख्या वाढवावीत, सांगोला स्टेशनवर कोच इंडिकेटर्स बसवावेत, ज्येष्ठ नागरिकांना देशभरात रेल्वे प्रवासात तिकीट भाड्यात पूर्ववत सवलत मिळावी, लातूर-मिरज-कोल्हापूर रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण करावे, कुर्डूवाडी-कोल्हापूर मार्गावर दर ३ तासांनी शटल सेवा नियमीत सुरू करावी या रेल्वे थांबे व इतर रेल्वेच्या आग्रही मागण्या करण्यात आल्या आहेत. सदर निवेदन महाराष्ट्रातील सर्व खासदार, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक, व्यवस्थापक पुणे, सोलापूर यांना देण्यात आले आहेत. रेल्वेचा अर्थसंकल्प लवकरच सादर होणार त्यामध्ये या मागण्या मंजूर व्हाव्यात अशी मागणी संघटनेने केली आहे.



> रेल्वे अर्थसंकल्पात मध्य रेल्वे मुंबई विभागास न्याय मिळावा. सोलापूर, कोल्हापूर, सातारा, मिरज व सांगली जिल्ह्यातील रेल्वेच्या सर्व समस्याचे रेल्वेच्या अर्थसंकल्पात या तीनही विभागातील प्रश्नावर चर्चा होऊन मंजुरी देण्यात यावी. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय दूर होईल.
>
> **- नीलकंठ शिंदे, अध्यक्ष, अशोक कामटे संघटना, सांगोला**

## अक्कलकोटमध्ये स्वागत कमानीचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ जानेवारी-**

राजेफत्तेसिंह चौक नवरात्र महोत्सव तरुण मंडळाचे प्रेरणास्थान व मार्गदर्शक जन्मेजयराजे भोसले, आधारस्तंभ अमोलराजे भोसले, महेश इंगळे यांच्या नेतृत्वात कार्यरत असून, मंडळाने प्रजासत्ताक दिनानिमित्त राजेफत्तेसिंह चौकात अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले महाराज प्रवेशद्वार स्वागत कमानीचे भूमिपूजन माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी यांनी केले.

राजेफत्तेसिंह चौक नवरात्र महोत्सव तरुण मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत सोनटक्के यांनी या स्वागत कमानीसाठी अक्कलकोट नगरपरिषदकडे मागणी केली होती.



नगरपरिषदेच्या मंजुरीने कमान उभी करण्यात येत आहे. याचे भूमीपूजन प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून संपन्न झाले. दरम्यान स्वागत कमानीचे भूमिपूजन सोहळा सोमकांत कुलकर्णी यांच्या विधिवत पूजनाने संपन्न झाला. यावेळी सुरेशचंद्र सूर्यवंशी, माजी नगरसेविका सोनाली विक्रम शिंदे, बाबासाहेब निंबाळकर, सोपानराव गोंडाळ, सुभाष गडसिंग, सुधाकर गोंडाळ, अमर शिंदे, ॲड. विजय हार्डीकर, ॲड. अश्विन बाग, स्वप्नील शहा, अभिनंदन गांधी, प्रशांत कडबगावकर, बाळा शिंदे, वासू कडबगावकर, मनोज निकम, रोहित खोबरे, मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत तथा पिंटू सोनटक्के, लाला राठोड, बाळासाहेब देसाई-कुलकर्णी, लखन झंपले, संतोष भोसले, शिवराज स्वामी, रोहन शिर्के, पिंटू साठे, सनी सोनटक्के, शिवा मंगरुळे, कल्याण देशमुख, रोहित निंबाळकर, मुन्ना फडतरे, संजय गोंडाळ, नरसिंग क्षीरसागर, सुमित घाडगे, विनय भोसले, गणेश ग्राम, अप्पा गवळी, निखील पाटील, गोटू माने, श्रीशैल कुंभार, रवी कदम, सौरभ शहा, मैनू कोरबू, अश्पाक काझी, दादा गंगणे, रणजीत गोंडाळ, मोहनराव साळुंके, टिल्लू गंगणे, अक्षय कळसे, प्रसन्ना तथा छोटू हत्ते, रामू पाटील, दादा सावंत, गजानन काटकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## जीबीएसबाबत नागरिकांनी काळजी घ्यावी : वैद्यकीय अधिकारी डॉ. जाधव

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ३१ जानेवारी-**

सध्या थैमान घालत असलेल्या जीबीएसबाबात नागरिकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन वैद्यकीय अधिकारी डॉ. विलास जाधव यांनी केले.

महाराष्ट्रात सध्या जीबीएस म्हणजेच गुलियन बरी सिंड्रोमचा झपाट्याने प्रसार वाढत चालला आहे. पिलीव परीसरातील नागरिकांनी याबाबत अजिबात घाबरुन जाऊ नये याबाबत काळजी घेणे आवश्यक आहे. दूषित पाणी तसेच दूषित व शिळे अन्न खाणे पूर्णपणे टाळावे, संतुलित आहार घ्यावा, नियमितपणे व्यायाम, योग, मेडीटेशन करावे, बाहेरील हॉटेल, ढाबे किंवा इतर ठिकाणचे अन्न खाणे पूर्णपणे टाळावे, तर यामुळे हातापायाला मुंग्या येणे, बोलणयास त्रास होणे, श्वास घेणयास त्रास होणे, हातापायात झिणझिण्या येणे, ब्लड प्रेशरची समस्या, चालण्यात अडचण येणे, चिडचिडपणा वाढणे, चेहऱ्यावर कमजोरी येणे, डायरिया यासाठी योग्य स्वच्छेतेची काळजी घ्यावी, स्वच्छ पाणी प्यावे, ताजे व स्वच्छ अन्न खावे, पूर्णपणे शिजवलेले अन्न खावे हा आजार संसर्गजन्य आहे. याचा धोका सर्वात जास्त वयोवृद्ध व आरोग्यविषयक समस्या असणारे ५० वर्षावरील लोकांना आहे. पिलीव परिसरातील नागरिकांनी योग्य ती काळजी घ्यावी घाबरु नये, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले आहे.

## कुरनूर प्रशालेत माजी सैनिकांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ जानेवारी-**



नागनाथ विद्याविकास प्रशाला कुरनूर येथे प्रजासत्ताक दिन विविध सांस्कृतिक उपक्रमांनी उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. ध्वज कट्ट्याचे पूजन व ध्वजारोहण संस्थेच्या अध्यक्षा मधुमती माने यांनी केले. यावेळी विविध कला, खेळ, नृत्य, देशभक्तीपर गीत आदी बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. चित्रकला, विविध स्पर्धा, मैदानी खेळ, सांस्कृतिक कला, सादर केलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी माजी सैनिक बापूराव सुरवसे, संतोष काळे, करण दगडे, साहेबलाल मुजावर यांचाही सन्मान करण्यात आला. कला व क्रीडा शिक्षक भाग्येश कांबळे, श्रीशैल स्वामी, राजेंद्र मोरे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी मुख्याध्यापक महादेव माने, विक्रम बेडगे, रविराज माने, त्रिमूर्ती माने, इस्माईल मुजावर, भूमिका मोरे, अनिल काजळे, शिवराम काळे उपस्थित होते. सूत्रसंचालन राजेंद्र मोरे तर नारायण बागल यांनी आभार मानले.

## इष्टांक वाढ, थकीत रक्कमेबाबत पालकमंत्र्यांना निवेदन

**अखिल महाराष्ट्र स्वस्त धान्य दुकानदार, केरोसीन परवानाधारक महासंघ ग्रामीण-जिल्हा संघटना आक्रमक**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३१ जानेवारी-**

अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघ ग्रामीण, जिल्हा संघटनेने निवेदन देऊत पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे विविध मागण्या केल्या आहेत. शासनाकडून कपात झालेली इंष्टाक संख्या रद्द करून तो परत माघारी देण्यात यावा, अशी मुख्य मागणी आहे.

इष्टांकवाढ होऊन प्रत्येक तहसीलमध्ये ऑपरेटर नेमून डिलीट झालेले रेशनकार्डधारक व गरीब, गरजू तसेच मोलमजुरी करणारे रेशनकार्डधारकांचे आधार कार्ड सिडिंग करून पात्र रेशनकार्ड धारकांना अन्नधान्य मिळावे. धान्य दुकानदारांचे नोव्हेंबर २०२२ व डिसेंबर २०२२ या महिन्यामध्ये दुकानदारांनी चलनाद्वारे भरलेली रक्कम मागील दोन वर्षांपासून थकीत आहे. यासह विविद मागण्याचे निवेदन देण्यात आले. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय मंडलिक, जिल्हा उपाध्यक्ष रामेश्वर महिमकर, पंढरपूर तालुकाध्यक्ष किरण दाणोळे, पंढरपूर तालुका उपाध्यक्ष चंद्रकांत जाधव, बार्शी तालुकाध्यक्ष मारूती अंधारे, दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष रमजान नदाफ, माढा तालुकाध्यक्ष गणेश बागल, मंगळवेढा तालुकाध्यक्ष महादेव माळी, सांगोला तालुकाध्यक्ष भगवान इंगोले, महासंघ जिल्हा संघटनेचे संपर्कप्रमुख दिलीप काजळे यांच्यासह पदाधिकारी व दुकानदार उपस्थित होते.

## शासकीय रेखाकला ग्रेड परीक्षेत सांगोला विद्यामंदिर अव्वल

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३१ जानेवारी-**

सांगोला विद्यामंदिर प्रशालेतील विद्यार्थ्यांनी शासकीय रेखाकला ग्रेड परीक्षेत अव्वल यश मिळवत उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे.

एलिमेंटरी परीक्षेमध्ये अक्षरा इंगोले, अस्मिता काशीद, धानेश्वरी उकळे, प्रणिती साळुंखे, सिद्धी उकळे, स्वरूप इंगोले, अनुश्री खुळपे, अनुष्का डिगोळे या विद्यार्थ्यांनी ए-ग्रेड संपादन केली. या परीक्षेकरिता समाधान शिंदे यांनी मार्गदर्शन केले. इंटरमिजिएट परीक्षेमध्ये ओजस्वी नवले, समृद्धी भोसले या विद्यार्थ्यांनी ए-ग्रेड संपादन केली. या परीक्षेकरिता अमोल उकळे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शाहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, मच्छिंद्र इंगोले, प्रशाला बाह्यपरीक्षा विभागप्रमुख नामदेव खंडागळे, वैभव कोठावळे यांनी अभिनंदन केले. महाराष्ट्र शासन अंकित महाराष्ट्र राज्य कलाशिक्षण संचलनालयाच्यावतीने ही परीक्षा आयोजित केली जाते. या परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना सुरुवातीस एलिमेंटरी व नंतर इंटरमिजिएट परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असते.

इंटरमिजिएट परीक्षेमध्ये ए, बी आणि सी ग्रेड नूसार उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इयत्ता दहावी बोर्डाच्या परीक्षेमध्ये अनुक्रमे ७, ५ आणि ३ गुणांचा वाढीव लाभ होतो.

## वासूदच्या सरपंचपदी भाजपाच्या विठाबाई चव्हाण बिनविरोध

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३१ जानेवारी-**

सांगोला तालुक्यातील वासूद ग्राम पंचायतीवर भाजपचा झेंडा फडकला असून भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांच्या नेतृत्वाखाली विठाबाई शिवाजी चव्हाण यांची सरपंचपदी बिनविरोध निवड झाली. या निवडीबद्दल जिल्ह्याचे पालकमंत्री ना.जयकुमार गोरे, आ.सचिन कल्याणशेट्टी, जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी नूतन सरपंचांचा सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

वासूद ग्रामपंचायतीचे सरपंच जयश्री केदार यांनी राजीनामा दिल्यानंतर गुरुवार दि.३० जानेवारी रोजी ग्रामपंचायत कार्यालयात नूतन सरपंच निवडीची प्रक्रिया पार पडली. यावेळी निवडणुक निर्णय अधिकारी मंडल अधिकारी एम.जी.जाधव, तलाठी मस्के, ग्रामविकास अधिकारी बाबासो नरळे यांनी काम पाहिले. यावेळी सरपंच पदासाठी भाजपच्या विठाबाई चव्हाण यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले.



> वासूद गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे तसेच नागरिकांना मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी निधी कमी पडू देणार नाही. गावाचा विकास करणे हा माझा ध्यास असल्याने अधिकाधिक निधी आणण्यासाठी मी प्रयत्नशील राहणार आहे.
>
> **- चेतनसिंह केदार-सावंत, जिल्हाध्यक्ष, भाजपा**

सरपंचपदी विठाबाई चव्हाण यांची बिनविरोध निवड होताच भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करीत फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष साजरा केला. यावेळी उपसरपंच अनिल केदार, माजी सरपंच जयश्री केदार, कलावती केदार, ग्रामपंचायत सदस्य बबन ऐवळे, अंकुश खटके यांच्यासह तंटामुक्त समितीचे अध्यक्ष अण्णासाहेब केदार, बाळासाहेब केदार, मोहन साळुंखे, विष्णुपंत केदार, विश्वंभर केदार, चेअरमन पांडुरंग केदार, अंकुश सावंत, मेजर अरुण केदार, सौदागर केदार, नवनाथ केदार, गोरख केदार, अजित गोडसे, समाधान सावंत, रणजित सावंत, दत्तात्रय ऐवळे, नवनाथ आदलिंगे, धनाजी राऊत, नितीन केदार, सोमनाथ पवार, गोपी केदार, जोतीराम केदार, तानाजी खटके, संभाजी चव्हाण, जयवंत केदार, दगडूआप्पा केदार, सुनील सावंत, दीपक शिंदे, सेनापती केदार उपस्थित होते.

# किणीच्या शाळेला लोकवर्गणीतून साहित्य भेट

## नागरिकांचा पुढाकार; लोकवर्गणीचा आधार, शाळेचे रुपडे पालटणार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ जानेवारी-**

तालुक्यातील किणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी नागरिकांनी शाळेला एक लाख रुपयाचे साहित्य व रोख रक्कम लोकवर्गणीतून जमा करून दिल्याची माहिती सेवानिवृत्त विस्तार अधिकारी भीमराव तुळजापुरे यांनी दिली.

रतिलाल अगरथडे यांनी शाळेला एक संगणक संच भेट दिला. नेमिनाथ अगरथडे गुरुजी यांनी अंगणवाडी विद्यार्थ्यांच्या खेळणीसाठी पाच हजार रुपये दिले. अशोक अगरथडे यांनी विद्यार्थ्यांना स्नेहभोजन देण्यासाठी पाच हजार रुपयाची देणगी दिली. गायत्री सिद्धाराम कलशेट्टी यांनी त्यांचे वडील सिद्धाराम गुरुलिंगप्पा कलशेट्टी यांच्या स्मरणार्थ शाळेत वृक्षारोपण करण्यासाठी साडेबारा हजार दिले.



शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्षा मीनाताई शेख यांनी भाषण केलेल्या ३६ विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक रंगखडू बॉक्स बक्षीस दिले. विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनासाठी ताटाची कमतरता असल्याने इरप्पा बबले यांनी ५०, महादेव कोटमाळे ५० ताट दिले, तर सेवानिवृत्त ग्रामसेवक गंगाधर बंदिछोडे यांनी शंभर ताट देण्याचे आश्वासन दिले. गुरुनाथ मठ यांनी शाळेत परसबागेसाठी एक एचपी मोटार दिले. रतिलाल अगरथडे यांनी भाषण केलेल्या ३६ विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५१ रुपये दिले.

सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत प्रथम तीन क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना भिमराव तुळजापुरे यांच्याकडून रोख रक्कम व ट्रॉफी देण्यात येणार आहे. मैदानामध्ये मुख्याध्यापक कार्यालयासमोर पेव्हर ब्लॉक बसवण्यासाठी ग्रामपंचायतीच्या पंधराव्या वित्त आयोगातून पाच लाख रुपयांच्या निधीची तरतूद केल्याचे उपसरपंच अमोल हिपरगे यांनी सांगितले. देणगीदारांचे शाळेचे मुख्याध्यापक परमेश्वर जमादार यांनी आभार मानले.

## संक्षिप्त वृत्त



### महाराष्ट्र प्रदेश सेवादलाचे स्काय फोर्ससाठी मोफत शोचे आयोजन

**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सेवा दलाने आयोजित केलेल्या स्काय फोर्स या राष्ट्रभक्तीवर आधारित चित्रपटाच्या मोफत शोसाठी संपूर्ण सिनेमा थेटर बुक करण्यात आला होता. माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचे नातू वीर पहारीया आणि सुपरस्टार अक्षय कुमार यांचा हा चित्रपट भारतीय वायुदलाच्या पराक्रमावर आधारित आहे. सन १९६५ भारतीय वायु दलाने पाकिस्तान मध्ये घुसून पहिले एअर स्ट्राइक केले स्कवार्डन लीडर टी विजय (वीर पहाड़िया) यांच्या सर्वोच्च बलिदानावर आधारित सिनेमा आहे. या शोचे आकर्षण म्हणजे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सेवा दलाचे अध्यक्ष सुदीप चाकोते यांच्या उपस्थितीत मोफत आयोजित करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन संजय कुराडे अध्यक्ष, पश्चिम महाराष्ट्र काँग्रेस सेवा दल सोशल मीडिया व त्यांच्या मित्रपरिवाराने केले. प्रसंगी नूर अहमद नालवार मल्लिनाथ सोलापूर, चंद्रकांत टिक्के, श्रीकांत दासरी जब्बर शेख हनुमंत रुपनवरे यश माशाळे, अमोल सुर्वे, सीओन बिनेकर, अक्षय बिराजदार, मौलाली शेख, अप्पू शेख उपस्थित होते.



### बोरामणीच्या आरोग्य शिबिरात ३०० रुग्णांची तपासणी

**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजींच्या ६९ व्या पुण्यतिथीनिमित्त चतुर्थी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सोलापूर यांच्यावतीने बोरामणी (ता.द. सोलापूर) येथील एसव्हीसीएस प्रशालेमध्ये आयोजित केलेल्या सर्व रोग निदान आरोग्य शिबिरामध्ये पोट तज्ञ अमोल पाटील, कॅन्सर तज्ञ सुनील हिलालपुरे, मेंदू विकार तज्ञ अमर विभुते, मधुरा विभुते, स्त्रीरोग तज्ञ शिल्पा शेटे, मुक्तेश्वर शेटे आदी डॉक्टरांनी ३०० गरजू रुग्णांची तपासणी करून मोफत औषधोपचार केले. प्रथम वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रतिमा पूजनानंतर शिबिरास सुरुवात करण्यात आली. उपस्थितांचे स्वागत मुख्याध्यापक महांतेश अतनुरे यांनी केले. यावेळी संस्थेचे सचिव शांतया स्वामी, संचालक शशिकांत रामपुरे, प्राचार्य राम ढाले, सरपंच राज साळुंखे, उपसरपंच संजय माळी, माजी सरपंच प्रकाश आवटे, बशीर मुजावर, चंदू मटगे, मल्लू मटगे, मल्लू शेळगे, पर्यवेक्षक शिवानंद बिराजदार उपस्थित होते. प्रास्ताविक माधुरी पाटू यानी तर उमा शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.



### लोकमंगलच्या वतीने दहावी बोर्ड परीक्षेविषयी मार्गदर्शन शिबीर

**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

लोकमंगल फाउंडेशन अंतर्गत दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप येथील महात्मा फुले विद्यालयात विद्यार्थ्यांची बोर्ड परीक्षा विषयाची भीती नाहीशी व्हावी व गुणवत्ता वाढावी यासाठी तज्ज्ञ शिक्षकांकडून मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिक्षकांनी पेपर कसा सोडवायचा याबाबत महत्वाच्या टिप्स दिल्या. या मार्गदर्शन शिबिरात हिंदी भाषा विषयाचे पेपर कसे सोडवावेत, गद्यखंड, पद्यखंडवरील कृतीपत्र कसे सोडवावे, व्याकरण व लेखन कसे करावे आदींबाबत प्रा. प्रकाश पाटील यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. प्रा. अनिल गावडे यांनी मराठी विषयाची कृतीपत्रिका कशी सोडवावी व ती सोडवत असताना कोण कोणते मुद्दे लक्षात घ्यावेत याबाबत माहिती देऊन भाषाभ्यास व उपयोजित लेखन या दोन्हींचेही नियोजन कसे करावे व कमीत कमी वेळेमध्ये भाषाभ्यास कसा सोडवावा याचे सविस्तर विवेचन केले. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य आ. ए. दशवंत, पर्यवेक्षक शेख, लोकमंगल फाउंडेशनचे संचालक मारुती तोडकर, शशी थोरात, सामाजिक कार्यकर्ते गौरीशंकर मेडकुदले, विश्वनाथ हिरेमठ यांच्यासह प्रशालेचे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. दशवंत यांनी केले. लोकमंगल फाउंडेशनच्या कार्याची माहिती दिपाली कोठारी यांनी दिली.

### सिनियर लॉयर पदवी मिळाल्याबद्दल ॲड. एस. आर. पाटील यांचा सत्कार

**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांच्यातर्फे सीनियर लॉयर ही पदवी मिळाल्याबद्दल सोलापूर बार असोसिएशनच्या वतीने ॲड. एस आर पाटील यांचा मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण व पालक न्यायमूर्ती फिरदोस पूनावाला यांच्या हस्ते हुतात्मा स्मृती मंदिरात सत्कार करण्यात आला. गतवर्षी पुण्यामध्ये झालेल्या बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा आयोजित वकील परिषदेत ॲड. पाटील यांना सीनियर लॉयर या पदवीने सन्मानित करण्यात आले होते. यावेळी सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड अमित आळंगे व इतर पदाधिकारी उपस्थित होते. ॲड. पाटील यांनी १९६७ मध्ये सोलापुरात वकिलीस सुरुवात केली होती. अतिरिक्त सरकारी वकील म्हणून त्यांनी सलग १३ वर्षे काम पाहिले, मागील ५८ वर्षापासून निरंतर आजही ते विधी सेवा करीत आहेत.

# वाळू धोरणाबाबत पालकमंत्र्यांचे ऐकावे की माजी पालकमंत्र्यांचे?

## दोन मंत्र्यांच्या परस्परविरोधी विधानाने जिल्हा प्रशासन संभ्रमात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**



शासनाचे वाळूचे धोरण काय आहे? जिल्ह्यात वाळू उपसा कोणत्या पध्दतीने चालतो? यासह अवैध वाळू उपसा करणाऱ्यांचा म्हणजेच वाळू माफियांचा विषय गुरूवारच्या डिपीसी बैठकीत जोरदार रंगला होता. दरम्यान, या बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी वाळू तस्करांवर कडक कारवाई करावी, असे फर्मान सोडले. जर पोलिस आणि जिल्हा प्रशासनाने वाळू माफियांवर कारवाई नाही केली तर तुमची गय केली जाणार नाही? असा अधिकाऱ्यांना दम भरला. तर अवघ्या १० दिवसांपूर्वी टेंभुर्णी येथील एका कार्यक्रमात राज्याचे जलसंपदा मंत्री तथा माजी पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी वाळू उपसा करणारे आमचेच कार्यकर्ते आहेत, त्यांच्यावर कारवाई करू नका, अशा जिल्हाधिकाऱ्यांना सुचना दिल्या होत्या. यामुळे आता ऐकावे कोणाचे? अशा संभ्रमावस्थेत सध्या जिल्हा प्रशासन आहे.

गुरूवारच्या डीपीसीमध्ये जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने नियोजन समितीतून निधी मिळणे, जुनी कामे वेळेत मार्गे लावणे, शेतकऱ्यांना पीक विमा मिळणे, पीक कर्जाचा पुरवठा बँकांनी करणे, पाणीपुरवठा योजनेच्या बिलापोटी निधी मिळणे, पंधरावा वित्त आयोगाच्या निधी वाटप, कृषी यांत्रिकीकरण, ठिबक अनुदान, नियमित कर्ज पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन पर अनुदान मिळणे, रोहित्र दुरुस्तीसाठी निधी मिळणे, तीर्थक्षेत्रांना मान्यता देणे, नवबौद्ध घटकाच्या योजनांसाठी निधी उपलब्ध करणे, दुहेरी पाईपलाईनच्या अनुषंगाने त्वरित कारवाई करणे, क्रीडा विभाग व आरोग्य विभागात समितीच्या निधीतून प्रस्तावित केलेल्या कामांची चौकशी करणे आदी मागण्या करून या अनुषंगाने त्वरित कार्यवाही करणे बाबत पालकमंत्री गोरे यांनी लक्ष घालण्याचे मागणी केली.

तर मोहोळचे आमदार राजू खरे यांनी मोहोळ विधानसभा मतदारसंघात चालत असलेली वाळू, मुरूम आणि माती चोरीवरून प्रचंड नाराजी आणि संताप व्यक्त केला. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये बोलतांना आमदार खरे म्हणाले, आपण दुष्काळी भागाचे पालकमंत्री झालात, पण आमच्या मतदारसंघात मुरूम, माती आणि वाळू उपसा होतो, शासनाचा महसूल बुडतो, मी तुमच्या सोबत अनेक वर्ष काम केले आहे, चुकून मला तुतारी घ्यावी लागली, मी बाळासाहेबांचा सैनिक आहे.

तालुक्यात ५० हायवा टीपर फिरतात, यावर कारवाई करा, अशी मागणी त्यांनी केली. यावेळी त्यांच्या राजकीय भूमिकेबाबत सर्वच आश्चर्यचकित झाले. यापूर्वीच पालकमंत्री गोरे यांच्याकडे अनेकांच्या वाळूसंबंधी तक्रारी आल्या होत्या; त्यातच आ. खरे यांनी तक्रार केल्यानंतर पालकमंत्री गोरे चांगलेच आक्रमक झाले. त्यांनी जिल्ह्यातील सर्व वाळू माफियांवर कडक कारवाई करण्याचे पोलिस अन् जिल्हा प्रशासनाला आदेश सोडले आहेत. इतकेच नाहीतर तुमचा वरदहस्त असल्याशिवाय वाळू तस्करी शक्यच नाही? असाही सवालही यावेळी गोरे यांनी उपस्थित केला. वाळू तस्करी करणाऱ्यांची यादीच पालकमंत्री गोरे यांनी मागितली असल्याने जिल्ह्यातील वाळू उपसा धोरण आता चांगलेच कडक होणार असल्याचे दिसून येणार आहे. इतकेच नाहीतर यात कुणी अधिकारी, कर्मचारी सहभागी असला तर त्याला सोलापुरात काम करण्याचा अधिकार नाही, अशीही तंबी दिली आहे. याचबरोबर या डिपीसीमध्ये जिल्हा आरोग्य विभाग आणि क्रीडाविभागातील अधिकाऱ्यांच्या कारभाराचे चौकशीचे आदेश दिल्याने जिल्हा प्रशासन याबाबत कोणती भूमिका घेणार? याकडे अवघ्या जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# प्रारूप विकास आराखड्यास २,४७९ जणांच्या हरकती

**● हरकतींवर सुनावणीची प्रक्रिया पार पडणार**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी**

सोलापूर महापालिकेच्या आगामी २० वर्षांचा विचार करून तयार करण्यात आलेल्या शहर विकास प्रारूप आराखड्याला ३१ जानेवारी या शेवटच्या दिवस अखेर २४७९ जणांच्या हरकती आल्या आहेत. हरकतींचे हे प्रमाण मोठे आहे. लवकरच प्रशासनाकडून यासंदर्भात सुनावणीची प्रक्रिया घेण्यात येणार आहे.

सोलापूर महापालिकेच्या आगामी २० वर्षांचा विचार करून दि. १ जानेवारीला प्रसिद्ध झालेल्या शहर विकास प्रारूप आराखड्यावर हरकत घेण्यास एक महिन्याची मुदत देण्यात आली होती. महिनाभराच्या या कालावधीत २४७९ जणांच्या हरकती आल्या आहेत. यात बहुतांश हरकतदारांनी संबंधित जागेवरील आरक्षण रद्द करण्याची मागणी केली आहे. या विकास आराखड्यात शहर हद्दवाढ भागाचा चौफेर विकास याबरोबरच शहरातील विविध भागांमध्ये क्रीडांगणे, उद्याने, विरंगुळा केंद्र, वाहनतळ,



शहरातील पाणीपुरवठ्यासाठी पाण्याच्या टाक्यांचे नियोजन आणि इतर अनेक विकासाचे मुद्दे शिवाय नागरिकांना अपेक्षित इतर बाबींचा समावेश आहे. सुमारे ५०० पानांचा हा आराखडा आहे. या आराखड्यास सर्व स्तरातून मोठा विरोध झाला आहे.

नुकतेच जुळे सोलापूर, विजापूर रोड शहरी विकास आराखडा विरोधी संघर्ष समितीतर्फे मोर्चा काढण्यात आला होता. एमआयएम पक्षाने देखील निवेदन देऊन जोरदार हरकत घेतली होती. एकतर विकास आराखडामध्ये सुधारणा करा किंवा ते रद्द तरी करा, अशी मागणी केली आहे. शहरातील काही स्थानिक नेते मंडळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटून हरकतीला मुदतवाढ तर काहीजण आराखडा रद्द करण्याची मागणी करणार आहेत.

# शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी 'ॲग्रीस्टॅक'चा फायदा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

ॲग्रीस्टॅक हा भारतीय शेतीसाठी तयार करण्यात आलेला एक मोठा डिजिटल डेटा प्लॅटफॉर्म आहे. यामुळे शेतकऱ्यांना बाजारपेठेपर्यंत अधिक माहितीपूर्ण आणि सोयीस्कर प्रवेश मिळून देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना विविध कृषीविषयक योजनांचा लाभ जलदगतीने देण्यासाठी शेतकऱ्यांची ओळख पटविण्यासाठी पारदर्शक, सोपी आणि प्रामाणिकपणाची पद्धत विकसित करणे, शेतकऱ्यांना अधिक चांगल्या प्रकारे सेवा देण्यासाठी कृषी संलग्न विभाग यांच्यात विविध योजनांच्या अभिसरण प्रक्रियेत सुलभता आणणे आणि उच्च गुणवत्तेचा डेटा व ग्रोटेकद्वारे कृषी उत्पादने आणि सेवांमध्ये नवकल्पना वाढविणे आणि कृषी क्षेत्रासाठी सर्वसमावेशक डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करणे हा ॲग्रीस्टॅक योजनेचा उद्देश असल्याचे मत जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी व्यक्त केले.



ही योजना सोलापूर जिल्ह्यातही कार्यान्वित केली आहे. ही योजना राबविण्यासाठी जिल्हा प्रशासनाचे तीन विभाग कार्यरत आहेत. एकेक गाव करीत अवघ्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना या योजनेत समाविष्ठ करून घेतले जाणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर होत नसल्याने आणि अनेक व्यवस्थात्मक अडचणींमुळे शेतकरी अजूनही मोठ्या प्रमाणावर अडचणीचा सामना करत आहेत. या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने ॲग्रीस्टॅक या महत्वाकांक्षी योजनेची घोषणा केली आहे. ही




योजना भारतीय शेतीच्या डिजिटल रूपांतरणाचा एक भाग आहे. शेतकऱ्यांना अत्याधुनिक कृषी तंत्रज्ञान, माहिती आणि सेवांचा लाभ देण्यासाठी तयार केली जात आहे.

या अंतर्गत प्रत्येक शेतकऱ्याचा आणि त्यांच्या शेतीच्या माहितीचा एक स्वतंत्र डिजिटल डेटाबेस तयार केला जात आहे. यामध्ये जमिनीचा प्रकार, हवामान, लागवडीचे पद्धती, पाणीपुरवठा, पीक प्रकार, उत्पादन आणि विक्रीशी संबंधित सर्व महत्त्वाच्या बाबीची माहिती असणार आहे. ॲग्रीस्टॅक हे कृषी क्षेत्रात डेटा आणि डिजिटल सेवा वापरून शासनाच्या विविध कृषीविषयक योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत जलद गतीने व परिणामकारकरीत्या पोहोचवण्यासाठी स्थापन स्थापित केले जाणारे डिजिटल फाउंडेशन आहे. शेतकऱ्यांना स्वस्त कर्ज, उच्च गुणवत्तेची कृषी निविष्ठा, विपणन स्थानिक आणि विशिष्ट तज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

सुधारित लागवड तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापन आणि खतांचा अचूक वापर केल्याने उत्पादनवाढ होईल, ई-कॉमर्स आणि थेट विक्री प्रणालीमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा अधिक फायदा मिळेल. बँका आणि वित्तसंस्थांना शेतकऱ्यांचा डेटा उपलब्ध असल्यामुळे कर्ज मंजुरीची प्रक्रिया जलद आणि सुलभ होईल.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा ॲनालिटिक्सच्या मदतीने शेतकऱ्यांना शेतीविषयक अत्याधुनिक उपाय मिळण्यास मदत होणार आहे. किमान आधारभूत किमतींवर खरेदीमध्ये शेतकऱ्यांचे नोंदणीकरणऑनलाईन पद्धतीने होईल. एकंदरीत, ॲग्रीस्टॅक योजना ही भारतीय कृषी क्षेत्रात मोठी क्रांती घडविणार आहे.




# मोफत बालरुग्ण शस्त्रक्रिया शिबीर उत्साहात

**● 'सुदृढ बालक, सशक्त भारत' : रोटरी मेगा मेडिकल मिशन**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर,दि. ३१ जानेवारी-**

रोटरी क्लब सोलापूर, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय,महिला व नवजात शिशु रुग्णालय, सोलापूर आणि लोकमान्य टिळक सर्वसाधारण रुग्णालय बाल शल्यचिकित्सा विभाग, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत बालरुग्ण शस्त्रक्रिया शिबिर उत्साहात सुरू झाले.

शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, सोलापूर महानगरपालिका आरोग्याधिकारी डॉ. राखी माने, वैद्यकीय अधीक्षक, महिला व नवजात शिशु जिल्हा रुग्णालय डॉ. जयश्री ढवळे प्रमुख बालशल्यचिकित्सा विभाग, लोकमान्य टिळक रुग्णालय मुंबईचे डॉ. पारस कोठारी, नियोजित प्रांतपाल जयेश पटेल, रोटरी क्लबचे अध्यक्ष रोटे, सुनील माहेश्वरी, सचिव रोटे, ब्रिजकुमार गोयदानी, कार्यक्रमास माजी प्रांतपाल डॉ. राजीव प्रधान, झुबीन अमेरिया, सलाम शेख, सौ. शांता येळंबकर, सौ. पारुल पटेल, सुहास लाहोटी, मितेश पंचमीया, संतोष कणेकर, विद्या मणुरे,आशिष मेहता, प्रशांत सिंगी डॉ. केदार कहाते आदी मान्यवर उपस्थित होते. अध्यक्ष सुनील माहेश्वरी यांनी सर्वांचे स्वागत केले, तर सचिव ब्रिजकुमार गोयदानी यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. ज्योती चिडगुपकर हे कार्य पाहत आहे. संदीप जव्हेरी यांनी सूत्रसंचालन केले.

**१५० हून अधिक बालरुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया**

या शिबिरात १५० हून अधिक बालरुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे. यामध्ये जीभ टाय, फिमोसिस, हर्निया, अवांतरित अंडकोष, नाभी हर्निया आणि सिस्ट यांसारख्या शस्त्रक्रिया नियोजित आहेत. मुंबईच्या लोकमान्य टिळक सर्वसाधारण रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांची टीम विशेषतः या शिबिरासाठी सोलापूरला दाखल झाली असून, जिल्हा रुग्णालयाच्या डॉक्टर आणि स्टाफ यांच्या सहकार्याने पुढील दोन दिवस शस्त्रक्रिया पार पडणार आहेत. पी. पी. पटेल फाउंडेशन तर्फे सर्व रुग्णांच्या औषधोपचाराची जबाबदारी घेतली असून, पालकांसाठी मोफत निवास व भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. चंदकांत क्षीरसागर, डॉ. श्रीकांत कुलकर्णी, डॉ. रोहन वायचाळ, तसेच रोटरी क्लब ऑफ सोलापूर, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम टीम आणि जिल्हा शीघ्र हस्तक्षेप केंद्र यांच्या सदस्यांचे विशेष सहकार्य लाभले.



# संगमेश्वर रात्र महाविद्यालयामध्ये शब्दगौरव वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

**राजवांदिता पाटील प्रथम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी संचलित, संगमेश्वर रात्र महाविद्यालय येथे राष्ट्रीय युवा दिन, राजमाता जिजाऊ जयंती, चार हुतात्मा बलिदान दिवस व संस्थेच्या ७२ वर्षपूर्ती निमित्त २८ जानेवारी २०२५ रोजी शब्दगौरव वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेच्या आयोजनाचे हे तिसरे वर्ष होते. या स्पर्धेचे उद्घाटन संगमेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. आर. पी. बुवा यांनी केले.

अध्यक्षस्थानी संगमेश्वर रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. डी. गोठे यांनी भूषविले. या स्पर्धेमध्ये शहर व जिल्ह्यातील ६१ स्पर्धकांनी आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धेमध्ये डॉ. एस. ए. तुपेरे, डॉ. एस. एस. मस्के यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

या स्पर्धेत संगमेश्वर ज्युनिअर कॉलेज मधील राजवांदिता धोंडप्पा पाटील (प्रथम) संगमेश्वर ज्युनिअर कॉलेज मधील संगीता रेवप्पा होटगे (द्वितीय), एस.व्ही.सी.एस. ज्युनिअर कॉलेज मधील स्नेहा श्रीकांत उडेशी (तृतीय ) तर कालिकामाता ज्युनिअर कॉलेज मधील अन्नपूर्णा करबसाय्या गणेचारी आणि वालचंद ज्युनिअर कॉलेज मधील पद्मा दत्तात्रय मगरूमखाने हिने (उत्तेजनार्थ) पारितोषक पटकावले.

बक्षीस वितरण पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. व्ही. जी. कोरे यांच्या हस्ते झाले. होते.

डॉ. एस. के. गिरी, आणि पी. एस. बसाटे यांनी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. यावेळी के. एन. चिकटे, आर. एस. कोळी, जी. एस. फंड, एस. वाय. शेख, एस. ए. कुलकर्णी, आर. एस. कोरे, एस. एम. चांदोडे यांच्या समवेत विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जी. एस. घनाते यांनी केले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

## भरतनाट्यम् नृत्य विशारद परीक्षेत भक्ती गायकवाड प्रथम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**
अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मुंबई, नोव्हेंबर २०२४ मध्ये यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या भरतनाट्यम विशारद या परीक्षेत भक्ती गायकवाड हिने प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन केंद्रात प्रथम येण्याचा मान मिळविला आहे.

भरतनाट्यममधील प्रारंभिक पासून विशारद पूर्ण पर्यंतच्या सर्व परीक्षा तिने तिची आई म्हणजेच शिवभक्ती नृत्यालयाच्या नृत्य गुरु अश्विनी गायकवाड यांच्याकडे पूर्ण केले. भक्ती गायकवाड सध्या पुणे येथील कमिन्स कॉलेजमध्ये कम्प्युटर सायन्स इंजीनियरिंगच्या पहिल्या वर्षात शिकत आहे.

## क्राईम वृत्त...

### कमिशनर ऑफिसमध्ये अर्ज करण्यावरून मारहाण

**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**
कमिशनर ऑफीसमध्ये अर्ज करण्याच्या कारणावरून मारहाण करणाऱ्या तिघांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत तौसिफ अहमद अब्दुल वहाब जमादार (वय ४०, रा. दक्षिण कसबा, चौपाड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शाकिर उर्फ पप्पू जमादार, अल्मास महमुद सय्यद, अरबाज सय्यद (रा. दक्षिण कसबा, चौपाड, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ जानेवारी रोजी तौसिफ जमादार यांचा लहान भाऊ शाकिर जमादार याने तौसिफ याच्या दुकानात येऊन म इझ्याविरुध्द कमिशनर ऑफीसमध्ये अर्ज करतो का असे म्हणून शिवीगाळ करून हातातील लोखंडी रॉडने तौसिफ यांस मारहाण करण्यास गेला. त्यावेळी तौसिफ यांची पत्नी मध्ये आली असता तिच्या उजव्या हाताला मार लागला. सय्यद यांनी शिवीगाळ करून तुम्ही येथे राहताच कसे आम्ही बघतो अशी धमकी दिली. सहायक पोलिस निरीक्षक जाधव पुढील तपास करीत आहेत.

### लाखाची खंडणी मागणाऱ्या दोघांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**
नोकरी घालविण्याची धमकी देऊन लाख रुपयांची खंडणी घेऊन आणखी खंडणी मागणाऱ्या दोघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत किशोर दिगंबरराव बारड (वय ४९, रा. अंबाल रेसिडेन्सी, दाजी पेठ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन महेश महादेव जाधव, माणिक महादेव जाधव (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किशोर बारड हे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात कार्यरत आहेत. बारड यांनी त्यांच्या पदाचा फायदा घेऊन त्यांची बहिण भाग्यश्री बारड यांना शिक्षक म्हणून वैयक्तिक मान्यतेचे काम करून घेतले आहे म्हणून महेश जाधव व माणिक जाधव या दोघांनी २३ डिसेंबर २०२४ ते २७ जानेवारी २०२५ या कालावधीत बारड यांना तुमची नोकरी घालवितो अशी धमकी देऊन बारड यांच्याकडून वेळोवेळी १ लाख रुपये खंडणी स्वरूपात घेतले आहेत. तसेच आणखी पैसे दे नाही तर अब्रुनुकसानीकारक लेख प्रसिध्द करण्याची धमकी दिली. म्हणून दोघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक काटे पुढील तपास करीत आहेत.

### जुना संतोष नगर येथे महिलेचे गंठण चोरीस

**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**
जुना संतोष नगर येथे महिलेच्या गळ्यातील ७५ हजार रुपयांचे सोन्याचे गंठण चोरट्याने जबरदस्तीने हिसका मारून चोरून नेले.याबाबत वैशाली दत्तात्रय पुजारी (वय ४६, रा. जुना संतोष नगर, जुळे सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वैशाली पुजारी या ३० जानेवारी रोजी सायंकाळी सातच्या सुमारास रमेश पाटील यांच्या घराशेजारी स्वयंपाक करण्यासाठी जात होत्या. त्यावेळी पाठीमागून येणाऱ्या अज्ञात चोरट्याने त्यांच्याजवळ येऊन पुजारी यांच्या गळ्यातील ७५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे गंठण जबरदस्तीने हिसका मारून तोडून चोरून नेले. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार हार पुढील तपास करीत आहेत.

### मुरूमासाठी महिलेला मारहाण करणाऱ्या चौघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**
मुरुम देण्यास नकार देणाऱ्या महिलेस मारहाण करणाऱ्या चौघांवर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सविता हणुमंत पाटील (वय ४७, रा. राऊत वस्ती, गिरीजा मंगल कार्यालय, जुळे सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन बबिता शेटे, विकि शेटे, संकेत शेटे, पी टे राऊत (रा. राऊत वस्ती, जुळे सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राऊत वस्ती येथे सरकारी रस्त्याच्या कामासाठी मुरूम टाकण्यात आला आहे. ३० जानेवारी रोजी बबिता शेटे यांनी सविता पाटील यांना मुरूम आम्हांला दे असे म्हणाल्यानंतर पाटील यांनी तो सरकारी कामाचा मुरुम आहे, मी नाही देऊ शेत असे म्हणाल्या. त्यावेळी चिडून शेटे यांनी दगडाने पाटील यांना मारहाण करून जखमी केले. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

# डीपीसीमध्ये शहराच्या दुहेरी जलवाहिनीच्या कामाबाबत आ. देवेंद्र कोठेही आक्रमक

## • अन् यामुळेच समांतर जलवाहिनीच्या कामाचे बिंग फुटले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**
सोलापूर शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी करण्यात येत असलेल्या समांतर दुहेरी जलवाहिनीचे काम महिनाभरात पूर्ण होणार असल्याचे महापालिका आयुक्त सांगत असताना त्या कामासाठी पुन्हा मुदतवाढ कशासाठी देण्यात आली? असा सवाल आमदार देवेंद्र कोठे यांनी केल्यानंतर या विषयावर चर्चा झडली आणि समांतर जलवाहिनीच्या कामाचे बिंगच फुटले.



समांतर जलवाहिनीचे काम पूर्ण झाले तरी शहरवासीयांना दररोज पाणीपुरवठा होणारच नसून, पूर्वीप्रमाणेच तीन ते चार दिवसाआड पाणीपुरवठा होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. कारण पाणी साठवण्यासाठी व त्या पाण्याचे शुध्दीकरण करण्याची यंत्रणाच महापालिकेकडे नसल्याचे सांगत महापालिका अधिकाऱ्यांनी हात वर केले आहेत.गुरूवारी पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आमदार कोठे हे शहराच्या दररोज किंवा दोन दिवसाआड पाणीपुरवठयाच्या प्रश्नावरून चांगलेच आक्रमक झाले आणि महापालिका प्रशासनावर आपला संताप व्यक्त केला. आमदार कोठे यांनी शहरातील नागरिकांच्या दृष्टीने जिव्हाळ्याच्या असलेल्या पाणीपुरवठ्याचा विषय उपस्थित करून लक्ष वेधले.

समांतर जलवाहिनीच्या कामाला अजून किती दिवस लागतील, ही जलवाहिनी झाली तरी आठ दिवसाआड पाणी का?, आदी मुद्दे उपस्थित करीत प्रशासनाला धारेवर धरले. दुहेरी जलवाहिनीच्या कामात अनेक अडथळे आले. त्यावर मात करीत पुढे चाललो आहोत. त्यामुळे विलंब होत आहे. परंतु स्मार्ट सिटी बोर्डाने ठरवून दिलेल्या वेळेपूर्वी काम पूर्ण होईल, असा दावा महापालिका आयुक्त शीतल तेली उगले यांनी केला.



**वनविभागाची जागा पालिकेने खरेदी करावी :** वनविभागाची जागा ताब्यात मिळत नसल्याने दुहेरी जलवाहिनीसाठी अडचण येत असल्याचे यावेळी निदर्शनास आल्यानंतर जागा ताब्यात नसताना निविदा प्रक्रिया का राबविली, असा सवाल आमदार देवेंद्र कोठे यांनी केला. त्यावेळी महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले म्हणाल्या की, आम्ही पाठपुरावा करीत आलो आहोत. ते काय एक दोन दिवसाचे काम नाही. तर पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, वनविभागाच्या जागेबाबत सरकार दरबारी प्रयत्न करू, पण यश येईल असे वाटत नाही. जागेसाठी सरकारने पैसे दिले नाहीत तर महापालिकेने स्वत: खरेदी करण्याची तयारी ठेवावी. कारण एवढी मोठी जागा आणि ती महापालिकेलाच मिळणार आहे, अशी युक्ती लढवत महापालिकेला पैसे तयार ठेवण्याची सूचना पालकमंत्र्यांनी केली. तसेच नवीन योजना अंमलात आल्यानंतर पाणी येईल मात्र जलशुध्दीकरणाची सध्या सोय नसल्याने पूर्वीप्रमाणेच पाणीपुरवठा होणार असल्याचे पालकमंत्री गोरे यांनी स्पष्ट केले.

# विधी संघर्ष बालकासह सहा आरोपींना अटक

**▸ ९ गुन्हे उघडकीस; तीन लाखांचा मुद्देमाल जप्त**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**
सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयातील गुन्हे शाखेच्या पोलिसांनी विधी संघर्ष बालकासह ६ आरोपींना अटक करून त्यांच्याकडून ९ गुन्हे उघडकीस आणून ५ लाख ९ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

आय्यप्पा माळप्पा पारट, विशाल शेटीबा देवकर, नागेश भिमाशंकर पाटील, चंद्रशेखर संगप्पा गुब्याडकर, ऋतिक उर्फ डेविल शंकर गायकवाड, उमेश नागनाथ भोसले (रा. सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्या गुन्हेगारांची नावे आहेत. याशिवाय एका विधी संघर्ष बालकासदेखील पोलिसांना ताब्यात घेतले आहे. या सर्वांकडून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यातील २, जेलरोड पोलिस ठाण्यातील २, सदर बझार पोलिस ठाण्यातील ४ गुन्हे उघडकीस आले असून त्यांच्याकडून ३ लाख १५ हजार रुपये किंमतीच्या चोरीच्या ८ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. तर व्यंकटेश विरम ोहन आरकाल (वय ४०, रा. गिरी झोपडपट्टी, दत्त नगर, सोलापूर) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून जेलरोड पोलिस ठाण्यातील चोरीचा गुन्हा उघडकीस आणून १ लाख ९४ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

गुन्हे शाखेच्या पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून दुचाकी चोरीचे ८ व चोरीचा एक गुन्हा उघडकीस आणला आहे. ही कामगिरी पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अल्फाज शेख, पोलिस अमंलदार बापू साठे, राहुल तागे, वसीम शेख, भारत पाटील, सुभाष मुंढे, सैपन सय्यद, सतिश काटे, बाळासाहेब काळे, सायबर पोलिस ठाण्याकडील प्रकाश गायकवाड व मच्छिंद्र राठोड यांनी केली.

## साडीने गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी -**
शहरातील घोंगडे वस्ती परिसरात साडीने गळफास घेऊन एकाने आत्महत्या केली.

राजेश व्यंकुसा हबिब (वय ५६, रा. घोंगडे वस्ती, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. ३१ जानेवारी रोजी दुपारी राहत्या घरी अज्ञात कारणाने राजेश हबिब यांनी साडीच्या सहाय्याने छताच्या लोखंडी अँगलला गळफास घेतलेल्या स्थितीत मिळून आल्याने त्यांना बेशुध्दावस्थेत खाली उतरवून जावई लखन चौधरी यांनी शासकीय रुगणलयात दाखल केले. परंतु, उपचारापूर्वीच हबिब यांचा मृत्यू झाल्याचे डॉ. शीतलकुमार यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## घरगुती कारणावरून पत्नीस मारहाण

**सोलापूर :** घरगुती कारणावरून पतीकडून पत्नीस मारहाण करून जखमी करण्यात आले. अनिसा फिरोज शेख (वय २२, रा. कुर्बान हुसेन नगर) असे जखमी पत्नीचे नाव आहे. २८ जानेवारी रोजी दुपारी घरगुती भांडणाच्या कारणावरून नवरा फिरोज याने अनिसा हिस लाटणीने व हाताने मारहाण केल्यास त्यात डोक्यास व मानेस मुका मार लागल्याने जखमी झाल्या. अनिसा यांना सासू फातिमा यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सिव्हील पोलिस चौकीत नोंद झाली आहे.

## मार्केट यार्डात तरूणास मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**
पैशाच्या कारणाने मार्केट यार्डात तरूणास मारहाण करण्यात आली. विनोद भुजंग कांबळे (वय २९, रा. मित्र नगर, शेळगी, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. ३१ जानेवारी रोजी सकाळी पावणे आकराच्या सुमारास मार्केट यार्डमध्ये काम करीत असताना विनोद कांबळे यास पैशाच्या देण्या-घेण्याच्या कारणावरून अज्ञात चार जणांनी मिळून लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्यास उपचारासाठी शासकीय रुणालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## होम मैदानावर तरुणास मारहाण; १५ जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ जानेवारी-**
शहरातील होम मैदान येथे भरलेल्या गड्ड्रा यात्रेत लहान मुलांच्या बोटींग समोर तरूणास मारहाण करणाऱ्या बोट चालकासह १५ जणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अनिल श्रीनिवास विटकर (वय २१, रा. मंगोडेकर हॉलजवळ, रविवार पेठ, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन अज्ञात बोट चालक व इतर १० ते १५ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ जानेवारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास होम मैदान येथील मार्केट चौकीच्या समोर बंदगी वडापाव दुकानाच्या बाजूस असलेल्या लहान मुलांच्या बोटींगसमोर अनिल विटकर व त्याचे मित्र श्रीनिवास मुदगल, आकाश जाधव हे थांबले असताना एक लहान मुलगा विटकरजवळ येऊन बोटमध्ये बसायचे आहे असे म्हणाला. त्यामुळे विटकर हा बोटच्या येथे त्या मुलाला घेऊन गेला असता बोटचालक हा विटकर यास तुम्हांला बसण्यासाठी बोट नाही, जावा येथून असे म्हणून अरेरावीची भाषा करू लागला. तेंव्हा विटकर हा आरोपींना नीट बोल की असे असे म्हणाल्यानंतर आरोपींनी विटकर यास शिवीगाळ केली हातातील छोट्या चाकूने डाव्या डोळ्याखाली, नाकाजवळ व उजव्या डोळ्याच्या वर हातातील चावीने मारले. तसेच दोन ते तीन वेळा चावीने मारून शिवीगाळ केली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक ढवळे पुढील तपास करीत आहेत.

# घरकुल मंजूर; परंतु जागाच नाही!

## • पंतप्रधान आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांना सर्वेक्षण अंतर्गत मिळणार जागा

### पंडित दीनदयाळ उपाध्याय योजनेतून एक लाखाचे अनुदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ जानेवारी-**
चालू आर्थिक वर्षासाठी पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत जिल्हा ग्रामीण भागात ६२ हजार २४० घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. घरकुल बांधण्यासाठी मार्च अखेर पहिला हप्ता देण्यात येणार आहे.

ज्या घरकुल मंजूर असणाऱ्या लाभार्थ्याकडे घरकुल बांधण्यासाठी जागा उपलब्ध नसेल, अशा लाभार्थ्यांना ग्रामपंचायत हद्दीतील गावठाणात जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. गावठाणात जागा उपलब्ध नसेल तर जागा खरेदीसाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय योजनेतून एक लाख रुपयाचे अनुदान देण्यात येणार आहे. दरम्यान, घरकुलासाठी किती लाभार्थ्याकडे जागा उपलब्ध आहे? यासंदर्भात पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत पातळीवर ग्रामसेवक, ग्राम विकास अधिकारी यांच्यामार्फत सर्वेक्षण करण्यात येत आहे. या सर्वेक्षणाचा अहवाल तात्काळ सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. घरकुल बांधण्यासाठी जिल्ह्याला देण्यात आलेल्या ६२ हजार २४० घरकुलांपैकी अनुसूचित जाती व जमातीसाठी ८ हजार ३०६ घरकुले आरक्षित आहेत. इतर प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी ५३ हजार ९३४ इतकी घरकुले उपलब्ध असणार आहेत.



**तालुकानिहाय घरकुलांचे उद्दिष्ट**

- अक्कलकोट - ७६१५
- बार्शी - ६००१
- करमाळा - ५६४२
- माढा - ६९६७
- माळशिरस - ६५३१
- मंगळवेढा - ५०२०
- मोहोळ - ५८२८
- पंढरपूर - ६५१७
- सांगोला - ५०७९
- दक्षिण सोलापूर - ५०१४
- उत्तर सोलापूर - २०२६
- **एकूण - ६२२४०**

**घरकुल जागेसंदर्भात सर्वेक्षण**

पात्र लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी ग्रामपंचायत पातळीवर जागा उपलब्ध आहे. नसेल तर त्यासाठी काय उपाययोजना करता येतील? याचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना मुख्यकार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी संबंधित पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यानुसार सर्वेक्षण सुरु करण्यात आले आहे .

**-डॉ. सुधीर ठोंबरे,**
**प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा**

**आराखडा तयार करून कामगिरी**

राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रत्येक विभागाने १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करून ठोस कामगिरी करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यातील ६२ हजार २४० घरकुलांचे काम सुरू करुन मार्च अखेर घरकुलाचा पहिला हप्ता संबंधित लाभार्थ्यांना देण्यासंदर्भात नियोजन आखण्यात आले आहे.

**- कुलदीप जंगम,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

## सांडपाणी टाकण्याच्या कारणावरुन मारहाण


**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**
सांडपाणी टाकण्याच्या कारणावरून वृध्देस मारहाण करणाऱ्या महिलेविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सुरताबाई लक्ष्मण जाधव (वय ७०, रा. बंजारा सोसायटी, विजापूर रोड) या महिलेच्या फिर्यादीवरुन मिराबाई राठोड (रा.प्रताप नगर तांडा) या महिलेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २९ जानेवारी रोजी दुपारी सुरताबाई जाधव यांची मुलगी सुनिता राठोड हिच्या घरी सुरताबाई जात होत्या. त्यावेळी सुनिता राठोड यांच्या शेजारी राहणाऱ्या मिराबाई राठोड या महिलने सुनिता राठोड हिच्यासमोरील सांडपाणी टाकले. याबाबत सुरताबाई यांनी विचारणा केली असता त्यांना मिराबाईने काठीने व सुनिताला हाताने मारहाण करून जखमी केले. विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. हवालदार गायकवाड तपास करीत आहेत.

# वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ जानेवारी-**
**श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या ६९ व्या पुण्यतिथीनिमित्त श्री बृहन्मठ होटगी संस्थेच्या वतीने काशी पीठाचे जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात व श्री बृहन्मठ होटगी संस्थेचे अध्यक्ष श्री चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या नेतृत्वाखाली विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेच्या वतीने देण्यात आली.**

बुधवार २९ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता अक्कलकोट रोडवरील श्री वीरतपस्वी शिक्षण संकुल व नवीन विडी घरकुल कुंभारी येथील श्री वीरतपस्वी शिक्षण संकुल येथे रक्तदान शिबीर, दि. ३० जानेवारी रोजी अक्कलकोट रोड येथील एस.व्ही. सी.एस.डी. एड. कॉलेज येथे वक्तृत्व स्पर्धा, श्लोक पाठांतर स्पर्धा,दि. ३१ जानेवारी रोजी शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी रांगोळी स्पर्धा व १ जानेवारी रोजी चित्रकला स्पर्धा घेण्यात आले होते. गुरुवार ६ फेब्रुवारी रोजी पहाटे २.०० वा. उत्तर कसव्यातील होटगी मठात व मौजे होटगी ता.द.येथील मठात शिवाचार्यांच्या हस्ते आत्मज्योत प्रज्वलित करण्यात येणार आहे. त्यानंतर श्रद्धांजली समर्पण सभा होणार आहे. पहाटे ५ वा. काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात श्री चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी हे आत्मज्योत शिरावर घेऊन हजारो भक्तगणांच्या समवेत भक्तीमय वातावरणात उत्तर कसव्यातील होटगी मठातून मौजे होटगी ता.द.सोलापूर कडे सवाद्य मिरवणुकीने मार्गस्थ होणार आहेत.



श्री वीरतपस्वी पुण्यतिथीनिमित्त बाळीवेस येथील मठात बुधवार ५फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता श्री गुरु गादीस संगीत महारुद्र पूजा, सहस्त्रबिलवारचन सायंकाळी ६ वा.शिवाचार्यांच्या सान्निध्यात बक्षीस वितरणाचा कार्यक्रम होणार आहे. रात्री ८.०० वा.गीतसंध्या व १०.०० वा. भजन व किर्तन कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहे. रविवार २६ जानेवारी ते बुधवार दिनांक ५ फेब्रुवारी पर्यंत बाळीवेस व मौजे होटगी ता.द. सोलापूर येथे दुपारी ३ ते ५ या वेळेत श्री सिद्धांत शिखामणी पारायण व बाळीवेस मठात भजन, भारुड व किर्तन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे

दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगी येथील बृहन्मठात रविवार २ फेब्रुवारी रोजी प्राईम केअर हॉस्पिटल व रेणुकाचार्य क्लिनिक यांच्या सौजन्याने डॉ आप्पासाहेब उमदी यांच्या दवाखान्यात आरोग्य तपासणी शिबिर होणार आहे. मंगळवार ४ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.००वा. रक्तदान शिबिर आयोजित केलेला आहे. गुरुवार ६ फेब्रुवारी सकाळी ११.०० वा. आत्मज्योतीचे होटगी ग्रामस्थांकडून स्वागत करण्यात येणार आहे. सायं. रथोत्सव कार्यक्रम होणार आहे. शुक्रवार ७ फेब्रुवारी रोजी दुपारी ४.०० वा. नंदीध्वज व पालखी उत्सव सायंकाळी ७.०० वा. पाळणा रात्री ८.००वा.शोभेचे दारूकाम व रात्री ९.३० वा.कुंभारी ता.द. सोलापूर येथील नाट्यसंघ यांच्या वतीने आयोजित केलेला श्री चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी महात्मे हे सुंदर सामाजिक नाटक सादर होणार आहे संस्थेने आयोजित केलेल्या या सर्व कार्यक्रमात भक्तगणानी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे, आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आलेले आहे.

**वीरतपस्वी व्याख्यानमाला, आनंदमेळाचे आयोजन**

शनिवार, दि. १ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.३० वा. कोल्हापूर येथील प्रा युवराज पाटील यांचे चला नाते जपूया या विषयावर व्याख्यान होणार आहे व रविवार, २ फेब्रुवारी, सोमवार, ३ फेब्रुवारी व मंगळवार, ४ फेब्रुवारी असे तीन दिवस सायंकाळी ५ ते रात्री १० पर्यंत अक्कलकोट रोडवरील वीर तपस्वी शिक्षण संकुलाच्या प्रांगणात विद्यार्थ्यांचा विविध कला गुणदर्शन कार्यक्रम व कमवा व शिका या योजनेअंतर्गत आनंदमेळाचे आयोजन करण्यात आलेले असून या आनंदमेळ्यात सोलापूरकारांनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०१६

**अगा आंधळिया अर्जुना । हाता आलिया मेरुही होय साना ।**
**ऐसा आथी मना । चुकीचा भावो ।।**

अर्जुनाच्या इच्छेप्रमाणे भगवंत विश्वरुपातून श्रीकृष्णस्वरुपात परत आले आहेत. विश्वरुप पाहिल्याने भगवंतांच्या खऱ्या स्वरुपाची प्रचिती अर्जुनाला आली आहे. सर्व जीवमात्रच ईश्वराचे खरे रुप असल्याचे अर्जुनाचे मत बनले असले तरीही आपल्या सख्या श्रीकृष्णाला अलिंगन देण्याची त्याची इच्छा आहे. विश्वरुपामुळे सर्वत्र, सर्वदेही समत्व पाहण्याची त्याला दृष्टी लाभल्याचे अर्जुन म्हणतो आहे. हे सर्व प्राणीमात्र म्हणजेच ईश्वर आहेत, असे अर्जुनाला पटले आहे. सातत्याने विश्वरुप पाहात न राहाता या श्रीकृष्णरुपी नाशिवंत देहाला पाहण्याची व त्या शरीराला अलिंगन देण्याची इच्छा पाहून भगवंत म्हणाले,

**अगा आंधळिया अर्जुना । हाता आलिया मेरुही होय साना ।**
**ऐसा आथी मना । चुकीचा भावो ।।**

अर्थात, अरे आंधळ्या अर्जुना, मानवाला हातामध्ये सहजासहजी आलेला मेरुपर्वतही लहानच वाटतो. खरे म्हणजे मनाची ही समजूत चुकीची आहे. विश्वरुप जे कोणालाही आजपर्यंत स्वप्नातही पाहायला मिळले नाही, ते विश्वरुप प्रत्यक्षात पाहूनही तू आता हे विश्वरुप पुरे करा व श्रीकृष्ण रुप दाखवा असे म्हणतोस ही तुझ्या मनाची समजूत अत्यंत चुकीची आहे. जर मी तुला विश्वरुप दाखविलेच नसते तर तू ते दाखवा, दाखवा असे वारंवार म्हणाला असतास. तुझी मनोमन असलेली इच्छा ओळखून मी विश्वरुप दाखविले अर्थात तुला सहजासहजी



विश्वरुप पाहायला मिळाल्याने तुला या विश्वरुपाची किंमत वाटत नाही. आपल्या जीवनातही असे अनेक प्रसंग घडत असतात. एखादी गोष्ट, वस्तु, व्यक्ती आपणाला मिळावी म्हणून आपण खूप प्रयत्न करीत असतो; पण योगायोगाने जर ती वस्तू, गोष्ट, व्यक्ती आपणाला सहजासहजी प्राप्त झाली तर आपणाला त्याची किंमत वाटत नाही. खरे म्हणजे हा वेडेपणा आहे. पती,पत्नी होण्यासाठी आपल्याबरोबर आपल्यासाठी इतरही लोक प्रयत्न करतात. एकदा का लग्न झाले की, मग हळू-हळू अनेकांना आपल्या जोडीदाराचे महत्व वाटत नाही. एकमेकांचे उणे-दूणे काढून वादविवाद केले जातात. सोडून देण्याची भाषा बोलली जाते. कारण प्राप्त करण्यासाठी तेवढे कष्ट न केल्याने व एकमेकांना एकमेकांचा खरा परिचय न झाल्याने असे घडते. नाते टिकविण्यापेक्षा टाकण्याचा प्रयत्न करणाऱ्यांची संख्या जास्त आहे. सुदैवाने सहजासहजी जरी एखादी व्यक्ती, वस्तू प्राप्त झाली असली तरी त्याची महती कमी होणार नाही असे आपले वर्तन असायला हवे, तरच त्यापासून खरा आनंद प्राप्त होतो. ज्याचे त्याचे स्थान त्या-त्या ठिकाणी टिकवून ठेवण्याची आपली मानसिकता असावी. रोजच्या किंवा वारंवार भेटीमुळे किंवा सहजासहजी सहवास लाभणाऱ्या सद्गुरुंची, मान्यवरांची, आई-वडिलांचीही किंमत कमी करणारे भरपूर लोक समाजात पाहायला मिळतात. आपल्याकडून कोणत्याही परिस्थितीत कोणालाही कमी लेखले जाणार नाही याची दक्षता आपण घेऊ या. आपण माऊलींच्या ओव्यांच्या सहवासात राहून माऊलींच्या सूचनेप्रमाणे वागणारे माऊली भक्त आहोत. कारण अशा वागण्यातच खरा आनंद आहे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. १ फेब्रुवारी २०२५ | श्री गणेश जयंती, |
| विक्रम संवत् २०८०-८१ | गणपतीपुळे यात्रा |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - फाल्गुन | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. तृतीया - (११.३८) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - शिशिर | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पू.भाद्रपदा (२६.३२) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - परिघ (१२.२४) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - वणिज (२२.२६) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

**वृषभ** : नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. आत्मविश्वासाने संकटाला सामोरे गेल्याने जीवनातील संकट टळेल.

**मिथुन** : व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क** : विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. वाचनाची गोडी वाढले.

**कन्या** : जिवनात यश मिळेल. लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. आज आनंदी दिवस जाईल.

**तुळ** : परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. उपयोगी चर्चा घडून येईल. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. आर्थिक आवक वाढेल.

**धनु** : मानसिक संतोष निर्माण होईल. प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर** : लोकप्रियता वाढणार आहे. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. मुलांना आनंद मिळेल. खर्चाचे योग आहेत.

**कुंभ** : नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. जीवनात नवीन संधी मिळाल्याने यश प्राप्त होईल.

# माघवारीचा सोमवारी गोल रिंगण सोहळा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**


अखिल भाविक वारकरी मंडळ यांच्या माध्यमातून शहर व जिल्ह्यातील माघवारीला जाणाऱ्या सर्व दिंडीचे एकत्रीकरण करून प्रस्थान व रिंगण सोहळा सुरु केला आहे. यंदा सोमवार दि. ३ फेब्रुवारी २०२५ रोजी हा रिंगण सोहळा सोलापुरात होणार आहे, अशी माहिती अखिल भाविक वारकरी संप्रदायिक मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुधाकर इंगळे महाराज यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोमवारी श्री मार्कंडेय मंदिर, पंचकट्टा सोलापूर येथे दुपारी ४ वाजता संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखीचे पूजन नागनाथ शिंदे महाराज, महेश जाधव महाराज यांचे हस्ते केले जाणार आहे. वारकरी प्रथे प्रमाणे नित्य नियमाचे अभंग व भजन केले जाणार आहे. उपस्थित सर्व दिंडीतील विणेकरी महाराज व पदाधिकारी यांचा पद्मशाली ज्ञाती संस्थेचे सुरेश फलमारी यांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे.

हा पालखी सोहळा ज्ञानोबा तुकाराम भजन करत नॉर्थकोट प्रशाला मैदान, सोलापूर येथे पोहोचेल आणि नंतर मान्यवर व उमाकांत मिटकर, प्रदीप मोरे महाराज यांचे हस्ते अश्व पूजन केले जाणार आहे. तदनंतर गोल रिंगण लाऊन घेतले जाईल. पहिले रिंगण ध्वजाधारी करतील कारण दिंडीची सुरुवात पताका ने होते. तुळशी वृंदावनधारी महिला व मृदंगाचे रिंगण झाल्यानंतर विणेकरी रिंगण केले जाणार आहे. शेवटी अश्व रिंगण करण्यासाठी कर्नाटक अंकली येथून माऊलींचे अश्व येणार आहेत हे सोलापूर भाविकांचे परम भाग्य आहे. हा सोहळा श्री महादेव मंदिर साठे चाळ, सोलापूर येथे पोहोचणार आहे. त्यानंतर माजी गटनेते आनंद चंदनशिवे, विजय चोरमुले यांच्या हस्ते आरती करून समारोप केला जाणार आहे. या मध्ये शहरातील ३८ व परिसरातील २५ दिंडी सहभागी होतील. माघवारीतील दुसरे गोल रिंगण दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता पाटकर वस्ती, कुरुल ता. मोहोळ येथे होणार आहे. तिसरे गोल रिंगण महात्मा गांधी विद्यालय, पेनूर येथे होणार असून चौथे गोल रिंगण श्री दत्त विद्यालय, सुस्ते,ता. पंढरपूर येथे होणार आहे. तसेच दि. ७ फेब्रुवारी २०२५ सकाळी ९.३० वाजता जलाराम मठ समोर, पंढरपूर येथे उभे रिंगण होणार आहे. हा सोहळा पाहण्यासाठी शहरातील व परिसरातील हजारो महिला व पुरुष भाविक उपस्थित राहणार आहेत. तसेच राष्ट्रीय अध्यक्ष सुधाकर इंगळे महाराज यांच्या मार्गदर्शनाने हा सोहळा संपन्न होत आहे. या सर्व कार्यक्रमासाठी प्रदेशअध्यक्ष जोतिराम चांगभले, राष्ट्रीय सचिव बळीराम जांभळे , प्रदेश उपाध्यक्ष किसन कापसे, प्रदेश सचिव मोहन शेळके, जिल्हा अध्यक्ष बंडोपंत कुलकर्णी, शहर अध्यक्ष संजय पवार सर्व पदाधिकारी परिश्रम घेत आहेत. या पत्रकार परिषदेत बळीराम जांभळे, किसन कापसे, मोहन शेळके, बंडोपंत कुलकर्णी, संजय पवार आदी उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती मो.
९९६००५३५२१

**अलकः- (३८) प्रार्थना (३)**

समुत्कर्ष निःश्रेयस्यैकमुग्र परं साधनं नाम वीरव्रतम् तदन्तः स्फुरत्वक्षया ध्येयनिष्ठा हृदन्तः प्रजागर्तु तीव्राऽनिशम् । विजेत्री च नः संहता कार्यशक्तिर् विधायास्य धर्मस्य संरक्षणम् परं वैभवं नेतुमेतत् स्वराष्ट्र समर्था भवत्वाशिषा ते भृशम् ।३।

अर्थः- उच्च असे आध्यात्मिक सुख आणि महानतम अशी ऐहिक समृद्धी प्राप्त करण्याचे एकमेव श्रेष्ठतम असे साधन असलेली उग्र अशी वीरव्रताची भावना आमच्यात सदैव उत्स्फूर्त होत राहो. तीव्र आणि अखंड अशी ध्येयनिष्ठा आमच्या अंतःकरणात सदैव जागती राहो. तुझ्या कृपेने आमची ही विजयशालिनी संघटित कार्यशक्ती आमच्या धर्माचे संरक्षण करून या राष्ट्राला वैभवाच्या उच्चतम शिखरावर पोहोचवण्यास समर्थ होवो.

**- क्रमशः**



# श्राविका विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

उमाबाई श्राविका विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा विद्यार्थी शिक्षक दिन निरोप समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्राविका प्रशालेच्या वरिष्ठ मार्गदर्शिका दीप्ती शाह, प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस माता सरस्वती देवी व राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी प्रशालेस वाचनीय पुस्तकाचा संच व पियानो वाद्य भेट दिली. कार्यक्रमाचे नियोजन इयत्ता नववी अ च्या विद्यार्थ्यांनी केले. याप्रसंगी विद्यार्थी शिक्षक झालेल्यांचे निरीक्षण महाडिक, उपाध्ये, पाटील यांनी केले. सूत्रसंचालन अनुष्का केत हिने केले तर आभार धनश्री होणपारखे यांनी मानले. कलाशिक्षक प्रविण कंदले यांनी फलक लेखन केले होते. इयत्ता दहावीच्या वर्ग शिक्षिका केतकी सोनटक्के, सोनल आळंद, मिनाक्षी बेळ्ळे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुकुमार वारे, राजकुमार देवकाते, अनुप कस्तुरे, सुहास छंचुरे, अभिनंदन उपाध्ये, वौभव बारडकर, प्रविण शहा, अनंत बळ्ळे, अभिजित पाटील प्रसन्न गाडे यांनी परिश्रम घेतले.

# सोशल महाविद्यालयात आजपासून राष्ट्रीय साहित्य परिषद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

इदार ए-अदब इस्लामी हिंद व सोशल महाविद्यालयातर्फे समाज की सुरते हाल और अदब का किरदार या विषयावर १ व २ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय साहित्य परिषद सकाळी ११ ते ५ पर्यंत होणार आहे. यात उर्दू मुशायरा, बहुभाषिक साहित्यावर चर्चासत्र होणार आहे.

डॉ. सलीम खान यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन होत असून यावेळी प्रा. बशीर परव, डॉ. इस्माईल शेख, प्रा. मकबूल अहमद मकबूल, प्राचार्य डॉ. इक्बाल तांबोळी, डॉ. गुलाम फरीद, डॉ शफी चोबदार, डॉ गौस शेख, डॉ. ए. ए.बिजापूरे, डॉ. हारून बागबान, डॉ. फहिम, मसीहोद्दीन, नुरूल हसनेन, अजीम नवाज खान हसनैन, डॉ. दानिश, डॉ. हंजरा, डॉ. गजनफर, डॉ. कुरैशी, डॉ. सय्यद अलीम, डॉ. युसूफ बिदरी, डॉ समीऊद्दीन, डॉ. वसीम इकबाल, असरार कामटी मार्गदर्शन करणार आहेत. रात्री ७ वाजता रऊफ खैर यांच्या अध्यक्षतेखाली मुशायारा, बहुभाषिक साहित्य चर्चासत्र समीक्षक सरफराज शेख यांच्या अध्यक्षतेखाली व अखिल भारतीय मुस्लीम मराठी साहित्य परिषदचे सचिव अय्युब नल्लामंदू यांच्या उपस्थित होणार आहे. डॉ. वडजे, प्राचार्य इ. जा. तांबोळी, डॉ. देविदास गायकवाड, डॉ. भगवान आदटराव, प्रा. सुभाष शास्त्री, प्रा.रईसा मिर्जा सहभाग घेणार आहेत. सात सत्रात हा कार्यक्रम होणार आहे. डॉ. अस्मत जावेद व कवी हफीज मेरठी यांच्या स्मरणार्थ साहित्य पुरस्कार डॉ. कलीम जिया, डॉ. गझनफर इक्बाल यांना प्रदान करण्यात येईल. मतीन अचलपूरी लिखित मदहते सहाबा (रजि) या पुस्तिकेचे प्रकाशन होइल. यात सहभागी होण्याचे आवाहन संस्थाध्यक्ष प्रा. मकबूल अहमद, सचिव फरीद मोनीस, डॉ. इस्माईल शेख, प्राचार्य तांबोळी यांनी केले आहे.

# महाआरोग्य शिबिरात ४८७ जणांची तपासणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

पद्मशाली समाजाचे कुलदैवत भगवान मार्कंडेय महामुनी यांचा जयंती निमित्त पद्मशाली युवक संघटना व सोलापूर मार्कंडेय रुग्णालय यांच्या वतीने नवीन विडी घरकुल ब ग्रुप अन्नपूर्णा देवी मंदिर येथे भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात विविध आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. ज्यामध्ये आरोग्य तपासणी, वैद्यकीय सल्ला आणि आवश्यक औषधांचे वाटप यांचा समावेश होता. यावेळी पूर्वा डिस्ट्रीब्यूटरचे श्रीधर वडणाल आणि सागर माटेटी त्यांनी वयस्कर वृद्धांना अँड वाकर देण्यात आले. या शिबीरात ४८७ लोकांनी सहभाग नोंदवन आरोग्याची तपासून करून घेतले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेश विडप, डॉ. राजाराम पुल्ली, पूर्वा डिस्ट्रीब्युटरचे श्रीधर वडनाल, सागर माटेटी, युवक संघटनेचे माजी अध्यक्ष गिरीश कोटा, माजी अध्यक्ष राकेश पुंजाल, युवक पत्रकार रोहन श्रीराम, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी युवक संघटनेचे प्रेसिडेंट नागेश बोमडयाल,अध्यक्ष शेखर कटकम,सचिव विजय निली, कार्याध्यक्ष नागेश बंडी, उपाध्यक्ष अँड. शाम आडम, अंबादास कुडक्याल, सागर इप्पलपल्ली, महेश येमुल, श्रीनिवास गुंडेटी, निलेश मच्छा, गोविंद कोंकत्ती, गणेश क्यामा उपस्थित होते.



# छत्रपती शिवाजी मुस्लिम बिग्रेडच्या वतीने सुशिल बंदपट्टे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ जानेवारी-**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवजन्मोत्सव मध्यवर्ती मंडळाच्या अध्यक्षपदी सुशील बंदपट्टे यांची निवड झाल्याबद्दल मराठा सेवा संघ संचलित छत्रपती शिवाजी मुस्लिम बिग्रेडच्यावतीने लक्ष्मी मार्केट येथील हनुमान मंदिरजवळ त्यांचा मतीन बागवान यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग विभाग वसीम बुऱ्हान यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी इरफान शेख, इरफान शेख, युनूस भाई बागवान, शरीफ रचभारे, फायज मुनसी, पदाधिकारी आदी उपस्थित होते. यावेळी शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ नूतन अध्यक्ष सी. ए. सुशील बंदपट्टे, वसीम खाजा बुरहान सदस्य महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग मुंबई, राजा बागवान, ओघ फौंडेशन मुंबई 'जिवनगौरव' पुरस्कार प्राप्त, इरफान शेख मुस्लिम आरक्षणासाठी सोलापूर ते मुंबई पायी यात्रा शफीक रचभरे उमरा या पवित्र यात्रेस रवाना झालेल्या या मान्यवरांचा देखील सत्कार करण्यात आला. याप्रसंगी इम्तियाज म. उस्मान मर्चंट, फय्याज मुन्शी, राजू हुंडेकरी, बशीर सय्यद, माजी नगरसेवक हारुण शेख, जावेद बद्दी, तन्वीर गुलजार, कादर भागानगरी, कय्युम मोहळकर उपस्थित होते.

# एलबीपीएम महाविद्यालयास 'ए प्लस' मानांकन

## 'ए प्लस' मानांकन मिळविणारे पहिले महाविद्यालय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**

सात रस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयास नॅक बेंगलुरूकडून 'ए प्लस' मानांकन प्राप्त झाले आहे. नुकतेच नॅकच्या पिअर टीम द्वारा महाविद्यालयाच्या पुनर्मूल्यांकनाची चौथी फेरी पार पडली. महाविद्यालयाने प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे यांच्या मार्गदर्शनात अभ्यासक्रम, अध्ययन, अध्यापन आणि मूल्यमापन, संशोधन आणि नाविन्यता, भौतिक सोयी सुविधा आणि अध्यापनाची संसाधने, विद्यार्थी सहायता आणि प्रगती, व्यवस्थापन, संस्थात्मक मूल्य आदी घटकांच्या आधारे झालेल्या या मूल्यांकनात 'ए प्लस' हा दर्जा प्राप्त केला. असे मानांकन प्राप्त करण्याचा मान सोलापूर शहरात प्रथमच या महाविद्यालयास मिळाला आहे. यापूर्वी झालेल्या नॅकच्या तिसऱ्या फेरीमध्ये महाविद्यालयास 'ए' मानांकन प्राप्त झाले होते. महाविद्यालयाच्या या यशाबाबत रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, मध्य विभागाचे चेअरमन संजीव पाटील, संघटक डॉ. अनिल पाटील, सचिव विकास देशमुख, प्राचार्य डॉ. शिवलिंग मेदनकुदळे सह सचिव (उच्च शिक्षण), प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे सह सचिव (ऑडिट), बंडू पवार सहसचिव (माध्यमिक) यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे, उपप्राचार्य प्रा. देवराव मुंडे, आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रा. निलोफर तांबोळी यांच्यासह सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर सेवकांचे अभिनंदन केले.

# बंथनाळ श्री वृषभलिंगेश्वरचा आजपासून वार्षिक यात्रा महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ जानेवारी-**

जुळे सोलापूर येथील बंथनाळ योगाश्रम श्री वृषभलिंगेश्वर मठाचा दोन दिवसीय यात्रा महोत्सव शनिवारी १ व रविवारी २ फेब्रुवारी रोजी साजरा होत आहे.

शनिवारी सकाळी घुळी महाराज (शिरवळ) यांच्या हस्ते ध्वजारोहण, नऊ वाजता कुंभमेळा व पालखीची मिरवणूक, महालिंगास कुंभाभिषेक, त्यानंतर महाप्रसाद वाटप, सायंकाळी ७ वाजता दीपोत्सव, रात्री हनुमान भजनी मंडळाचे भजन, रविवार दि. २ रोजी पहाटे महारुद्राभिषेक, नऊ वाजता प. पू. वृषभ लिंगेश्वर महास्वामीजीची पाद्यपूजा होऊन सकाळी ११ वाजता महाराजांचे आशिरवचन होईल. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप होईल. कार्यक्रमास माजी खा.डॉ. जयसिद्धेश्वर महाराज, विरक्त मठ अक्कलकोटचे श्री बसवलिंग महास्वामी, उद्योजक शिवानंद पाटील, आण्णाराव भोपळे, डॉ. शिरीष कुमठेकर, विश्वनाथ शेगावकर, उद्योजक सिद्धेश्वर पाटील, शिवलिंग कांबळे, सदाशिव शेळकेसाहेब यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सर्व कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन पंच कमिटीचे बसवराज सोनद, धनराज शिंदे, महेश घाडगे, शिखरे, लहू इरकशेट्टी, प्रभाकर राऊत, बी. एन. पाटील, शरणप्पा वाडी, प्रदीप सुरवसे, संतोष इरकशेट्टी, संगप्पा भासगीकर, शिवाजीराव कोकरे आदींनी केले आहे. व्यवस्थापक हुगार व महिला मंडळाचे ज्योती रेऊरे, राजश्री गायकवाड, मेघा डांगे, अरुणा वाघमारे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

# मातीला पंख फुटताना

डॉ. स्मिता पाटील या मराठी साहित्यात कवयित्री आणि ललित लेखिका म्हणून ओळखल्या जातात. व्यवसायाने डॉक्टर असून सुद्धा त्यांनी आपल्या सर्जनशीलतेसाठी निवडलेले हे लेखनाचे क्षेत्र म्हणजे त्यांच्यातली समजाप्रती असलेली आस्था आणि अस्वस्थता हेच होय असे निः शंकपणे म्हणावे लागेल, त्याच भावनेतून त्यांनी लिहिलेली 'मातीला पंख फुटताना' ही कादंबरी समजून घ्यावी लागते.

कुमारवयीन मुला-मुलींना आणि विशेषत्वाने मुलींना समोर ठेवून डॉ. स्मिता पाटील यांनी प्रस्तुत कादंबरी लिहिली आहे. या कादंबरीची प्रतवारी करावयाची झाली तर ती कुमारकादंबरी आहे, अशी करावी लागते; पण बाल-कुमार साहित्यात जशी काल्पनिकता आणि बोधवाद, उपदेशपरता असते, तशी मांडणी या कादंबरीची नाही. एका निम्न आर्थिक स्तरातील समाजघटकाला समोर ठेवून 'मातीला पंख फुटताना'ची मांडणी लेखिका करते, मुलगी वयात आली की तिचं लग्न लावून देणं आणि आपल्या डोक्यावरचा भार हलका करणं, ही पारंपरिक समजूत कमी उत्पन्नगटाच्या कृषक वर्गात आजही तेवढ्याच तीव्र स्वरूपात दिसून येते. अशा समाजचौकटीत जन्मलेली गौरा ही दहावीत शिकणारी मुलगी या सामाजिक समजाविरुद्ध उभी राहाते आणि त्यात ती यशस्वी होते. ही कथा म्हणजे गौरा सारख्या या समाजात पिचल्या जाणाऱ्या आणि कमी वयात संसाराच्या गाड्याला जुंपणाऱ्या मुलींसाठी मोठा आदर्श ठरते आणि हाच आशय डॉ. स्मिता पाटील आपल्या या कादंबरीतून अधिक प्रभावीपणे व्यक्त करतात.

प्रभावी व्यक्तिचित्रण, काळजाला भिडणारी प्रसंगनिर्मिती, बोलीभाषेचा गोडवा, तरुण मुलांच्या भावविश्वाची चपखल मांडणी आणि नकळत समाजाला दिला जाणारा सावित्रीबाई फुलेंच्या स्त्रीशिक्षणाविषयक आदर्शाचा संदेश यामुळे 'मातीला पंख फुटताना' ही कादंबरी अधिक प्रभावीपणे वाचकांच्या मनाचा ताबा घेणारी ठरते. कादंबरीकार म्हणून डॉ. स्मिता पाटील यांनी आपल्याविषयीच्या अपेक्षा निश्चितच उंचावल्या आहेत आणि हेच या लेखनामागील त्यांचे यश आहे, हे निर्विवाद.




**- डॉ. रवींद्र शोभणे**

## संक्षिप्त वृत्त



### सुलाखे हायस्कूलमध्ये क्रीडा सप्ताह

**बार्शी, दि. ३१ जानेवारी-**

सुलाखे हायस्कूल बार्शी येथे क्रीडा सप्ताहानिमित्त क्रिकेट स्पर्धेचे आयोजन प्रशालेच्यावतीने करण्यात आले. ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राहुल वाणी यांच्या हस्ते प्रशालेच्या ध्वजाचे ध्वजारोहण व क्रिकेटचे उद्घाटन करण्यात आले. उपप्राचार्य रा. द. इंगळे यांनी संस्थेचे अध्यक्ष राहुल वाणी, सहसचिव नागनाथ सोनवणे, प्रसिद्धी प्रमुख सुनील फल्ले, खजिनदार मानकोजी ताकभाते यांचा सत्कार केला. प्राचार्य स्वामीराव हिरोळीकर, उपप्राचार्य राज इंगळे, परिवेक्षिका जावळे, तालुका क्रीडा समन्वयक समीर वायकुळे, संतोष पवार, सुहास शिंदे, क्रीडा विभाग प्रमुख प्रमोद माळी, विशाल बुडुख, क्रिकेट कोच देशमुख, सुपरवायझर प्रसन्न देशपांडे यांच्या उपस्थितीत क्रिकेटचा पहिला सामना अ, ब, कविरुद्ध ड, फ मुलांचा सामना झाला. संस्थेचे अध्यक्ष राहुल वाणी यांनी विजय संघास ५०१ रुपयांचे बक्षीस जाहीर केले. सूत्रसंचालन संतोष पवार यांनी केले. दहावीमध्ये शिकत असलेला विद्यार्थी अतिश बाळू पवार यांना दोन्ही कानातील श्रवण यंत्रे देण्यात आले. याप्रसंगी राहुल वाणी, नागनाथ सोनवणे, सुनील फल्ले, प्रमोद माळी, देशमुख, सुभाष शिंदे, समीर वायकुळे यांनी मनोगत व्यक्त केले.



### सुस्तेतील श्री दत्त विद्यामंदिरात वार्षिक पारितोषिक वितरण

**पंढरपूर, दि. ३१ जानेवारी-**

श्री दादासाहेब सोमदळे शिक्षण प्रसारक मंडळ, पंढरपूर संचलित, श्री दत्त विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, सुस्ते (ता. पंढरपूर) प्रशालेचा ४५ वा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी कीर्तनकार कवी सूर्याजी हरी भोसले, संस्थेचे अध्यक्ष डॉ. मदन क्षीरसागर, उपाध्यक्ष शिवाजी वाघ, सचिव ॲड. वैभव टोमके, सहसचिव अजित नडगिरे, खजिनदार सलीम वडगावकर, ज्येष्ठ संचालक आप्पासाहेब चोपडे, दिलीप घाडगे, अनिरुद्ध सालविठ्ठल, विजयकुमार माळवदकर, सुनीता मोरे, प्राचार्य प्रा. सुधाकर पिसे, पर्यवेक्षक रणजीत शिनगारे, ज्येष्ठ लिपिक राजकुमार ढगे, स्नेहसंमेलन प्रमुख नितीन वायदंडे, सरस्वती शिंदे उपस्थित होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. स्काऊट-गाईडच्या संचलनाने स्वागत करण्यात आले. विद्यार्थिनींनी लाठीकाठी, नॉनचोक व तलवारबाजीच्या प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची मने जिंकली. अहवालाचे वाचन प्राचार्य सुधाकर पिसे यांनी केले.



### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रदेशाध्यक्षपदी गोविंद वाकडे

**अक्कलकोट, दि. ३१ जानेवारी-**

पत्रकार गोविंद वाकडे यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रदेशाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. मुंबई येथे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत राष्ट्रीय अध्यक्षपदी अशोक वानखेडे, प्रदेशाध्यक्षपदी गोविंद वाकडे, कार्याध्यक्षपदी निलेश सोमणी, प्रदेश उपाध्यक्षपदी अशोक देडे, किशोर रायसाकडा, डॉ. अभयकुमार दांडगे, नितीन शिंदे, महेश पानसे, इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रदेशाध्यक्षपदी अतुल परदेशी, सोशल मीडिया प्रदेशाध्यक्षपदी सिद्धार्थ भोकरे, पत्रकार हल्ला विरोधी समिती प्रमुखपदी किशोर पाटील, मंत्रालय संपर्क प्रमुखपदी नितीन जाधव, संघाच्या प्रवक्तेपदी रमेश डोंगरे यांची निवड करण्यात आली.



### वैरागच्या जाधव प्रशालेत हळदी-कुंकू कार्यक्रम

**वैराग, दि. ३१ जानेवारी-**

एकता महिला मंचच्यावतीने वैराग येथील तुळशीदास जाधव प्रशालेत हळदी-कुंकवाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सिंधू देशमुख, डॉ. ज्योती तीर्थ, रेश्मा नरखेडकर, ज्योती खेंदाड, प्रभाकर क्षीरसागर, विद्या म्हस्के, अश्विनी भोसले, विनंता दाणे, हिना शेख, जयमाला कदम, प्रियंका नलवडे, मेघा नवले, शैला काशीद, वैशाली माईनकर, फतीमा कोतवाल, वृषाली उज्जनकर, मंगल चव्हाण, रत्नप्रभा गायकवाड, शीतल दीक्षित, लक्ष्मी सुतार, हेमा कावरे, सविता आपुणे, ज्योती आपुणे, पद्मा दिवाकर उपस्थित होत्या. सूत्रसंचालन वृषाली उज्जैनकर, प्रास्ताविक विद्या म्हस्के यांनी केले. मनोगत विनंता दाणे यांनी व्यक्त केले. आभार शैला काशीद यांनी मानले.

### नागणसूर येथील वस्ती शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

**अक्कलकोट, दि. ३१ जानेवारी-**

नागणसूर येथील जि. प. कन्नड हिप्परगी वस्ती शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त लोकनेते वहीदपाशा पाटील प्रतिष्ठान व राष्ट्रवादीतर्फे शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष पीरपाशा पिरजादे-पाटील होते. यावेळी बसवराज दरगोंडा, प्रशांत प्रचंडे, शिवानंद बिराजदार, गुरप्पा दरगोंडा, लक्ष्मण हुलूर-जमादार, श्रीमंत दरगोंडा, नागनाथ माड्याळ, कन्याकुमारी माड्याळ, शीलवंती दरगोंडा, प्रेमा बनसोडे, मल्लिनाथ दरगोंडा, राजश्री प्रचंडे, सिद्धाराम दरगोंडा, गंगाराम होटकर, सीमा हिरतोट उपस्थित होते. सूत्रसंचालन मुख्याध्यापक मलकप्पा हिप्परगी यांनी केले.

# हरभरा घाटे आळी एकात्मिक नियंत्रण काळाची गरज

## अकलूज कृषी मंडल अधिकारी सतीश कचरे यांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. ३१ जानेवारी-**

ऊस, ज्वारी, मका, तूर, हरभरा या पिकावरील नुकसान करणारी हेलॅओथिस आर्मिजेराही एक किडी आहे. या अळीस हरभरा, तूर या पिकाचे घाटी खूप आवडतात व हिच्या प्रादुर्भावामुळे ३५ ते ४० टक्के नुकसान होते. त्यामुळे या अळीचे एकात्मिक नियंत्रण करणे अतिशय महत्त्वाचे आहे. अंडी, अळी, कोष व फुलपाखरू हा जीवनक्रम आहे. यामधील आळी हा जीवनक्रम अतिशय उपद्रवी असल्यामुळे तिचे नियंत्रण करणे गरजेचे असल्याचे अकलूज कृषी मंडल अधिकारी सतीश कचरे यांनी सांगितले.

सतिश कचरे म्हणाले, अळीचा पतंग



पानावर कोवळी, शेंडे, फुल, कळी यावर अंडी घालतात. अंडी एकत्रित घातलेली असून ती खसखशीसारखी दिसून येतात. दोन ते तीन दिवसांनी आळी अंड्यातून बाहेर पडल्यानंतर कोवळ्या पानाचे हरितद्रव्य खरवडून खाते व त्यानंतर कळ्या फुले घाटेवर नुकसान करते. हरभऱ्याच्या घाटेला छिद्र पाडून आतील दाणे खाऊन साधारणतः एक आळी ३० ते ४० घाटांचे नुकसान करते. यामुळे याची नुकसानाची तीव्रता खूप आहे. त्यासाठी खालील प्रमाणे एकात्मिक नियंत्रण करावे.

उन्हाळ्यात खोल नांगरट करून घाट्याळीचे जमिनीतील कोश जमिनीवर ते आल्यानंतर उष्णतेच्या तीव्रतेने पक्षाने वेचून खाल्ल्यामुळे याची पुढची पिढी तयार होत नाही, मसूर, मोहरी, जवस यासारखी आंतरपिके लावावेत, प्रतिहेक्टरी पिकापेक्षा एक फुटाणे उंच लाकडाची म चांकडून पक्षी थांबा उपलब्ध करून द्यावा, अळीच्या प्रादुर्भावाची तीव्रता व पुढचे प्रजनन रोखण्यासाठी हेक्टरी दहा फेरोमेन ट्रॅप हेलिओ ऑथिसच्या ॲल्युर्स वापरून निरीक्षणे घ्यावीत, अळीचे नैसर्गिक भक्षक उदाहरणार्थ क्रायसोपा,लेडी बर्ड बीटल रेडी, रेडू विड ढेकूण यांचे सोंगपणासाठी प्रथमतः रासायनिक किटनाशका वापर करू नये.

**नुकसान टाळावे**

जैविक सेंद्रीय रासयनिक एकात्मिक नियंत्रण करून ३५ टक्के ते ४० टक्के नुकसान टाळण्याचे अहवान सेवारत्न सतिश कचरे मंडळ कृषि अधिकारी खडज ९००१:२०१५ यांनी केले आहे.

**अशी करा उपाययोजना**

घाटे अळीची अंडी नपुसक करण्यासाठी व प्राथमिक अवस्थेतील अळीची भूक मंदावण्यासाठी पाच टक्के निंबोळी अर्क किंवा झेडेदेक्टीन ३०० पीपीएम ५० मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी, अळ्या दिसू लागताच एच एन पीव्ही हेक्टरी ५ अळी क्रश द्रावण प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी, प्रति मिटर १ अळी किंवा ५ टक्के घाटे नुकसानग्रस्त झाल्यानंतर क्विनॉलफॉस २० मिलि किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ टक्के ३ साची फवारणी करावी.

# इंगळे महाविद्यालयामुळे तंत्रनिकेतन शिक्षणाची सोय

## शांभवी कल्याणशेट्टी यांची इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयास भेट

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ जानेवारी-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने येथील कै. कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयात अनेक गरजू विद्यार्थ्यांना तंत्र शिक्षणाची सोय तालुक्यातच मिळत असल्याने मोठी सोय झालेली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत तंत्रशिक्षण पोहोचविण्याबाबत कै. कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन तालुक्याचे आ. सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या सुविद्य पत्नी शांभवी कल्याणशेट्टी यांनी केले.

येथील कै. कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयात आयोजित सोलापूर जिल्हा चौदावे वार्षिक गणित अधिवेशन कार्यक्रम



स प्रमुख पाहुणे म्हणून त्या बोलत होत्या. शांभवी कल्याणशेट्टी यांनी कै. कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या शैक्षणिक धोरणांना व उपक्रमांना स्वामी समर्थांची सेवा या उदात्त हेतूने नेहमीच सहकार्य करण्यास तत्पर असल्याचे मनोगतही व्यक्त केले. यावेळी प्रथमेश इंगळे, जिल्हा परिषद उपशिक्षण अधिकारी स्वाती हवेले, शिक्षण उपनिरीक्षक श्वेता नडीमेटेल, महाराष्ट्र गणित अध्यापक मंडळाचे तालुका अध्यक्ष कलप्पा बुळ्ळा, महाविद्यालयाचे प्राचार्य नागनाथ जेऊरे, उपप्राचार्य विजयकुमार पवार, गणित आध्यापक तथा संगीत अलंकार मनोहर देगावकर, प्रा. शिवशरण अचलेर, दर्शन घाटगे, तुषार मोरे, धनराज स्वामी, श्रीशैल गवंडी, उमेश सोनवणे, सचिन घाटगे, प्रसाद पाटील उपस्थित होते.

# महात्मा गांधींच्या कार्याचा अभ्यास करावा

## सोमशेखर स्वामी : कल्याणशेट्टी महाविद्यालयात महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ जानेवारी-**

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत मोलाचे योगदान देणारे महात्मा गांधी यांचे कार्य प्रेरणादायी असून विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा अभ्यास करावा. तसेच अहिंसा, सत्य तत्त्वज्ञानाचा स्वीकार करावा, असे प्रतिपादन शिक्षण विस्तार अधिकारी सोमशेखर स्वामी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, इतिहास व राज्यशास्त्र अभ्यास मंडळाने आयोजित केलेल्या अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्र प्रमुख इस्माईल जमादार होते. व्यासपीठावर



मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, केंद्र समन्वयक गौरीशंकर कोळी, केंद्र प्रमुख सुरेश शटगार उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, महात्मा गांधीजींनी 'माझ्या सत्याचे प्रयोग' या आत्मचरित्रात स्वतःच्या जीवनातील प्रसंगाचे चित्रण केले आहे. आयुष्य जगत असताना मानवाने स्वीकारावयाची तत्त्वे सांगितली आहेत, त्यातून बोध घेतला पाहिजे. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. आर. लोखंडे यांनी केले. सूत्रसंचलन डॉ. शितल झिंगाडे यांनी केले तर आभार डॉ. बाळासाहेब पाटील यांनी मानले. कार्यक्रमास सुरेश रुग्गे, प्रा. मनीषा शिंदे, प्रा. प्राची गणाचारी, मधुबाला लोणारी, विद्या बिराजदार व विद्याश्री वाले उपस्थित होते.

# वाशिंबे रेल्वे भुयारी मार्गाच्या कामाला सुरुवात

**अनेक वर्षांपासूनचा प्रश्न सुटल्यामुळे ग्रामस्थांमधून समाधान**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ३१ जानेवारी-**

अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर वाशिंबे येथील पाण्याची टाकी परिसरात रेल्वेखालून पादचारी भूयारी मार्ग करण्याच्या कामास सुरुवात झाली.

रेल्वे लाईनमुळे गावाचे दोन भाग झाले होते. राजुरी रस्ता, जुना पारेवाडी रस्ता व लगतच्या शिवारास गावात येण्यासाठी पर्यायी मार्ग नसल्यामुळे नागरीक, विद्यार्थी, अबालवृद्धांना ओढ्यातून तसेच रेल्वे रुळ ओलांडून जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत होता. त्यामुळे कि. मी. क्र. ३२२ या ठिकाणी भुयारी मार्ग व्हावा अशी मागणी होती. रेल्वे प्रशासनाने दखल घेत पादचारी भुयारी मार्गास मंजुरी देऊन जुलै महिन्यात निविदा प्रसिद्ध केली होती. सद्या सुरु असलेला भुयारी मार्गामध्ये दोन्ही बाजूंना जोडणारा सिमेंट काँक्रीट रस्ता, पावसाच्या पाण्याचा निचरा व्हावा यासाठी ड्रेनेज तसेच तट भिंती सिमेंट काँक्रेटमध्ये बांधण्यात येणार आहेत. या भूयारी मार्गाच्या माध्यमातून रेल्वे लाईनच्या वरील भाग गावाशी जोडला जाणार आहे. कामास सुरुवात झाल्यामुळे ओढ्यातून व पाणंद रस्त्यावरुन चाललेला प्रवास थांबणार आहे. अनेक वर्षांपासून रखडलेला प्रश्न सुटल्यामुळे ग्रामस्थांनी सुटकेचा निश्वास सोडला.



# मानसी दामले यांचे कार्य उल्लेखनीय

**प्रथमेश इंगळे : वटवृक्ष देवस्थानतर्फे गौरव**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ जानेवारी-**

सेवासदन हायस्कूलच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिक मानसी दामले यांचे कार्य कौतुकस्पद आहे. त्यांच्या आदरातिथ्याने आम्ही अक्कलकोटवासीय भारावलो. आदर्श मुख्याध्यापिकाबरोबर त्या क्रीडा पत्रकार म्हणून त्यांची पत्रकारिता अंत्यत उल्लेखनिय, अजरामर आहे, असे गौरवोद्गार वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांचे चिरंजीव प्रथमेश इंगळे यांनी काढले.

पाकणी येथील कन्हैयालाल पिकनिक पॉईंट येथे यंदाच्या हुरडा महोत्सव निमित्त आयोजित सभारंभात वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थानच्या वतीने प्रथमेश



इंगळे यांच्या हस्ते सेवासदनच्या माजी मुख्याध्यापिका तथा क्रीडा पत्रकार मानसी दामले यांचा गौरव करण्यात आला, यावेळी त्या बोलत होत्या.

याप्रसंगी कन्हैयालाल पिकनिक पॉईंटचे मालक कपिल बजाज, मधुर बजाज, डॉ. स्वप्नाली बजाज, प्रितेश जाजू, शशिकांत तुळजापूरकर, भाग्यश्री तुळजापूरकर, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रा. शिवशरण अचलेर, श्रीशैल गवंडी, संजय पवार, खाजप्पा झंपले, अमर पाटील, सागर गोंडाळ, आदींसह स्विमिंग ग्रुपचे सदस्य संतोष पराणे, अरविंद पाटील, श्रीकांत झिपरे, सुनील पवार, बाबा सुरवसे, शेखर आडवीतोटे, शिवशंकर बिंदगे, बाळासाहेब एकबोटे, अंकूश केत, काशिनाथ सोलनकर, रवी कदम, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, तुषार मोरे, विश्वनाथ देवरमनी, अशोक कलशेट्टी, मनोज जगताप, कुमार हत्तुरे, संजय बिराजदार, शिवगुंडे मनोज इंगुले, चित्तरंजन अगरथडे, रमेश शिंदे, बाबा शिंदे, पत्रकार राजेश जगताप, स्वामीराव गायकवाड, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद अक्कलकोटचे तालुकाध्यक्ष नंदकुमार जगदाळे, रमेश भंडारी, काका सुतार उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. शिवशरण अचलेर यांनी केले तर आभार कपिल बजाज, मधूर बजाज यांनी मानले.

# मैंदर्गी रस्त्यावर अपघात; युवक ठार, दोन महिला जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ जानेवारी-**

अक्कलकोट-मैंदर्गी रस्त्यावर मोटरसायकलला क्रुझर वाहनाची धडक बसल्याने एक युवक ठार व दोन महिला जखमी झाल्याची घटना गुरुवारी सकाळी दहा ते सव्वादहाच्या दरम्यान घडली.



याबाबतची अधिक माहिती अशी की, मोटारसायकल (क्र. एम. एच. १३/ इ. एन. ४४९६) या मोटारसायकल वाहनास क्रुझर वाहनाची जोरदार धडक बसल्याने मोटारसायकलस्वार अजय वाघमोडे (वय २२) हा युवक उपचाराकरिता सोलापूर रुग्णालयाकडे नेत असताना उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या अपघातामध्ये क्रुझर वाहनातील श्रीदेवी पेवे (वय ५६), चंद्रम्मा विम्मपल्ली (वय ६०) या जखमी झाल्या आहेत. अपघातातील जखमींना अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय येथे प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी सोलापूरकडे पाठविण्यात आले. या अपघातातील जखमींना रुग्णालयाकडे नेण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पाठवले गटाचे तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे व मित्र परिवाराने मदत केली.

# आई-वडिलांची सेवा हीच सर्वश्रेष्ठ सेवा : गणेश महाराज भगत

## चंद्रभागा गोविंद धालपे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त कीर्तनसेवा

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. ३१ जानेवारी-**

आई-वडिलांची सेवा हीच सर्वश्रेष्ठ सेवा आहे, असे प्रतिपादन गणेश महाराज भगत यांनी केले. नातेपुते येथील भाजपाचे ज्येष्ठ नेते हनुमंतराव धालपे यांच्या मातोश्री चंद्रभागा गोविंद धालपे यांच्या प्रथम पुण्यस्मरणाच्या निमित्ताने हभप गणेश महाराज भगत यांची कीर्तनसेवा संपन्न झाली, यावेळी ते बोलत होते.

**ऐसी जोडी करा राम कंठीं धरा ।**
**जेणें चुके फेरा गर्भवास ।।**

हा अभंग त्यांनी कीर्तन सेवेसाठी घेतला होता. नरदेहचे महत्व भागवत कथेतील दृष्टांत, जीवाच्या पाठीमागे लागलेले सुख-दुःख आणि जीवनामध्ये नामस्मरणाचे महत्त्व किती आहे. नामस्मरण व सेवाभाव ठेवल्याने काळावर मात करता येते. पुण्यस्मरणाचे महत्त्व अशा विविध अंगाने कीर्तनामध्ये निरूपण करून महाराजांनी पुढे आई-वडिलांचे किती उपकार आपल्यावर आहेत हे सांगून सध्या काळाची गरज आहे ती म्हणजे आई-वडिलांचे सेवा करण्याची. आई-वडिलांची सेवा ही जगात सर्वश्रेष्ठ सेवा आहे. चंद्रभागा धालपे यांच्या आई-वडिलांच्या घरीच धार्मिक वातावरण होते. त्यामुळे लहानपणापासूनच देवपूजा, देवदर्शन नित्यनेमाने त्या करत पुढे लग्न झाले. सासरचे सर्व वातावरणही धर्मपरायण होते. पंढरीची वारी त्यांच्या घराण्यामध्ये होती. त्यामुळे मोठी धार्मिक अनुकूलता लाभली. आनंदात संसार सुरू झाला. त्यानंतर त्यांना पुत्ररत्ने प्राप्त झाली. तीही हनुमान जयंती दिवशी म्हणून मुलांचे नाव हनुमंत असे ठेवले. परंतु पदरी लेकरू दीड वर्षाचे असताना त्यांच्या पतीचे निधन झाले. त्यावेळी त्यांची झालेली परीस्थिती पाहून त्यांच्या बंधूंनी त्यांना माहेरी आणले. दादाच्यां मोठ्या आधाराने स्वाभिमानी बाण्याने दिवस काढले, असे त्यांनी सांगितले.




**पुष्पवृष्टी अन् महाप्रसाद वाटप**

माळशिरस तालुक्यामध्ये धालपे परिवाराचे सर्व क्षेत्रांमध्ये संबंध असल्याने या कार्यक्रमास पाहुणेमंडळी, नातेवाईक मित्र परिवारसह सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रातील मोठा जनसमुदाय उपस्थित होता. यावेळी दुपारी १२ वाजता पुष्पवृष्टी करण्यात आली. यानंतर आरती, पसायदानानंतर महाप्रसाद होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

CMYK

आपला
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पांढरेवाडी केंद्राची शिक्षण परिषद उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.३१जानेवारी-**
पांढरेवाडी केंद्राची शिक्षण परिषद जि. प. प्रा. शाळा वाफळकरवस्ती केंद्र पांढरेवाडी येथे निसर्गाच्या सानिध्यात उत्साहात संपन्न झाली. विद्यार्थीनींनी स्वागतगीत गायले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमांचे पूजन केंद्रप्रमुख स्वाती डोंगरे, अध्यक्ष रामदास माळी, मुख्याध्यापक किरण ढोबळे, ज्ञानेश्वर दुधाणे यांच्या हस्ते झाले. सुनिल क्षीरसागर, संदीप आहेर यांनी हर घर संविधान, सूर्यकांत बनकर यांनी पॅट चाचणींचे महत्त्व तर अतुल भोपळे यांनी मार्गदर्शन केले. समारोपप्रसंगी केंद्र प्रमुख स्वाती डोंगरे यांनी प्रशासकीय सूचना दिल्या. सूत्रसंचलन ज्ञानेश्वर दुधाणे यांनी तर आभार मुख्याध्यापक किरण ढोबळे यांनी मानले.



### संक्षिप्त वृत्त...



## उमरडच्या गणेश मंडळाला पुरस्कार प्रदान

**करमाळा, दि. ३१ जानेवारी-**
करमाळा पोलीस स्टेशनच्या वतीने दिला जाणारा आदर्श गणेश मंडळ पुरस्कार उमरडच्या जय भवानी तरुण मंडळाला प्रदान करण्यात आला. या गणेश मंडळाने सामाजिक व सांस्कृतिक कार्याक्रम घेऊन सर्व समाजात शांतता व एकोप्याचे वातावरण निर्माण केले .या बद्दल जय भवानी तरुण मंडळाचे करमाळा पोलीस स्टेशनच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. करमाळा पोलीस स्टेशनच्या वतीने घेण्यात आलेल्या गणेशोत्सव २०२४ स्पर्धेमध्ये या मंडळाने सर्व निकष पूर्ण केले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून त्यांना मेडल व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यापुढे देखील आपण सामाजिक सलोखा व पारंपारिक वाद्याचे संवर्धन करून पुढील काळामध्ये निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण सोहळा व्यसनमुक्त अभियान या उपक्रमाचे आपल्या मंडळाने सहभागी होऊन समाजात एक आदर्श निर्माण कराल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यावेळी करमाळ्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील, पोलीस निरीक्षक विनोद घुगे, मंडळाचे अध्यक्ष गोवर्धन कोठावळे, बापू बदे, आण्णा पठाडे, मनोज पठाडे उपस्थित होते.




## मोडनिंबमध्ये ३० जणांचे रक्तदान

**मोडनिंब, दि. ३१ जानेवारी-**
मोडनिंब (ता.माढा) प्रजासत्ताक दिनानिमित्त महामार्ग पोलिस मदत केंद्राच्या वतीने घेतलेल्या शिबिरात ३० जणांनी रक्तदान केले. यावेळी सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रकाश वाघमारे, सहाय्यक फौजदार तोरणवाले, पोलिस हवालदार केशव सुर्वे, गणेश हांचे, मोडनिंब प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रथमेश पवार, कैलास तोडकरी, विजयसिंह गिड्डे, चांगदेव वरवडे, सोमनाथ माळी, दत्तात्रय सुर्वे, अथर्व इलेक्ट्रिकलचे रोहित गडेकर, सागर सुर्वे, यश पाटणे, गणेश महामुनी, पाटील काँट्रॉक्टर्सचे राज पाटील, प्रेम गांधी, रोहित शर्मा फॅन्स क्लबचे शुभम वाघमारे, विक्रांत वाघमारे, मयुर नामदे, प्रथमेश शिंदे, हर्षराज पाटील, अमोल जाधव, संकेत सुर्वे, विशाल पाटील, राहुल घाडगे, सोमनाथ गिड्डे मेजर उपस्थित होते.



## आरोग्य विस्तार अधिकारी मिलिंद सावंत यांचा सन्मान

**सांगोला, दि. ३१ जानेवारी-**
सांगोला विधानसभा निवडणूक कामी मीडिया नोडल अधिकारी म्हणून सांगोला पंचायत समितीचे आरोग्य विस्तार अधिकारी मिलिंद सावंत यांनी अविरत परिश्रम घेत उत्कृष्ट काम केल्याबद्दल सांगोला विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी बी. आर. माळी यांनी अभिनंदन करून प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांचे हस्ते प्रशस्तिपत्रक देण्यात आले. यावेळी तहसीलदार संतोष कणसे, गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, नायब तहसीलदार सोमनाथ साळुंखे, मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी, कृषी अधिकारी दीपाली जाधव उपस्थित होते.



## अमृतसर घटनेतील दोषींवर कारवाई करण्याची मागणी

**अक्कलकोट, दि. ३१ जानेवारी-**
पंजाब राज्यातील अमृतसरच्या मुख्य चौकात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची विटंबनाप्रकरणी दोषींवर कारवाई करण्याचे मागणीचे निवेदन तहसीलदार विनायक मगर यांना देण्यात आले. यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष विकी चौधरी, एकतावादी रोजगार आघाडी तथा सोलापूर जिल्हाध्यक्ष दिनेश रसनभैरे, तम्मा चौधरी, शांतू घोडके, अमर मधुरकर यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## बेंगळुरुच्या भाविकांकडून पोषाख

### विठ्ठल-रूक्मिणीमातेचा विवाह सोहळा; रविवारी दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३१ जानेवारी-**
श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेचा विवाह सोहळा माघ शुध्द १ ते ५ या कालावधीत संपन्न होत असून, रविवारी २ फेब्रुवारी रोजी वसंत पंचमीनिमित्त साजरा होणाऱ्या विवाह सोहळ्यासाठी पोशाख प्राप्त झाला आहे. हा विवाह सोहळा परंपरेनुसार पार पाडण्यात येणार असून, त्याची जय्यत तयारी मंदिर समितीने केल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. यासाठी श्रींसाठी बेंगळुरु येथील सविता चौधरी व इतर दोन भाविकांकडून पोषाख प्राप्त झाले आहेत.

श्री रूक्मिणी स्वयंवर कथा ३० जानेवारी ते १ फेब्रुवारीदरम्यान दुपारी ४ ते ६ या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. परंपरेनुसार वसंत पंचमी दिवशी स.१० ते या वेळेत श्री विठ्ठल-रूक्मिणीमातेचा विवाह सोहळा होणार आहे. कथेचे निरूपण श्री क्षेत्र पंढरपूर येथील प्रख्यात श्रीमद् भागवताचार्य साध्वी अनुराधादीदी राजेंद्र शेटे यांचे सुमधूर व रसाळ वाणीने सुरू आहे.





#### दुपारी निघणार शोभायात्रा

दुपारी ४ वाजता पोशाखानंतर श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी मातेची पाद्यपूजा करण्यात येते. त्यानंतर श्री विठ्ठल व रूक्मिणी मातेच्या प्रतिकात्मक मूर्तीची प्रदक्षिणा मार्गाने सवाद्य शोभायात्रा काढण्यात येते. व्हीआयपी गेट-श्री संत नामदेव पायरी महाव्दार पोलीस चौकी -कालिका देवी मंदिर-काळा मारुती चौफाळा नाथ चौक तांबडा मारुती मंदिर माहेश्वरी धर्मशाळा-महाव्दार पोलीस चौकी श्री संत नामदेव पायरी पश्चिमद्वार व्हीआयपीगेट या मार्गाने शोभा यात्रा काढण्यात येणार आहे.

वसंत पंचमी दिवशी पहाटे काकडा आरती वेळेस श्री विठ्ठलास सोन्याच्या मुखवटाऐवजी मंदिल पांढरे पागोटे घालण्यात येते. (या दिवसापासून श्री विठ्ठलास पांढरा पोशाख रंगपंचमीपर्यंत सुरू होतो.) पहाटे नित्यपूजेच्या वेळेस देवास गुलाल टाकण्यात येतो. तसेच श्री रूक्मिणी मातेकडे काकडा आरती व नित्यपूजेच्या वेळेस वसंत पंचमीनिमित्त फक्त याच दिवशी सकाळी पांढरा पोशाख करण्यात येतो. (इतर वेळी श्री रूक्मिणी मातेस पांढरा पोशाख परिधान करीत नाहीत) नित्यपूजेच्या वेळेस रूक्मिणी मातेस गुलाल टाकण्यात येतो.

सकाळी ११ वा. श्री विठ्ठलाची तुळशी पूजा करण्यात येते. त्यावेळेस श्रीस पांढरा पोशाख करण्यात येतो. तसेच श्री विठ्ठलास गुलाल टाकून श्रीस विवाहस्थळी येण्याचे निमंत्रण दिले जाते. तसेच श्री रूक्मिणी मातेस पांढरा पोशाख व अलंकार परिधान केले जातात. त्यानंतर श्री रूक्मिणी मातेची पाद्यपूजा करून नैवेद्य, आरती करण्यात येते. श्री रूक्मिणी मातेस गुलाल टाकला जातो व रूक्मिणी मातेस विवाहस्थळी येण्याचे निमंत्रण दिले जाते. दु.१२ वाजता श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी मातेची प्रतिकात्मक मूर्ती श्री विठ्ठल सभामंडपामध्ये आणून विधिवत मंत्र उच्चारासहित विवाह सोहळा संपन्न होतो.

#### एलईडी स्क्रीनची सोय

सदरचा सोहळा जास्तीत जास्त भाविकांना पाहता यावा यासाठी चौफाळा व महाद्वार पोलीस चौकी येथे एलईडी स्क्रीन बसविण्यात येणार आहेत. तसेच त्याच ठिकाणी अक्षता वाटप होणार आहे. त्यादिवशी दुपारी १२ ते सायं. ७ पर्यंत अन्नछत्र सुरू ठेवण्यात येणार असल्याचेही मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री श्रोत्री यांनी सांगितले.

## लॉयर्स हॉलसाठी पावणेदोन कोटी निधी मंजूर

### पंढरपूर, मंगळवेढा तालुका न्यायालयाच्या आवारात होणार सुविधा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३१ जानेवारी-**
पंढरपूर तालुका न्यायालयाच्या आवारात लॉयर्स हॉल उभारण्यासाठी १३४.७५ लाख रुपये निधीची याचबरोबर मंगळवेढा तालुका न्यायालयाच्या आवारात लॉयर्स हॉल बांधण्यासाठी १३५.९९ लाख रुपये निधीच्या तरतुदीस शासन निर्णयाद्वारे शासकीय मान्यता देण्यात आली आहे.



पंढरपूर आणि मंगळवेढा येथील वकील मंडळींनी अधिवक्ता संघाच्या वतीने लॉयर्स हॉल उभारण्यात यावे अशी मागणी पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्याकडे केली होती. मतदारसंघातील पंढरपूर, मंगळवेढा या दोन्हीही तालुक्यात लॉयर्स हॉल उभारण्यात यावे.यासाठी आमदार समाधान आवताडे यांनी शासन दरबारी सतत पाठपुरावा करून निधी मंजूर केला आहे.

पंढरपूर आणि मंगळवेढा तालुका न्यायालयाच्या आवारात लायर्स हॉल बांधण्याचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी शासनास सादर केला होता. सदर प्रस्ताव प्रशासकीय मान्यता मिळवण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्यातून आमदार समाधान आवताडे यांनी शासन दरबारी सतत पाठपुरावा करून पंढरपुर आणि मंगळवेढा येथे तालुका न्यायालयाच्या आवारात लॉयर्स हॉल बांधण्यासाठी निधीची तरतूद करून घेतल्याने याचा फायदा वकील मंडळी आणि न्यायासाठी दाद मागणाऱ्या सामान्य नागरिकांना होणार असल्याने वकील मंडळी आणि नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

#### वकिलांसह नागरिकांमधून समाधान

मतदारसंघातील पंढरपूर आणि मंगळवेढा तालुका आवारात लॉयर्स हॉल बांधण्यासाठी आमदार समाधान आवताडे यांनी सतत शासन दरबारी सतत पाठपुरावा करून दोन्ही तालुक्यातील लॉयर्स हॉल बांधण्यासाठी २ कोटी ७० लाख निधी मिळवल्याने वकील मंडळी आणि सामान्य नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

## फेब्रुवारीत गाळपास येणाऱ्या उसाला ३,१०० रुपये दर

### चांदापुरीतील ओंकार साखर कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ३१ जानेवारी-**
माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील ओंकार साखर कारखाना फेब्रुवारी महिन्यात गाळपास येणाऱ्या उसास ३,१०० रुपये एवढा दर देणार असल्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांनी सांगितले.



ओंकार साखर कारखान्याने गाळपास येणाऱ्या उसास वेळेवर बिल देण्याची परंपरा कायम ठेवली आहे. यामुळे ऊस उत्पादक शेतकरी व वाहतूकदार यांच्या मध्ये समाधानाचे व आनंदाचे वातावरण आहे. यंदाच्या २०२४-२५ या गळीत हंगामात गाळपास येणाऱ्या उसास ३००० रुपये एवढा दर जाहीर केला असून पहिला हप्ता २८०० तर बैलपोळ्याला १०० व दिपवाळीला १०० असा दर निश्चित केला आहे. तर याच गळीत हंगामात गाळपास येणाऱ्या उसास प्रतिटन १०० एवढा जादा दर देणार असल्याचे सांगितले यामुळे फेब्रुवारी महिन्यात गाळपास येणाऱ्या उसास ३१०० रुपये एवढा विक्रमी दर देणार आहे. यावेळी संचालिका रेखाताई बोत्रे-पाटील व प्रशांत बोत्रे-पाटील यांनी कायमच शेतकरी व वाहतूकदार व कामगारांचे हित जोपासण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केल्याचे सांगितले.

## वेतनवाढ कराराने कर्मचाऱ्यांना दिलासा

### ह्युंदाई कंपनी अन् युनियनमध्ये करार पूर्ण; रजेसह विविध सलवतींच्या तरतुदी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जानेवारी-**
चाकण एमआयडीसी येथील ह्युंदाई कंपनी आणि कामगारांमध्ये वेतनवाढ करार झाला आहे. यासाठी ह्युंदाई एप्लॉईज युनियनने पुढाकार घेतला होता, असे युनियनचे अध्यक्ष सायबण्णा गोविंदे यांनी सांगितले.

मागील करार ३० जून २०२४ रोजी संपुष्टात आला. त्यानंतर १ जुलै २०२४ पासून नवीन करार करण्याबाबत अध्यक्ष सायबण्णा गोविंदे यांच्यासह पदाधिकारी व्यवस्थापनासोबत चर्चा करण्याबरोबरच पाठपुरावा करत होते. यामध्ये ह्युंदाई कन्स्ट्रक्शन इक्विपमेंट कंपनीची व्यावसायिक स्थिती, बाजारपेठेमधील स्थान अधिक मजबूत करण्यासाठी व्यवस्थापन व युनियन प्रतिनिधी यांच्यामध्ये हा करार झाला आहे. सोमवारी २७ जानेवारी रोजी सर्वसाधारण सभा घेऊन वेतनवाढ कराराला अंतिम मंजुरी देण्यात आली. यामध्ये २८,००० रुपये (चार वर्षाकरिता), पहिल्या वर्षाकरिता १०,५००, दुसऱ्या वर्षाकरिता ६,०००, तिसऱ्या वर्षाकरिता ६,०००, चौथ्या वर्षाकरिता ५,५००, मंथली इन्सेंटिव्ह ४,५०० रुपये ते १७,००० रुपयांर्यंत, वार्षिक इन्सेंटिव्ह किमान २९,५०० रुपये ते ५२,५०० रुपयांपर्यंतची तरतूद करारामध्ये करण्यात आली आहे. सर्विस अवॉर्ड-१० वर्ष सेवेसाठी १०,०००, १५ वर्षे सेवेसाठी १५,०००, रजा साठवणूक मर्यादा १७५ दिवसांपर्यंत साठवण्याची तरतूद करण्यात आली आहे. रजेमध्य वाढ करण्याबरोबरच इतर बाबींचीही तरतूद करण्यात आली आहे. यावेळी मॅनेंजिक डायरेक्टर एस. शिम, फॅक्टरी मॅनेजर बी. एच. चोई, एचआर हेड मनीष फणसळकर, प्रकाश धोंडगे, संग्राम कदमबांडे, गौरव वशिष्ठ, आशिष आमले, अभिजीत काळे, महादेव कोरे, रवींद्र भंडारी यांशच्यासह युनियनचे अध्यक्ष सायबण्णा गोविंदे, जनरल सेक्रेटरी रोहित पवार, अश्विनी अश्विन गोरे, उपाध्यक्ष विजय गायकवाड, गणेश मिसाळ, जॉईंट सेक्रेटरी राम केमसे, सुरेश वराडे यांनी या कराराव स्वाक्षरी केल्या. मारुतीराव जगदाळे यांनी आभार मानले.




## पिलीवमध्ये सीसीटीव्ही बसविण्यास सापडेना मुहूर्त

### चोरीचे सत्र काही केल्या थांबेना; पुढाकार घेण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ३१ जानेवारी-**
माळशिरस तालुक्यातील पिलीव हे पंढरपूर-सातारा महामार्गावरील मोठी बाजारपेठ असणारे गाव आहे. आसपासच्या दहा- बारा खेड्यांतील व्यवहार या ठिकाणाहूनच चालतात. या गावात सध्या चोरीचे सत्र सुरु असून, सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी प्रशासनाला मुहूर्त सापडत नसल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

पंढरपूर, तुळजापूर, गोंदवले व इतर तीर्थक्षेत्राकडे भाविक भक्त मोठ्या संख्येने या गावातूनच ये-जा करतात. राजेवाडी येथील श्रीश्री सद्‌गुरु साखर कारखाना व चांदापुरी येथील ओंकार साखर कारखान्याची वाहने व कामगारांची सतत या ठिकाणाहून वर्दळ असते. मात्र या ठिकाणी दरवर्षी मुख्य बाजारपेठ असो किंवा बसस्थानक परिसरात चोऱ्या होतात. यापैकी बऱ्याच चोऱ्यांचा छडा लागलेला नाही. बसस्थानकापासून ते वेशीपर्यंतचे अंतर या दरम्यान बाजारपेठांत वेगवेगळ्या प्रकारची किराणा माल, कापड दुकाने, ज्वेलर्स व इतर मोठमोठी दुकाने आहेत. तशीच परिस्थिती बसस्थानक परिसरातही आहे. सध्या बसस्थानक परिसरात चोऱ्यांचे सत्र सुरु आहे. दरवर्षी या भागात चोऱ्या होत आहेत. या ठिकाणी अहिल्यादेवी चौक, आंधळकर चौक, महाराणा प्रताप चौक, बायपास रोड व जनावरांचा दवाखाना अशा चार ठिकाणी जर सीसीटीव्ही कॅमेरे बसविले तर चोऱ्यांचे प्रमाण निश्चित कमी होणार आहे. पण दुर्दैवाने या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची चर्चा जवळपास दहा वर्षापासून सुरू आहे. पण याबाबत ना ग्रामपंचायत प्रशासनाला जाग आली ना इतर समाजसेवी संस्था किंवा इतर कोणीही याबाबत पुढाकार घेतला नाही. ही गावाच्या दृष्टीने खेदजनक बाब आहे. परवाच या ठिकाणी बसस्थानकावरील मोटार दुरुस्ती दुकाने फोडले असून सध्या १२ फेब्रुवारीपासून पिलीव येथील महालक्ष्मी देवीची मोठी यात्रा सुरू होत आहे. या अगोदरच चोरीचे सत्र सुरू झाल्यामुळे व्यापारी व नागरिक यांच्यामध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. सध्या पिलीव ग्रामपंचायतीवर प्रशासकीय राजवट आहे, यामुळे याकडे लक्ष तरी कोण देणार अशी परिस्थिती आहे. या ठिकाणी पोलीस प्रशासनाने जर याबाबत ठोस भूमिका घेतली तर पिलीव येथील व्यापारी वर्ग व इतर समाजसेवी संस्था संघटना व विविध पक्षाचे पदाधिकारी लोकसहभागातून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास राजी होतील. व्यापाऱ्यांची याबाबत मदत करण्याची तयारी आहे. पण यामध्ये निश्चित पुढे येऊन याबाबत ठोस भूमिका हाती घ्यावी अशी सर्वसामान्य जनतेची व व्यापाऱ्यांची आहे.

#### लोकप्रतिनिधींचेही दुर्लक्ष

गेल्या दहा वर्षापासून रखडलेला सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा प्रश्न मार्गी लागल्याशिवाय पिलीव येथील चोरीचे सत्र थांबणार नाही हे निश्चित आहे. का अजून हे चोरीचे सत्र किती दिवस सुरु राहणार हा खरा. जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न कोणीही लोकप्रतिनिधी लक्ष देईना, यामुळे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. आता सीसीटीव्ही कॅमेरे कधी लागणार, याकडे लक्ष लागले आहे.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मुद्रा सहकारी पतसंस्थेतर्फे आनंदी शिंदे हिचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**



क्रीडा व युवक सेवा संचलनालय, महाराष्ट्र राज्य, पूणे नाशिक विभाग अंतर्गत ग्रपलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, यांच्या संयुक्त वद्यमाने आयोजित, नाशिक येथे घेण्यात झालेल्या राज्यस्तरीय शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धा २०२४-२०२५ मध्ये धाराशिव येथील आनंदी उषा अविनाश शिंदे हिने सुवर्णपकाची कमाई केल्यामुळे तिच्या यशाचे कौतुक करण्यासाठी मुद्रा सहकारी पतसंस्था धाराशिव चेरमल व संचालक यांचे तर्फे आनंदी शिंदे व तिच्या आईवडीलांना बक्षीस देवून सत्कार करण्यात आला.

मुद्रा परिवारातील उपाध्यक्ष सोमलिंग खरे तसेच संचालक दयानंद चव्हाण, बलराम माने, विक्रया चव्हाण, बालाजी पवार, विनोद शेरकर, तेजश्री जगदाळे, कंबा काळे, राजपाल कांबळे यांनीही आपले मनोगत व्यक्त करून आनंदीस पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# सोयाबीन खरेदीसाठी ६ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

### राज्य आणि केंद्र सरकारकडे केलेल्या पाठपुराव्याला यश : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**

आत्तापर्यंत नोंदणी केलेल्या एकूण शेतकरी बांधवांपैकी केवळ २५ टक्के शेतकऱ्यांच्या सोयाबीन खरेदीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. राहिलेल्या ७५ टक्के नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची खरेदी ३१ जानेवारीपर्यंत करणे निव्वळ अशक्य असल्याने सोयाबीन खरेदीला पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात यावी यासाठी आपण राज्य सरकारकडे आग्रही पाठपुरावा केला. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि पणनमंत्री ना. जयकुमार रावल यांच्या सकारात्मक पाठपुराव्यामुळे आता ६ फेब्रुवारीपर्यंत सोयाबीन खरेदीला मुदतवाढ मिळाली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

सुरुवातीला आर्द्रता आणि त्यानंतर बारदाण्याच्या तुटवड्यामुळे अनेक शेतकरी बांधवांना हमीभाव खरेदी केंद्रांवर सोयाबीन घालता आले नाही. नोंदणीकृत शेतकऱ्यांची एकूण संख्या आणि बाजारात भाव मिळत नसल्याने हमीभाव खरेदी केंद्राकडे वाढलेला शेतकऱ्यांचा कल पाहता, अधिकाधिक सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव योजनेचा लाभ मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी सोयाबीन खरेदीला पुन्हा एकदा मुदतवाढ मिळावी यासाठी आपण व्यक्तिशः राज्य आणि केंद्र सरकारकडे आग्रही पाठपुरावा सुरू ठेवला होता. त्याला आज यश मिळाले आहे.



धाराशिव जिल्हा आणि परिसरात खरीप हंगामातील नगदी पीक म्हणून सोयाबीनला बहुतांश शेतकऱ्यांची पसंती आहे. त्यामुळे यंदाच्या खरिप हंगामात ४ लाख ६२ हजार ८७२ हेक्टरवर सोयाबीनचा पेरा करण्यात आला होता. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या सोयाबीनला रास्त हमीभाव मिळावा, यासाठी जिल्ह्यात २१ हमीभाव खरेदी केंद्र सुरु करण्यात आले आहेत. सुरुवातीला हवामानातील बदलामुळे अपेक्षित आर्द्रता नसल्याने शेतकरी बांधवांना हमीभाव केंद्रावर सोयाबीन घालण्यासाठी विलंब झाला. मागील आठवडाभरापासून बहुतांश खरेदी केंद्रांना बारदाण्याची चणचण भासत होती. परिणामी काही केंद्रांवरील खरेदी प्रक्रिया यामुळे ठप्प पडली होती. पाठपुराव्यानंतर बारदाना उपलब्ध झाला आणि खरेदी पूर्ववत सुरू झाली. सोयाबीनला सध्या खुल्या बाजारपेठेत अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी बांधव यंदा मोठ्या संख्येने शासकीय खरेदीकडे वळले आहेत. जिल्ह्यात ३५ हजार ४०३ शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रांकडे नोंदणी केलेली आहे. त्यापैकी १८ हजार २०९ शेतकऱ्यांना खरेदी केंद्राकडून मेसेज पाठवण्यात आले आहेत. आणि त्यातील ७ हजार ६३९ शेतकऱ्यांच्या १ लाख ९७ हजार १९४ क्विंटल सोयाबीन खरेदीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. नोंदणी केलेल्या संख्येच्या तुलनेत खरेदी झालेली संख्या केवळ २१ टक्क्यांच्या घरात आहे. त्यामुळे उर्वरित कालावधीत राहिलेल्या नोंदणीकृत शेतकरी बांधवांच्या सोयाबीन ३१ जानेवारीपर्यंत सोयाबीन खरेदी प्रक्रिया निव्वळ अशक्य आहे. त्यामुळे खरेदीला पुन्हा एकदा मुदतवाढ मिळावी याकरिता आपण राज्य आणि केंद्र सरकारकडे सातत्याने आग्रही पाठपुरावा केला. त्यामुळे सोयाबीन खरेदीला आता ६ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ मिळाल्यामुळे जिल्ह्यातील नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असल्याचे असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### पूजा नेटके हिचा सत्कार

**परंडा, दि.३१ जानेवारी -**

भोंजा ता. परंडा येथील पूजा भाऊसाहेब नेटके हिची एमपीएससी च्या माध्यमातून अन्न सुरक्षा अधिकारी म्हणून नेमणूक झाली आहे. त्याबद्दल तिचा व आई आशा, वडील भाऊसाहेब नेटके यांचा सत्कार धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस (एस.पी) चे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी तिच्या घरी जाऊन केला. ग्रामीण भागातून महाराष्ट्र लोकसेवा आयोग सारख्या परीक्षेमध्ये उतीर्ण झाल्यामुळे तिचे व आई-वडिलांचे डॉ. पाटील यांनी कौतुक केले. यावेळी संत मिरा पब्लिक स्कूलचे प्राचार्य संतोष भांडवलकर, कृषी तंत्र विद्यालयाचे प्राचार्य अशोक राठोड, गणेश कोकाटे, बालाजी गोरे, गणेश नेटके, लहू मोरे, रामदास कोकाटे, प्रदीप पवार इत्यादी उपस्थित होते.



### सेवानिवृत्तीनिमित्त शिंगाडे यांचा सत्कार

**जळकोट, दि.३१ जानेवारी -**


तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळेचे मुख्याध्यापक परमेश्वर शिंगाडे हे ३५ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर जिल्हा परिषदेच्या शिक्षण खात्यातून सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवापूर्ती निमित्त जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा व शाळा व्यवस्थापन समितीच्यावतीने सत्कार करण्यात आला. परमेश्वर शिंगाडे हे गेल्या ३५ वर्षाच्या सेवेत शिक्षण क्षेत्रात सहशिक्षक म्हणून पहिल्यांदा जिल्हा परिषदमध्ये सेवा सुरू केली. या कार्यक्रमास कृउबा समिती संचालक, अशोक पाटील, सरपंच गजेंद्र कदम, तंटामुक्ती अध्यक्ष यशवंत कदम, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष पिंटू चूंगे, बबन मोरे, सोसायटी चेअरमन विकास चूंगे, शिक्षक नेते डी.डी. कदम, मेघराज किलजे, प्रशांत मिटकर, शिक्षक सोसायटी संचालक अशोक राठोड, माशाळकर, विविध शाळेचे मुख्याध्यापक, सहशिक्षक, जळकोट कन्या शाळेचे सर्व शिक्षक, विद्यार्थिनी उपस्थित होते.



### हळदी-कुंकू कार्यक्रमास महिलांचा प्रतिसाद

**तेर, दि.३१ जानेवारी -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे संत गोरोबा काका संत्संग सेवा समिती तेर यांच्या वतीने हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोठ्या संख्येने महीला उपस्थित होत्या. यावेळी हभप. तृप्ती घारे यांचे प्रवचन झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राधा माळी, कीर्ती चौघुले, सुरेखा चौघुले, संगीता डोलारे, राजश्री कासार, उषा मेंगले, सुरेखा दिक्षित यांनी परिश्रम घेतले.



### जळकोटमध्ये कचरा व्यवस्थापन प्रशिक्षण

**जळकोट, दि.३१ जानेवारी -**

किरण सामाजिक संस्थेच्यावतीने महिलांसाठी हळदी कुंकू कार्यक्रम घेण्यात आला. महिलांना ओला कचरा व सुकलेला कचरा व्यवस्थापन प्रशिक्षण देण्यात आले. किरण सामाजिक संस्थेच्यावतीने पुणे, रूपीनगर येथे हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात कचरा कंपोस्टिंग प्रशिक्षण संगीता जोशी यांनी दिले. कचरा वर्गीकरणप्रमाणे महिलांना माहिती देण्यात आली. किरण संस्थेच्या कार्याविषयी संस्थेच्या अध्यक्ष तेजा हंकारे यांनी महिलांना माहिती दिली होती. भविष्यात विविध सामाजिक उपक्रम संस्था राबवणार आहे. या कार्यक्रमासाठी महिलांसाठी हळदी कुंकू कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमास नयना सोडेकर, सुरेखा जाधव, सुरेखा पाटील, जयश्री हुंबे, ज्योती मुंडे, मुळेताई, योगिता बच्याव, जया कांबळे, सुरेखा हिंगे, किरण हंकारे, ओंकार हंकारे, अनिल हंकारे, सुरज अंगुले, घोरपडे, अतुल सुरवसे, पाठकर, विना थोरात, राजश्री खोमणे आदि उपस्थित होते.

### वार्षिक अंकाचा प्रकाशन समारंभ

**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**

येथील नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (निमा) धाराशिव च्यावतीने निमा दर्पण २०२५ या वार्षिक अंकाच्या प्रथम प्रकाशनाचा अंक नुकताच मान्यवरांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने प्रकाशित करण्यात आला. या प्रकाशन सोहळ्यास निमा धाराशिवच्या मान्यवर सदस्यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये या अंकाचे मुख्य संपादक डॉ. प्रकाश शेलार, तसेच डॉ. पंकज शिंगारे, डॉ.स्वप्निल भोसले, डॉ. किरण कुलकर्णी, डॉ. अस्मिता बुरगुटे, डॉ. किरण गरड, डॉ. किशोर कदम, डॉ. गोविंद पाकले, डॉ. सदानंद पैठणकर, डॉ. विलास बोचरे, डॉ. प्रवीण मोरे, डॉ. प्रमिला शिंगारे हे सर्व मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

## मकारसंक्रांतीनिमित्त संगीत मैफिल

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३१ जानेवारी -**

चिकुंद्रा ता तुळजापुर येथे किरण बेदी महिला ग्रामसंघाच्या वतीने मकर संक्रांत निमित्त महिलांसाठी हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याच कार्यक्रमात संगीत मैफिल हा गाण्यांचा कार्यक्रम घेण्यात आला. संगीत मैफिलच्या कलाकारांनी अतिशय सुंदर गीत म्हणुन उपस्थित महिलांसाठी मंत्रमुग्ध केले.

यावर्षी किरण बेदी ग्रामसंघाच्या वतीने महिलांसाठी हळदी-कुंकवाचा कार्यक्रम घेण्यात आला. याच कार्यक्रमात उमेदच्या सीआरपी केशर जाधवर यांच्या संकल्पनेतुन महिलांसाठी संगीत मैफिल हा कार्यक्रम घेण्यात आला. अणदुर येथील स्वर लता, करा ओके या ग्रुपचा संगीत मैफिलीचा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी किरण बेदी महिला ग्रामसंघाच्या अध्यक्षा मिरा मोटे, केशर जाधवर, शितल गरड, स्वाती लोहार, अर्चना गायकवाड, मिना मोटे, भाग्यश्री मोहिते व रुक्मिण गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

## समोरासमोरील वाहनांच्या धडकेत एकाच कुटुंबातील चार जण गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३१ जानेवारी -**

येथील नळदुर्ग रोड वरील श्रीनाथ लॉन्सच्या समोर दोन कारची समोरासमोर जोराची धडक लागून भीषण अपघात झाला. घाटे कुटुंब तुळजाभवानीचे दर्शन करून अक्कलकोट येथील स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी जात होते.



याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, नळदुर्ग रोडवरून तुळजापूरकडे जाणारी मारुती अल्काझर एम.एच. २५ बी.ऐ. ८८११ आणि तुळजापूर कडून नळदुर्गकडे जाणारी मारुती वॅगनार एम. एच. १२ एन.ईऊ.०२२८ हे दोन वाहन दुपारी साडेचार पाचच्या दरम्यान श्रीनाथ लॉन्स समोर आल्यानंतर समोरासमोर धडक बसली. अपघात एवढा भीषण होता की वॅगनार मध्ये असणारे एकाच कुटुंबातील चौघेजण गंभीरित्या जखमी झाले. वारंजे पुणे येथील चिंतामणी नारायण घाटे (वय ५५), पद्मावती नारायण घाटे (वय ८३), वैशाली चिंतामणी घाटे (वय २०), अपर्णा चिंतामणी घाटे (वय ४९) एकाच कुटुंबातील चौघेजण गंभीरित्या जखमी झाले. यामधील तिघांना पुढील उपचारासाठी धाराशिव येथील जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले आहे.

अपघातामुळे घटनास्थळी वाहतूक कोंडी निर्माण झाली घटनेची माहिती समजताच घटनास्थळी तुळजापूर पोलीस स्टेशनचे अनुप गायकवाड गणेश पतंगे आणि गोवर्धन माने यांनी येऊन परिस्थिती आटोक्यात आणली.

## बँको ब्लू रिबन पुरस्कार : श्री सिद्धिविनायक मल्टीस्टेटचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**

बँको ब्लू रिबन पुरस्कार हा बँकिंग क्षेत्रातील उत्कृष्टता, कार्यक्षमता आणि विश्वासार्हतेचा गौरव म्हणून ओळखला जातो. या प्रतिष्ठित पुरस्काराने यंदाही बँकिंग आणि वित्तीय क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या संस्था व व्यक्तींचा सन्मान केला.



सहकारी संस्थांसाठी लोणावळ्यात दोन दिवसीय 'ॲडव्हान्टेज सहकार परिषद' पार पडली. या परिषदेत सहकार क्षेत्रातील महत्त्वाचे विषय चर्चिले गेले, तसेच विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. राज्यभरातील नामवंत सहकारी संस्थांचे प्रतिनिधी या परिषदेला उपस्थित होते. याच पार्श्वभूमीवर बँको ब्लू रिबन पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. यावर्षी श्री सिद्धिविनायक मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी ला 'सर्वोत्कृष्ट संस्थेचा' पुरस्कार प्रदान करण्यात आला. ग्राहकांना उत्कृष्ट बँकिंग सेवा पुरवण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे, आणि तिच्या या समर्पित कार्याची दखल घेत या पुरस्काराने सन्मान करण्यात आला. हा सन्मान मिळाल्याने संस्थेची जबाबदारी आणखी वाढली असून, भविष्यात अधिक नवनवीन उपक्रम राबवण्यास नवसंजीवनी मिळाली आहे. पुरस्कार वितरण समारंभात माजी सहकार आयुक्त चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार जाधव यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी अरविंद गोरे, रामचंद्र सारडे आणि देविदास कुलकर्णी उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे संस्थापक दत्ता कुलकर्णी यांनी संस्थेच्या ठेवीदार आणि सभासदांनी सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

## तुळजापूरात हळदी-कुंकू समारंभास महिलांचा प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३१ जानेवारी -**

तुळजापूर शहरातील शुक्रवार पेठ भागात असलेल्या पर्ण-कुटी येथे संपदा प्रतिष्ठाणच्या अध्यक्षा तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष श्रीकृष्ण सुर्यवंशी यांच्या सौभाग्यवती मीराताई सुर्यवंशी यांच्या वतीने मकर संक्रांत निमित्त हळदी-कुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

त्यावेळी हळदी कुंकू समारंभास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी मीराश्रीकृष्ण सुर्यवंशी यांच्या वतीने संक्रातीच्या निमित्ताने पर्ण-कुटी शुक्रवार पेठ परिसरात हळदी कुंकू समारंभ आयोजित केला होता. यावेळी परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

यावेळी मीरा सुर्यवंशी यांच्या वतीने पर्ण-कुटी शुक्रवार पेठ परिसरात महिलांना आकर्षक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे चिन्ह असलेले घड्याळ भेट देण्यात आली.

याप्रसंगी रेशमा पवार, एश्वर्या कदम, शुभांगी पवार, सोनाली पवार, जयश्री कदम यांच्यासह संपादा सुर्यवंश, श्रावणी कदम, गाजल काचोळेसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## जीबीएस आजाराबाबत आरोग्य यंत्रणा सतर्क

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**

राज्यात Guillain-Barrµ Syndrome (GBS) या दुर्मिळ आणि परिधीय मज्जासंस्थेवर परिणाम करणाऱ्या ऑटोइम्यून आजाराचे रुग्ण वाढत आहेत. त्यामुळे आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर असून, आरोग्य विभागाने नागरिकांना आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

जीबीएस हा शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीमुळे ट्रिगर होणारा आजार आहे. जीबीएस आजाराबाबत नागरिकांनी घाबरू नये, मात्र आवश्यक ती काळजी घ्यावी. कोणत्याही लक्षणांची जाणीव होताच विलंब न लावता वैद्यकीय मदत घ्यावी, असे आवाहन जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनक घोष आणि आरोग्य अधिकारी डॉ.एस.एल. हरिदास यांनी केले आहे.

## स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रीत करावे : संतोषी बंब

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३१ जानेवारी -**

आजच्या स्पर्धेच्या युगात टिकुन राहण्यासाठी विद्यार्थांनी अभ्यासावर आपले लक्ष केंद्रीत करून सर्वगुण संपन्न होण्याचा प्रयत्न करावा, असे महाराष्ट्र राज्य जैन संघटनेच्या सचिव संतोषी बंब यांनी नळदुर्ग येथील अंजनी प्रशालेत आयोजित केलेल्या पारीतोषिक वितरण समारंभ कार्यक्रमात बोलतांना म्हटले आहे.



राष्ट्रीय युवा दिन सप्ताहनिमित्त सोलापुर येथील भारतीय जैन संघटनेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी भारतीय शिक्षण पद्धती या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांना पारीतोषिक वितरण करण्याचा कार्यक्रम नळदुर्ग येथील दमयंती महिला शिक्षण संस्था संचालित अंजनी प्रशाला येथे दि.३० जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दमयंती महिला शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सुभद्रा मुळे या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणुन सचिव संतोषी बंब, विभागीय अध्यक्षा माया पाटील, सचिव पंकजा पंडीत, सोलापुर जिल्हा सचिव निर्मला मेहता व नळदुर्ग येथील जैन संघटनेच्या कासार या उपस्थित होत्या.शाळेच्या मुख्याध्यापिका व्ही. एन. ठोकळ यांनी भारतीय संविधान रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सर्व प्रमुख पाहुण्यांचा संविधान उद्देशिकाची प्रत तसेच शाल, पुष्पहार व श्रीफळ देऊन सत्कार केला. वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक श्वेता मुदगुडे, द्वितीय क्रमांक परवीन सय्यद, तृतीय क्रमांक नोमान खलिद शेख यांनी मिळविला या विद्यार्थांना सर्व मान्यवारांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. त्याचबरोबर या स्पर्धेतील सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी बी.पी. राठोड यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षिका तसेच शिकेत्तर कर्मचाऱ्यांनी परीश्रम घेतले.

## महाविद्यालयीन तरुणांनी स्वत:मधील कौशल्य विकसित करणे आवश्यक : डॉ. कळलावे

### महाविद्यालयात पदवीप्रदान समारंभ उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**

कौशल्य विकास केल्याशिवाय रोजगाराच्या संधी मिळणार नाहीत याची जाणीव ठेऊन पदवी मिळविलेल्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळे कौशल्य आत्मसात करून स्वतःचा विकास केला पाहिजे असे आवाहन प्रा.डॉ. महेश्वर कळलावे यांनी केले. येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात आयोजित पदवी प्रदान समारंभात ते बोलत होते.



यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य व पत्रकार देविदास पाठक, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. प्रशांत चौधरी, महाविद्यालयातील विभागप्रमुख यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा. कळलावे यांनी २१ व्या शतकामध्ये विद्यार्थ्यांसमोर कोणती आव्हाने आहेत याची माहिती देऊन त्यांना आपण सामोरे कसे गेले पाहिजे याबद्दल माहिती दिली. सिनेट सदस्य देविदास पाठक यांनी नवीन शैक्षणिक धोरणात वेगवेगळे कौशल्य आत्मसात करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार असून विद्यार्थ्यांनी त्याचा फायदा घेऊन स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. प्रशांत चौधरी यांनी या महाविद्यालयात चालविल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या कोर्सेसची माहिती दिली. कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्राचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.डॉ. विनोदकुमार वायचळ यांनी केले. कार्यक्रमास बी.ए.बी.कॉम. व बी.एस्सीची पदवीधारक विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

## शासनाच्या नियमानुसारच विद्यार्थ्यांना दिल्या जातात सोयी-सुविधा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**

नळदुर्ग येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृहात शासनाच्या नियमानुसार सर्व सोयी-सुविधा विद्यार्थ्यांना पुरविण्यात येतात. तसेच विविध सेवा देखील देण्यात येत असल्याचे अधीक्षक यांनी कळविले आहे. वसतीगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना ठरवून दिलेल्या मेनूप्रमाणे भोजन दिले जाते. खेळाचे साहित्य आणि शैक्षणिक साहित्य वेळेत उपलब्ध करून दिले जाते.

## भवानी ग्रुप शिवजन्मोत्सव समितीच्या शहराध्यक्षपदी मगर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**
येथील भवानी ग्रुप शिवजन्मोत्सव समितीच्या शहराध्यक्षपदी नितीन मगर यांची तर ग्रामीण अध्यक्षपदी अनिकेत कोंढारे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. दरम्यान, या समितीच्यावतीने महाआरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर व छत्रपती शिवरायांवर आधारित भव्य महानाट्याचे आयोजन करण्यात आले आहे.

येथील भवानी शिवजन्मोत्सव समितीच्या कार्यकारिणीचे गठन करण्यासाठी भवानी ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष लिंबराज डुकरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत महाआरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर व छत्रपती शिवरायांवर आधारित भव्य महानाट्याचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच उर्वरित कार्यकारणीची निवड करण्यात आली आहे. यामध्ये समितीच्या उपाध्यक्षपदी दीपक काळे, तेजस भोरे व शुभम शिंदे यांची तर सचिवपदी रोहन धोत्रे व ओंकार गुळवे यांची तसेच सहसचिवपदी विजय येरकळ व विष्णू डोलारे यांची तर कार्याध्यक्षपदी पृथ्वीराज मोटे व राम निचळ यांची तसेच सह कार्याध्यक्षपदी निखिल ढगे व बालाजी गडदे यांची तसेच कोषाध्यक्षपदी निलेश कांबळे व समाधान हराळे यांची तर संघटकपदी अभिजित धर्मे व रियाज तांबोळी यांची तसेच सहसंघटकपदी अजय माने, शरद शिंदे व अजय विधाते यांची निवड करण्यात आली आहे.

### ▶▶ प्रजासत्ताक दिन...



## मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**
तेरणा महाविद्यालय धाराशिव, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसीयविशेष युवक शिबीर जवळे (दुमाला) ता.जि. धाराशिव या ठिकाणी दि.२२ ते २८ जानेवारी रोजी संपन्न होत झाले. जिल्हा शासकीय रुग्णालय, धाराशिव यांच्या वतीने शिबिरात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमप्रसंगी डॉ. विलास तोडकर (सी.एच.ओ.) यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच जिल्हा शासकीय रुग्णालयातील क्रांती सपकाळ, प्रतीक्षा जगदाळे यांनी बीपी आणि शुगरची तपासणी केली. तसेच सुषमा मोटे ,सारिका जाधव, उर्मिला काटे, सुरेश गंगावणे, साहेबराव राठोड हे प्राथमिक आरोग्य केंद्र जवळे दुमाला येथील कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकिता चौरे हिने केले तर आभार ऋतुजा बोबडे हिने मानले. तर प्रमुख उपस्थितीत डॉ. सुशीलकुमार सरवदे, डॉ. अनघा तोडकरी, डॉ. तुळशीराम उकिरडे तसेच शिबिरार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हिप्परगा ताड येथे आज लक्ष्मण शक्ती सोहळा

**इटकळ, दि.३१ जानेवारी -**
तुळजापूर तालुक्यातील हिप्परगा ताड येथे शनिवार दि.१ फेब्रुवारी रोजी श्री. लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असुन गाव परिसरातील रामभक्त भाविकांनी या राम कथेचा लाभ घ्यावा, असे आवाहन हिप्परगा ताड येथील रामभक्त ग्रामस्थांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी हिप्परगा ताड येथे श्री लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न होत असुन श्री. संत एकनाथ महाराज लिखित श्री. भावार्थ रामायणाचे हे दुसरे वर्ष आहे. शनिवार दि.१ जानेवारी रोजी सायंकाळी ५:३० वाजता ग्रंथ वाचन व निरुपणास सुरुवात होत असून सकाळी ५:३० वाजता श्री लक्ष्मण शक्तीतून सावधान झाल्यानंतर ग्रंथ वाचन निरूपण सांगता होणार आहे. तब्बल बारा तास हा सोहळा होणार असुन श्री. भावार्थ रामायणातील युद्धकांडातील अध्याय क्रमांक ४३ ते ४९ असे सात अध्याय ओव्या ११३५ याचे रात्रभर वाचन व निरूपण होणार आहे. तरी या श्री लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळ्यासाठी गाव परिसरातील व तुळजापुर तालुक्यातील सर्व रामभक्तानी उपस्थित राहून राम कथेचा लाभ घ्यावा, असे आवाहन हिप्परगा ताड येथील रामभक्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आलेले आहे.



# कुटुंबाच्या एकीमुळे आमदार झालो : प्रवीण स्वामी

### प्रयाग मल्टीस्टेटतर्फे मान्यवरांचा सत्कार...

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.३१ जानेवारी -**
एकत्र कुटुंब पद्धतीमुळे आपल्याला काम करण्याची ऊर्जा मिळते. कुटुंबाच्या एकीपणामुळे कुठल्याही क्षेत्रात लढण्यासाठी बळ मिळत असते. याच बळातून आपण आमदार झाल्याचे उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी यांनी जळकोट येथे सांगितले.




जळकोट येथील प्रयाग मल्टीस्टेट को-ऑपरेटिव क्रेडिट सोसायटीच्यावतीने समाजातील विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना आ. प्रवीण स्वामी हे बोलत होते. आमदार स्वामी म्हणाले की, विजय मिळणारच या एकमेव ध्येयातून आपण शिक्षक पदाचा राजीनामा देऊन विधानसभा लढवली. तुमच्या कामामुळेच लोक ओळखत असतात. मी फक्त काम करत गेलो.

जनतेनी मला निवडून दिले. सर्वसामान्य गोरगरिबांची सेवा करण्याची संधी दिली. माझ्या कुटुंबानी मोठा आधार दिल्याने व एकत्र कुटुंब पद्धतीमुळे मला लढण्यासाठी बळ मिळाले होते. असेही आ. प्रविण स्वामी यांनी सांगितले. केवळ २८ दिवसात पक्ष ओळखत नसताना सुद्धा पक्षाने मला उमेदवारी दिली.

बलाढ्य उमेदवारासमोर लढण्यासाठी लोकांची सेवा कामी आल्याचे त्यांनी सांगितले.

प्रयाग मल्टीस्टेटच्यावतीने आ. प्रवीण स्वामी, जिल्हा साने गुरुजी कथा मालेचा गुणवंत पुरस्कार मिळाल्याबद्दल विजयकुमार मोरे व साईनाथ पिसके यांचा सत्कार करण्यात आला. प्रयाग मल्टीस्टेट को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीला ठेवी गटात सतत दुसऱ्यांदा सर्वोत्कृष्ट सहकार संस्था पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल चेअरमन ॲड. सचिन कदम, संचालक मंडळ व कर्मचारी वर्ग यांचा आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास गावातील बॅडमिंटन ग्रुप, युवक, प्रयागचे सभासद, ठेवीदार, खातेदार, ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वास भोगे यांनी केले. तर आभार ब्रह्मानंद कदम यांनी मानले.

## विविध क्रिडा स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**जळकोळ, दि.३१ जानेवारी -**
तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील कुलस्वामिनी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील विविध क्रीडा प्रकारात विजय मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा चंचलादेवी चव्हाण या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे पदाधिकारी, माजी नायब तहसीलदार माणिकराव चव्हाण उपस्थितीत होते.

यावेळी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील मुले-मुली विविध खेळात तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय व विभागीय स्पर्धेत यश संपादन केल्याने त्यांना संस्थेच्या वतीने बक्षीस देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर प्रकाश चव्हाण, उपसरपंच अमृता चव्हाण, प्राचार्य संतोष चव्हाण, ज्योतिका चव्हाण, रेखा चव्हाण, रवि चव्हाण, अभिजित चव्हाण, सुर्यकांत राठोड, शांताबाई राठोड, कांताबाई पवार, कमळाबाई राठोड, विठ्ठल जाधव, सुभाष नाईक, विनायक चव्हाण, शिवाजी पोलीस पाटील, नेमिनाथ चव्हाण, महादेव राठोड, पांडुरंग चव्हाण, सिताराम राठोड, मोतीराम राठोड, बाबुराव चव्हाण, व्यंकट राठोड, माणिक राठोड, यशवंत राठोड, सिद्राम पवार, सुभाष चव्हाण, शिवाजी चव्हाण उपस्थित होते.

## विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांनी घेतला कामकाजाचा आढावा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ जानेवारी -**
छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांनी धाराशिव जिल्ह्यातील पोलीस दलाच्या कामकाजाची पाहणी करण्यासाठी दि. २९ जानेवारी रोजी भेट दिली.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील सभागृहात त्यांनी जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी आणि शाखा प्रभारी अधिकारी यांची बैठक घेतली.

बैठकीत जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांमध्ये दाखल होणाऱ्या गुन्ह्यांचा तसेच प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेण्यात आला.

औद्योगिक क्षेत्रांना वारंवार भेट देऊन उद्योजकांच्या अडचणी जाणून घेण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच सुरक्षेच्या दृष्टीकोनातून योग्य त्या उपाययोजना आखण्याबाबत आणि औद्योगिक कंपन्यांचे प्रतिनिधी व स्थानिक प्रशासन यांच्यात समन्वय राखण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवसीय कृती आराखड्याच्या अंमलबजावणीसंदर्भात आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी जिल्हाभर एक सीसीटीव्ही-सुरक्षित नागरिक हा उपक्रम राबवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

## संत मीरा पब्लिक स्कूलमध्ये प्रजास्ताक दिनानिमित्त बक्षीस वितरण समारंभ संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३१ जानेवारी -**
येथील संत मीरा पब्लिक स्कूल व डॉ. वेदप्रकाश विद्यामंदिर शाळेमध्ये ७६वा प्रजासत्ताक दिन उत्साह साजरा करण्यात आला. संस्थापक डॉ. प्रतापसिंह पाटील, दोन्ही शाळेचे मुख्याध्यापक व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर तिरंगी झेंड्याला विद्यार्थ्यांनी व उपस्थितांनी मानवंदना दिली. विद्यार्थ्यांनी विविध शारीरिक कवयती व देशभक्तीपर गिते सादर सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.

विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभक्तीपर गीते, भाषणे व इतर कार्यक्रम सादर केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थापक डॉ. प्रतापसिंह पाटील व प्रमुख पाहुणे म्हणून आर.जी. शिंदे कॉलेजचे माजी प्राचार्य चंद्रकांत घुमरे, उषाताई घुमरे, डॉ. देवदत्त कुलकर्णी, रामचंद्र कुलकर्णी, ॲड. अजय खरसडे, विशाल देवकर, बावचीचे सरपंच नानासाहेब रोडगे, मतीन जिनेरी, विष्णू पाटील, भागवत गोडगे, सागर सोनवणे, बालाजी नेटके, रवींद्र शिंदे, राजेंद्र वाघमोडे, रवींद्र वाघमोडे, लालडूसाहेब बहिरे, शिकलकर, प्रा. उत्तम कोकाटे, मेजर सहदेव गिरवले, लड्डू बहिरे, अजित तिवारी, स्वरुपसिंह सद्दिवाल, संतोष गायकवाड, मतीन हावरे, सर्व शिक्षक, कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वर्षभरामध्ये शाळेमध्ये विविध स्पर्धात्मक शैक्षणिक उपक्रम, क्रीडा स्पर्धा, सामान्य ज्ञान, कविता गायन, हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा, आनंद मेळावा स्पर्धा, इत्यादी स्पर्धेमधील विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते मेडल व प्रमाणपत्र स्वरूपामध्ये बक्षीस देण्यात आले.

बक्षीस मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहण्यासारखा होता. यानंतर विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक व मान्यवरांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व सांगत मार्गदर्शन केले व खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधुरी नांगरे यांनी केले तर परिश्रम सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी घेतले.

# निष्काम कर्मयोगी : मारुती चितमपल्ली

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्व संध्येला २०२५ या वर्षासाठीचे पद्म पुरस्कार जाहीर करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्रातील तिघांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला.त्यातीलच एक नाव म्हणजे मारुती चितमपल्ली....



वनाधिकारी ते वन्यजीव अभ्यासक जंगलातील प्राणी जीवन आणि त्यांचे बारकावे रेखाटणारे लेखन ओघवत्या भाषाशैलीत करणारे साहित्यिक इथपर्यंतचा हा प्रवास होय. आपल्या आयुष्याची चार तप अरण्यामध्ये व्यतित करणारे मारुती चितमपल्ली अरण्य ऋषी म्हणवले गेले ते याच कारणाने.... पुरस्कार जाहीर झाला आणि माझ्या डोळ्यासमोर तरळले ते आमच्या पहिल्या भेटीची क्षणचित्रे....

साधारणतः दीड वर्षाखालील प्रसंग आहे. सायंकाळच्या ५.३० वाजताची भेटीची वेळ निश्चित झालेली. आम्ही भेटीसाठी अगदी वेळेत त्या ठिकाणी पोहोचलो. काहीशी हुरहुर आणि काहीशी चिंता मनात होती पण तशी उत्सुकताही कमालीची होती. एवढ्या प्रचंड ज्ञानी माणसाला आपण काय बोलणार? माझ्याकडे तर कसल्याही प्रकारची प्रश्नावली नव्हती. एकच तेवढा प्रश्न मनात घोळत होता एवढा जिवंत निसर्ग ज्यांनी ओतपोत जगला, ज्यांनी गो.नी दांडेकर ,नरहर कुरुंदकर, जी.ए.कुलकर्णी,व्यंकटेश माडगुळकर,चित्रकार आलमेलकर, डॉ.सालिम अली, माधवराव पाटील अशा अनेक महान विभूतींच्या सहवासात स्वतःच्या आयुष्यातील कितीतरी क्षणांना चिरंजिवीत्व प्राप्त करून दिले, त्या व्यक्तीला आज रोजी काय बरं वाटत असेल? एवढा प्रदीर्घ कालखंड त्यांनी मागे टाकला, ज्यांच्या सहवासात एकमेकांच्या ओढीने अन् गोडीने अद्वितीय साहसाला धारण करीत मार्गक्रमण केले ते सर्व सहचर आज रोजी कधीही न परतीच्या प्रवासाला निघून गेले. स्वातंत्र्यपूर्व भारतातील बैलगाडीच्या प्रवासापासून स्वातंत्र्योत्तर आधुनिकतेने सुसज्ज भारताचा प्रवास त्यांनी बघितला, जगला आणि ज्यांना गुरुस्थानी मानून त्यांनी आपले जीवन कृतार्थ बनविले त्या व्यक्तीच्या जाण्याने मागे राहिलेल्या एकटेपणाबद्दल ते काय विचार करत असतील? हे जाणून घेण्यास मी आतुर होते.

जेव्हा आम्ही त्यांच्या भेटीसाठी त्यांच्या घरी गेलो तेव्हा त्यांच्या कक्षेतून त्यांना बाहेर आणण्यापर्यंतच्या कालावधीतील माझी हुरहूर विलक्षण होती. त्यांचे वय अधिक आहे हे मी जाणून होते, पण साधारण किती असावे याचा नेमका अंदाज नसल्याकारणाने ते कसे दिसत असतील? याविषयीची माझी उत्कंठा शिगेस पोहोचली होती. कितीतरी दिवसांपासून मनाशी बाळगलेली इच्छा प्रत्यक्षात उतरणार होती, म्हणूनच असेल त्यांना त्यांच्या कक्षातून बाहेर आणले जात असताना मनात मात्र विलक्षण हुरहुर वाढली आणि माझ्या मनात त्यांना भेटण्याची इच्छा कशी निर्माण झाली ते चित्र क्षणार्धात डोळ्यासमोर साकारले.

धाराशिव आकाशवाणी वरून साधारणतः दोन-तीन मिनिटासाठी ज्यांच्या 'चकवाचांदणं' या आत्मचरित्राचे वाचन सुरू होते तेव्हा माझी नेमकी शाळेला जाण्याची लगबग असायची त्यावरून शाळेला निघायला किती वेळ आपल्या हातात आहे. याचा अंदाज घेण्यासाठीच तेवढे माझे कान नभोवाणीकडे टवकारलेले असायचे. त्यामुळे त्या वाचनाला मी सुरुवातीला फार गांभीर्याने कधी घेतले नाही. पण हळूहळू त्यातील काही संदर्भ मनाचा ठाव घेऊ लागले विशेषतः तो प्रसंग जेव्हा अभ्यासातील प्रतिकूलतेमुळे त्यांच्या झालेलया मानसिक खच्चीकरणाचा कालावधी आणि त्यातूनच पुढे अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याने घडवून आणलेली नेत्रदीपक प्रगती. या प्रगतीच्या प्रवासाची माहिती घेण्यासाठी माझे मन आसुसलेले असायचे. नेहमीच मला अशा व्यक्तिमत्त्वांनी भुरळ घातली आहे, ज्यांनी अपयशाला वारंवार पचवून यशाचे मनोरे स्वतःच्या नावांनी अधोरेखित केले आहेत. त्यामुळे आपसूकच मला त्यांच्या आत्मचरित्राबद्दल ओढ वाटणे स्वाभाविक होते.

मी संस्कृतशिक्षिका असल्याने असेल वा मला निसर्गाची विलक्षण ओढ असल्याने असेल परंतु पुढे पुढे येणारे निसर्ग वर्णन, पक्षांविषयीची त्यांची ओढ, त्यांच्या संशोधनासाठीचे त्यांचे पराकोटीचे प्रयत्न, संस्कृतात येणारी व काल्पनिक म्हणवली जाणारी पक्षांविषयीची माहिती जाणून घेण्यासाठी अट्टाहासाने संस्कृत शिकण्यासाठीची त्यांची धडपड व त्या धडपडीला साजेशी उत्तम विद्यार्थ्यांची गुणवत्ता धारण करून संस्कृत भाषेवर मिळवलेले वर्चस्व माझ्या मनाला अंतःकरणापासून उभारी देत होते. वयाची पर्वा न करता नवीन भाषेला आत्मसात करण्यासाठी जीवाचे रान करणारे, इंग्रजी, रशियन, मराठी, संस्कृत वगैर बारा भाषेवर केवळ आपल्या पक्षांविषयीच्या प्रेमापोटी संशोधनासाठी अहोरात्र परिश्रम करून त्या आत्मसात करीत इष्ट कार्याची पूर्ती करण्याचे दिव्यत्व साधणारे मारुती चितमपल्ली हे संवेदनशील, निसर्ग अन् पक्षीप्रेमी अभ्यासू व्यक्तिमत्त्व होते. ध्येयनिष्ठा प्रामाणिक असेल तर माणूस परिस्थितीच्या छाताडावर उभे राहून तिला कसा नेस्तनाबूत करतो हे मी त्यांच्या रूपाने ऐकत होते, पण त्यात अनियमितता होती. रोजच ते ऐकायला मिळेल असे होईना, पण त्यामुळे एक महत्त्वाची गोष्ट घडली ती म्हणजे त्यांचे ते आत्मचरित्र मिळवून वाचण्याची तीव्र इच्छा मनात निर्माण झाली. त्यातूनच पुढे धाराशिव येथे भरलेल्या साहित्य संमेलनात मी त्यांच्या आत्मचरित्राची शोधाशोध केली. परंतु, त्या अगोदरच त्या सर्व पुस्तकांची विक्री झालेली होती. त्यामुळे तिथेही माझी निराशा झाली. यानंतरही साधारणतः तीन एक वर्षाचा काळ मागे पडला. पण ,ते वाचण्याची इच्छा मात्र तसूभरही कमी झाली नाही.

तेव्हा योगायोगाने ते पुस्तक ऑनलाईन मिळते का बघावे म्हणून प्रयत्न केले आणि ते मिळालेही. जसजसे ते पुस्तक वाचन मी पुढे जात होते तसं तसे त्यांच्याबद्दलचा माझा आदर द्विगुणित होत होता. किती जिद्द, दृढनिश्चयी वृत्ती, धाडसीपणा चिकाटी, प्रामाणिकपणा, निसर्गप्रेम, पक्षीवेड या त्यांच्या सर्वच गुणांनी मला भुरळ घातली. हे सर्व घडत असतानाच एखादे वर्ष अगोदर मारुती चितमपल्ली नागपूरहून आपल्या गावी सोलापूरला परतत असल्याचे मी वर्तमानपत्रातून वाचले होते आणि तेव्हाच मनोमन मी ठरवलेले की ते आता इथे जवळच आले आहेत तर आपण नक्कीच त्यांची भेट घेवूया. यासाठीची इच्छा कितीदा तरी मी माझ्या माणसाजवळ बोलून दाखवलेली. आज तो दिवस आणि तो क्षणही आला होता आणि म्हणूनच त्या नभोवाणीवर ऐकत असलेल्या वाचनाच्या दिवसापासून ते आज आत्ताच्या त्यांच्या कक्षेतून माझ्या पुढ्यात येणाऱ्या क्षणापर्यंतचा कालावधी मोठा विलक्षण होता. हा सगळा प्रवास मला विलक्षण अचंबित करणारा अन् दैवी कृपेने युक्त वाटत होता. एखाद्या गोष्टीची तीव्र इच्छा कित्येक दिवस मनी बाळगावी आणि ती प्रतीक्षा संपून अशाप्रकारे आपल्यासमोर यावी हा योग म्हणजे निव्वळ दैवयोग होय. त्याची अनुभूती मी आज घेत होते. ते आदरणीय व्यक्तिमत्व आमच्या समोर येऊन बसले. अतिशय प्रसन्न, सतेज मुद्रा, शांत भाव, जीवनात ज्ञान प्राप्तीसाठी तसेच ध्येयासाठी घेतलेल्या अमर्याद प्रयत्नांची आणि प्रामाणिकपणाची मूर्तीमंत प्रतिमा म्हणजे मारुती चितमपल्ली... असेच मला तरी त्यावेळेला भासले. त्यांच्याकडे बघताना त्यांच्या प्रतीचा आदरभाव माझ्या मनी द्विगुणीत होणे निसर्गप्राप्त होते. कोणत्याही स्वरूपाच्या प्रश्नांना घेऊन मी त्यांच्याकडे गेले नव्हते. फक्त त्या व्यक्तिमत्त्वाला बघण्यासाठीचा सश्रद्धेय भाव मनात ठेवून मी तिथे बसले होते. त्यामुळे त्यांना काय बोलावे हेचं मला कळेना.

जुजबी परिचय करून दिला. परंतु, भेटीला आलेल्या मंडळींनी त्यांची सर्व पुस्तके वाचावीत.. कमीत कमी जे वाचले त्यावर तरी प्रश्न विचारावी अशी त्यांची अपेक्षा अगदी जास्त होती. पण, एव ढ्या महान विभूती पुढे आपले ज्ञान निव्वलच तोकडे म्हणून मी गप्पच होते. माझ्या सोबती जमेल तेवढे प्रश्न विचारीत होते. परंतु त्यांनी त्यांचे एकही पुस्तक वाचले नव्हते केवळ माझ्या अट्टहासाखातर ते माझ्यासोबत आले होते. अगदी हीच अवस्था यजमानांची होती. त्यांची भूमिका एवढीच होती की तुला त्यांना भेटायचे होते त्यासाठीचा तुझा मार्ग मी मोकळा केला. पण जेव्हा प्रत्यक्ष चितमपल्ली म्हणालेतुम्ही माझी सर्व पुस्तकं वाचा अन् मग भेटा वा जे तुम्ही चकवाचांदणं वाचलं त्यावर तुम्हाला काहीच प्रश्न पडले नाहीत का? ज्या त्यांच्या वक्तव्यावर आम्ही काहीसे ओशाळलो. खरेच आपण त्या दृष्टीने विचार करून यायला हवे होते असे मनाला वाटून मन खट्टू झाले.

पण तरीही मी त्यांच्याच आचरणाचा संदर्भ देत त्यांना सांगण्याचा प्रयत्न केला की तुम्ही ज्याप्रमाणे इतर त्या त्या क्षेत्रातील व्यक्तीच्या भेटीत जात, त्याचप्रमाणे मी आले आहे. परंतु ज्ञानलालसेची तीव्र इच्छा असलेल्या चितमपल्ली यांनी ध्येयप्राप्तीसाठी परिश्रमासोबतच शिस्तबद्ध जीवनाचे सूत्र अंगीकारले होते. त्यामुळे इतरांकडूनही त्यांची अपेक्षा काहीशी अशीच असली पाहिजे. त्यामुळे भेट थोडीशी आवडती घेऊन आम्ही त्यांच्या आशीर्वाद घेऊन निघालो.

नातलगांच्या सांगण्यावरून वय वर्ष ९१ असलेल्या परंतु आजच्या युवा पिढीला लाजवेल असा दांडगा उत्साह असलेल्या तरुणाला मी पाहत होते. भेट झाली परंतु माझ्या मनातील रुख रुखं कायम राहिली होती. ज्या प्रश्नाचे उत्तर जाणून घेण्यास मी कमालीची उत्सुक होते त्याचे उत्तर फारसे समाधानकारक न मिळाल्याने मी थोडीशी मनातून नाराजीनेच परतत होते. पुढील दीड दिवस तरी मी याच विचारात घालवला. परंतु नंतर गंमत अशी झाली की, आपसूकच मला माझ्या प्रश्नाच्या उत्तराचा बोध त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून झाला. भेटीनंतर परतताना नातलागांकडून मिळालेल्या माहितीनुसार त्यांच्या पत्नी यापूर्वीच इहलोक सोडून गेल्याचे मला ज्ञात होते. परंतु आत्ता त्यांची एकुलती एक मुलगीही नि र्तल्याचे समजले. तेव्हा मात्र मी विचारात पडले. जिथे मी इतर सहजरांच्या जाण्याने तुम्हाला काय वाटते हे जाणून घेण्यास उत्सुक होते, तिथे आपलेच अपत्य वा जोडीदारास सोडून गेल्याचे दुःख वा वाट्या ला आलेले एकाकीपण जगताना कुठेही दुःखाची हलकीशी छटा ही मला जाणवली नाही.त्यांच्या दिनचर्येशी संबंधित चर्चा केली असताना आजही ते कोशलेखनामध्ये व्यस्त असल्याचे स्पष्ट झाले. आणि यातूनच मला माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले.



**उज्ज्वला शिंदे**
धाराशिव, मो.नं. ९५५२१९५१४६

की महान विभूती कौटुंबिक व संसारिक दुःखाने दुःखी न होता अविरत अनासक्त होऊन काम करीत राहतात ते खऱ्या अर्थाने कर्मयोगी असतात संसारिक जीवनातील दुःख ला बाजूला ठेवून अनासक्त आणि विरक्त भावनेने कर्म करणारे वयाची चार तपे अरण्यात व्यतीत करणारे मारुती चितमपल्ली मला तरी त्यावेळी खरे कर्मयोगी ज्ञान योगी आणि आंतरिक ऊर्जेने विलसत असेलेले अरण्यऋषीचं जाणवले. म्हणूनच माझ्या मनःपटलावर प्रचंड इच्छाशक्ती असलेल्या या विभुतीचे प्रतिबिंब कायमसाठी 'मूर्तिमंत निष्काम कर्मयोगी' म्हणून प्रेरणा देत चिरस्मरणात राहिले.

कोणत्याही पदाची, मानसन्मानाची, संपत्तीची लालसा न ठेवता आत्मिक जि ज्ञासेपोटी, संशोधन कार्यात अविरत कार्यरत राहून आत्मिक आनंद मिळवणाऱ्या या असामान्य व्यक्तिमत्वाला आज अशाप्रकारे पद्मश्री या सन्मानाने सन्मानित होताना पाहून, अनंत काळाच्या त्याच्या श्रमांचा श्रमपरिहार होताना, खऱ्या अर्थाने सन्मानाचा सन्मान झाल्याची सुखद अनुभूती आनंद देत आहे.

CMYK

लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## दर्जी बोरगावात चिन्मयानंद स्वामींच्या १०१ व्या समाधी सोहळ्याची सांगता

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.३१ जानेवारी -**

रेणापूर तालूक्यातील दर्जी बोरगांव येथील श्री सदगुरू चिन्मयानंद स्वामी महाराज यांचा १०१ वा समाधी सोहळा २३ ते ३० जानेवारी दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा झाला.या सोहळ्याची गुरुवार दि.३० जानेवारी रोजी काल्याचे किर्तन व महाप्रसादाने भक्तीमय वातावरणात सांगता




झाली.

रेणापूर तालुक्यातील दर्जी बोरगाव येथे चिन्मयानंद स्वामी महाराज यांचे संजीवन समाधी मंदिर आहे.

दर्जी बोरगाव येथील चिन्मयानंद स्वामींचे देवस्थान जागृत देवस्थान म्हणून पंचक्रोशीत प्रसिध्द आहे.

गुरुवार दि.३० जानेवारी रोजी हभप. ॲड. जयवंत महाराज बोधले यांचे काल्याचे किर्तन संपन्न झाले. काल्याच्या किर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी हजारो भाविक भक्तांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.



### संक्षिप्त वृत्त...



### हिंदू खाटीक समाजाचे कार्यकर्ते महाकुंभ मेळाव्यास रवाना

**उदगीर, दि.३१ जानेवारी -**

येथील हिंदू खाटीक समाजातील १०१ कार्यकर्ते प्रयागराज येथे नुकतेच रवाना झाले आहेत. रवाना झालेल्या कार्यकर्त्यात उदगीर येथील शिवसेना ठाकरे गट जिल्हाध्यक्ष सचिन साबणे, भाजपाचे शहर सरचिटणीस आनंद साबणे, राष्ट्रवादीचे शंकर घोणे, ॲड. मंगेश साबणे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ॲड. अभिजीत साबणे, रवि सावने, किरण साबणे, उमाकांत डोंगरे, किशन साबणे, दिनेश साबणे, मिलिंद टाके, राज शिरसागर, मनोज सदानंद, ॲड. देविदास साबणे, किरण साबणे, अनिकेत साबणे, नागेश साबणे, विश्वनाथ साबणे, वैभव साबणे यांच्यासह ५१ जणांनी जणांनी महाकुंभ मेळाव्यसाठी उपस्थित राहण्यासाठी रवाना झाले आहेत. यावेळी व्यंकट साबणे, श्याम साबणे, भानुदास साबणे, विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष महादेव घोणे यांची उपस्थित होते.

### संगीतरत्न पुरस्काराने गायक रविराज किडीले सन्मानित

**शिरूर अनंतपाळ, दि.३१ जानेवारी -**

शिरुर अनंतपाळ शिवा संघटनेच्या वतीने श्री क्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमाच्या निमित्ताने आयोजित



शिवा संघटनेच्या वार्षिक मेळाव्यात शिरुर अनंतपाळ नगरीचे सुपुत्र वीरशैव लिंगायत संप्रदायातील सुप्रसिद्ध गायक रविराज किडीले यांना 'संगीतरत्न' पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. मंत्री दिपक केसरकर यांच्या हस्ते त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोहर धोंडे, धनंजय मुंडे, सद्गुरु राजशेखर शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर, माजी आमदार बब्रुवान खंदाडे आदी मान्यवर उपस्थित होते. गायक रविराज किडीले यांची अनेक गीते ही प्रसिद्ध आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना संगीतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



### महाराष्ट्र ग्रामीण बँकेची ग्राहकांच्या वारसांना दोन लाखांची मदत

**वलांडी, दि.३१ जानेवारी -**

तालुक्यातील वलांडी येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या ग्राहकांच्या मृत्यु नंतर प्रधानमंत्री जीवन ज्योती योजनेतुन त्यांच्या वारसांना प्रत्येकी दोन लाखांची आर्थिक मदतीचा धनादेश त्यांच्या वारसांना वितरीत करण्यात आला. धनेगाव येथील हाणमंत तुकाराम आपटे व टाकळी येथील दिपक गणपतराव कुलकर्णी यांचे निधन झाले आहे. या दोघांचेही बँकेत खाते असुन प्रधानमंत्री जीवन ज्योती योजनेत विमा काढण्यात आला होतो. या दोघांच्याही मृत्युनंतर बँकेच्या पदाधिकाऱ्यांनी पाठपुरावा करुन विम्याची रक्कम त्यांच्या वारसांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. गुरुवारी बँकेत हाणमंत आपटे यांचे वारस पत्नी अनिता आपटे (पत्नी) व दिपक कुलकर्णी यांचे वारस गणपतराव कुलकर्णी (वडील) या दोघांनाही प्रत्येकी दोन लाखांच्या मदतीचा धनादेश वितरीत करण्यात आला. यावेळी बँकेचे व्यवस्थापक भगवान सवडकर, ऑफिसर शुभम धाबर्डे, महेश अतकरे, मस्तान शेख, अमन पठाण, शायक शेख, अंजली सगर, उपसरपंच रामलिंग शेरे, सुधीर भोसले, विठ्ठल बोयणे, अजीज सौदागर, शंकर आपटे आदींची उपस्थिती होती.




### निवासी मतिमंद शाळेची सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धेत द्वितीय स्थान

**उदगीर, दि.३१ जानेवारी -**

राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तिकरण संस्थान सिकंदराबाद येथे नुकतेच विशेष गरजा असणाऱ्या बौद्धिक दिव्यांजन (मतिमंद) मुलांसाठी दोन दिवसीय राष्ट्रीय मेळावा भरला होता. यामध्ये रोजगार मेळावा, कौशल्य मेळावा, स्वतःची ओळख, सांस्कृतिक कार्यक्रम व रोजगार नियुक्तीचे तरतुदी असे अनेक कार्यक्रम पार पाडली गेली. उदगीर येथील जीवन विकास निवासी मतिमंद कर्मशाळेने आपले दोन विद्यार्थ्यांचे यात सहभाग नोंदविले होते. कागदी-प्लास्टिक, कृत्रिम फुलापासून गुच्छ तयार करणे, सजावटीचे समान तयार करणे हा व्यवसायाची स्टॉल या ठिकाणी प्रदर्शित करण्यात आली होती. ११ वेगवेगळ्या राज्यातून मतिमंद स्पर्धक येथे जमले होते. तेलंगणा राज्याचे राज्यपाल विष्णु देव वर्मा यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. कर्म शाळेतील विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव नि.म. वडगावकर यांनी विद्यार्थ्यांचे व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. कर्मशाळेचे अधीक्षक राजापटेल अ. मलिक, निदेशक देविदास चव्हाण, जाफरी हिलाल, वर्ष लोहारे, पाटील मधुकर सह सर्व कर्मचाऱ्यांनी मेळाव्यात सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

---

बर्ड फ्लूचा प्रसार रोखण्यासाठी जिल्हा प्रशासन ॲक्शन मोडवर...

# कुक्कुटपालकांमध्ये बर्ड फ्लूविषयी जनजागृती करा : जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

### उपविभाग, तालुकास्तरीय अधिकाऱ्यांची बैठक...

### नागरिकांनी भीती न बाळगता सतर्क राहण्याचे आवाहन...







**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३१ जानेवारी -**

उदगीरमधील रामनगर परिसरातील कुक्कुट पक्ष्यांचे अहवाल बर्ड फ्लूसाठी सकारात्मक आल्यानंतर जिल्हा प्रशासनाने तत्काळ पावले उचलत प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरु केल्या आहेत. पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्याकडून परिस्थितीचा आढावा घेत बर्ड फ्लूचा प्रसार रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे यांनी आज जिल्ह्यातील उपविभागीय व तालुकास्तरीय अधिकारी यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली. तसेचे जिल्ह्यातील सर्व पशुपालकांची संबंधित तहसीलदार यांनी बैठक घ्यावी. त्यांना बर्ड फ्लूचा प्रसार रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांची माहिती द्यावी, अशा सूचना दिल्या आहेत.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी भूपेंद्र बोधनकर यांच्यासह जिल्ह्यातील सर्व उपविभागीय महसूल अधिकारी, तहसीलदार, पोलीस अधिकारी, गट विकास अधिकारी, मुख्याधिकारी, पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी या बैठकीमध्ये सहभागी झाले होते. उदगीरमध्ये कुक्कुट पक्ष्यांना बर्ड फ्लूची बाधा झाल्याचे निष्पन्न झाले आहे. यापरिसरात आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने हाती घेण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात इतरत्र बर्ड फ्लूचा प्रसार होवू नये, यासाठी कुक्कुटपालकांमध्ये जनजागृती करण्यावर भर द्यावा. काय करावे, काय करू नये याबाबत त्यांना मार्गदर्शन करावे. यासाठी प्रत्येक तालुकास्तरावर संबंधित तहसीलदार यांच्या उपस्थितीत कुक्कुटपालकांची बैठक आयोजित करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या आहेत.

बर्ड फ्लूचा प्रसार रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत विविध विभागांवर जबाबदारी सोपविण्यात आली असून त्यानुसार सर्वांनी समन्वयाने काम करावे. या कामामध्ये आवश्यकतेनुसार पोलिसांची मदत घेतली जावी. जिल्ह्यात कुठेही पशुपक्ष्यांमध्ये असाधारण मरतुक आढळून आल्यास पशुसंवर्धन विभागाने तातडीने दखल घेवून पुढील कार्यवाही सुरु करावी. यासाठी जिल्हास्तरावर स्वतंत्र नियंत्रण कक्ष सुरु करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी यांनी दिल्या. पशुसंवर्धन विभागाने खबरदारीचा उपाय म्हणून जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या कुक्कुट पक्ष्यांचे वैद्यकीय नमुने गोळा करून तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्याच्या सूचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी यावेळी दिल्या. तसेच जैवसुरक्षा, पोल्ट्री फार्मचे निर्जंतुकीकरण करण्याबाबत कुक्कुटपालकांना मार्गदर्शन करण्याच्या सूचना केल्या.

निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे यांनी प्रतिबंधात्मक उपाययोजनामध्ये करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शन केले.

बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव आढळलेल्या रामनगरच्या एक किलोमीटर परिघात प्रतिबंधित क्षेत्र घोषित करण्यात आले आहे. याठिकाणी पशुपक्ष्यांच्या वाहतुकीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. तसेच या परिसरातील ४१ कुक्कुट पक्षी, अंडी व पक्षी खाद्याची तातडीने शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली असून परिसराचे निर्जंतुकीकरण करण्यात आले आहे. तसेच १० किलोमीटर परिसरात अलर्ट झोन घोषित करून प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यातील सर्व पोल्ट्री फार्मची नोंदणी पशुसंवर्धन विभागाकडे करण्याचे यापूर्वीच आवाहन करण्यात आले आहे. यासोबतच घरगुती कुक्कुट पालनामध्ये ५० पेक्षा अधिक पक्षी असल्यास त्यांचीही नोंदणी बंधनकारक आहे. नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात ही नोंदणी करता येईल, असे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे यांनी सांगितले.

#### चिकन व अंड्याचे सेवन सुरक्षित...



पशुवैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, चिकन आणि अंडी व्यवस्थित शिजवून खाल्ल्यास कोणत्याही प्रकारचा धोका नाही. बर्ड फ्लूचा विषाणू उष्णतेला संवेदनशील असल्याने ७० डिग्री सेल्सियस किंवा त्याहून अधिक तापमानावर तो नष्ट होतो. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता योग्य स्वच्छता पाळून चिकन आणि अंडी सेवन करणे सुरक्षित असल्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे यांनी सांगितले.

---

## मराठा बहुजन समाज अंधश्रद्धेतून मुक्त झाला पाहिजे : ज्ञानेश्वर महाराज वाबळे

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३१ जानेवारी -**

थोर संत महापुरुषांनी अंधश्रद्धेला कडाडून विरोध केला होता. वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून अनेक वर्षांपासून अंधश्रद्धा मुक्त समाज झाला पाहिजे यासाठी प्रयत्न केला जातो पण एकविसाव्या शतकात सुद्धा लोक अंधश्रद्धेतून मुक्त होताना दिसत नाहीत. मराठा बहुजन समाज ज्या दिवशी कर्मकांडातून मुक्त होईल त्यादिवशी सामाजिक क्रांती घडेल, असा विश्वास ज्ञानेश्वर महाराजांनी व्यक्त केला.

अध्यक्षस्थानी लिंबन महाराज रेशमे होते. यावेळी उद्घाटक लिंबराज सूर्यवंशी, प्रमुख पाहुणे अभय साळुंके, डी.बी. बरमदे, विशेष सत्कारमूर्ती श्रीमंत जाधव, रमेश मदरसे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी दिलीप धुमाळ, अनिल जाधव, विनोद सोनवणे, अजय मोरे, आनंद जाधव, गणेश गायकवाड, बाळासाहेब बिरादार, डी. एन. बरमदे, डी.एस. धुमाळ, महेश जाधव, बाबुराव सोमवंशी, बालाजी बरमदे, प्रताप हंगरगे, नामदेव गाडीवान आदींनी प्रयत्न केले.

सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक एम.एम. जाधव यांनी केले. सूत्रसंचालन सतिष हानेगावे तर आभार प्रमोद कदम यांनी मानले.

## तिकीट दरवाढीच्या विरोधात एमआयएमचे आंदोलन

### भाडेवाढ रद्द करा; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.३१ जानेवारी -**

वयोवृध्द, शाळकरी,महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला आणि प्रवाशांसाठी सुखकर, सुरक्षित आणि फायद्याचा प्रवास असल्याने महामंडळाच्या बस प्रवासासाठी गर्दी होते. परंतू महाराष्ट्र सरकारने अचानकपणे १५ टक्के दरवाढ करुन सर्वसामान्यांना व प्रवाशांना धक्का दिला आहे. दुष्काळाचे चटके सोसर्णाऱ्या जनतेला सरकारी वाढ सोसणारी नाही. यामुळे तात्काळ केलेली दरवाढ रद्द करावी. अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा एमआयएमचे जेष्ट नेते मुझफरअली इनामदार यांनी दि.३१ रोजी औशाच्या बसस्थानकात आंदोलना दरम्यान दिला आहे.

शहरी व ग्रामीण भागातील प्रवाशी आजही वाट पाहीन पण बसनेच जाईन म्हणत या सुरक्षित, सुखकर प्रवास बसने करतात. जनतेच्या अशा विश्वासाला महाराष्ट्र सरकारच्या दरवाढीच्या धोरणाने तडा बसला आहे. निसर्गाच्या असमतोलामुळे निघालेल्या पिकाला बाजारात भाव मिळत नाही. शेतातून भरवशाचे उत्पादन होत नाही.

यामुळे शासनाकडून महामंडळाच्या बस प्रवासात झालेल्या दरवाढीचा भार सोसवेनासा झाला आहे. शासन एकीकडे अनेक सवलती देत खुश करण्याचा प्रयत्न करीत आहे. तर दुसरीकडे दरवाढ करुन वसुली करीत आहे.

महाराष्ट्र सरकारने सर्वसामान्य जनतेचा विचार करुन केलेली दरवाढ तात्काळ रद्द करावी.अशी मागणी मागील चार दिवसापुर्वी अचानकपणेच एस.टी.च्या तिकीट दरात प्रवाशाला न सोसणारी १५ टक्के पर्यंतची दरवाढ केल्याने ग्रामिण भागातील सर्वसामान्य जनतेचा प्रवास थांबण्याची शक्यता आहे.

तरी सदरील भाडेवाढ केलेली तात्काळ रद्द करण्यात यावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्याच्या इशारा एम.आय.एम. पक्षाच्या वतीने जेष्ट नेते मुझफरअली इनामदार यांनी आगार प्रमुख शंकर स्वामी, तहसिल कार्यालया मार्फत राज्याचे मुख्यमंत्री, परिवहन मंत्री यांना निवेदनाद्वारे दिला आहे. अजहर कुरेशी, शेख नय्युम, शेख सलीम, शेख मुशीर, हारुणखॉ पठाण, शेख अफसर, शेख मौला, इस्माईल बागवान आदी उपस्थित होते.

## वैशाली बिरादार यांचा विद्यापीठाच्या वतीने सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३१ जानेवारी -**

तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील वैशाली बालाजी बिरादार (बी.ए.तृतीय वर्ष) यांचा उन्हाळी २०२४ परीक्षेतील यशाबद्दल विद्यापीठाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

वैशाली बिरादार यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या पदवी स्तरावरील उन्हाळी-२०२४ परीक्षेत कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या इंग्रजी (अनिवार्य) विषयात सर्वाधिक गुण संपादन केल्याबद्दल 'स्व.श्री.टी.मल्लिकार्जुनराव स्मृतिप्रित्यर्थ पारितोषिक' व पदवी स्तरावर कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील द्वितीय वर्ष इंग्रजी (अनिवार्य) विषयात सर्वाधिक गुण संपादन केल्याबद्दल 'डॉ.ए.पी.विठ्ठल पारितोषिक' अशी एकूण दोन पारितोषिके संपादन केली. त्याबद्दल दि.३० जानेवारी २०२५ रोजी विद्यापीठाद्वारे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या उपस्थितीत परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्र.संचालक हुशारसिंग साबळे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन वैशाली बिरादार यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी वैशाली बिरादार यांच्यासमवेत महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.विजयकुमार पवार, डॉ.सचिन हंचाटे, डॉ.आनंद मुसळे व प्रा.प्रज्ञा कुलकर्णी उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर विद्यापीठाच्या विविध विभागांचे संचालक व व्यवस्थापन परिषद सदस्य उपस्थित होते.

## माजी मंत्री आ. संभाजी पाटील-निलंगेकर यांच्या विविध ठिकाणी सांत्वनपर भेटी



**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.३१ जानेवारी -**

तालुक्यातील शेंद, बिबराळ व उजेड या ठिकाणी माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी सात्वंनपर भेटी देऊन धुमाळे, माने, जन्मले व कदम कुटूंबियांशी संवाद साधून त्यांना धीर दिला.

याप्रसंगी त्यांच्या सोबत भाजपा तालुकाध्यक्ष मंगेश पाटील, दगडोजी साळुंके, संजय दोरवे व गोविंद चिलकुरे यांची उपस्थिती होती. नगरपंचायतचे नगराध्यक्ष प्र. गणेश धुमाळे यांच्या आजी स्व. नागिनबाई धुमाळे यांचे काही दिवसांपूर्वी वृद्धापकाळाने निधन झाले. शेंद उदपचे सरपंच देवाभाऊ माने यांचे वडील मुरलीधर माने यांचे निधन झाले. बिबराळचे सरपंच प्रल्हाद जन्मले यांच्या आई कलुबाई जन्मले यांचे निधन झाले. उजेड येथील उत्तम कदम यांचे भाऊ नागनाथ कदम यांचे निधन झाले. बुधवारी सर्व ठिकांणी माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी धुमाळे, माने, जन्मले व कदम कुटुंबियांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन सांत्वनपर भेट घेतली. यावेळी गणेश धुमाळे, देवाभाऊ माने, प्रल्हाद जन्मले व उत्तम कदम यांच्या कुटुंबियांचे सदस्य, भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

✻ **निलंगा, दि.३१ जानेवारी -** रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज कीर्तन ऐकत होते असे इतिहासात अनेक दाखले आहेत.

कीर्तनकार परिवर्तनवादी असेल तर छत्रपती शिवाजी महाराजांसारखा प्रजाहितदक्ष पराक्रमी राजा तयार होऊ शकतो एवढी ताकत कीर्तनात असून सामाजिक विषमता मातीत गाढायचे काम सुद्धा वारकरी संप्रदायाने केले आहे, असे प्रतिपादन मधुकर महाराज बारूळकर यांनी केले.

## पानगाव ग्रामपंचायत घेणार बाल स्नेही गाव करण्यासाठी पुढाकार

### कुलभूषण संपत्ते यांचे प्रतिपादन...

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.३१ जानेवारी -**

बालकांच्या न्याय हक्कासाठी कार्यरत असलेली पानगावची ग्राम बाल संरक्षण समिती सक्रीय असून ग्रामपंचायत आणि आणि कलापंढरी संस्थेच्या मार्गदर्शनाखाली पानगावची ग्रामपंचायत ही बाल स्नेही करण्यासाठी ग्रामपंचायत पुढाकार घेणार असल्याचे प्रतिपादन पानगाव येथे आयोजीत करण्यात आलेल्या ग्राम बाल संरक्षण समिती प्रशिक्षणात समिती तथा ग्रामपंचायतचे सदस्य कुलभूषण संपत्ते यांनी प्रतिपादन केले.

रेणापूर तालूक्यातील पानगाव येथे ग्रामपंचायत कार्यालय पानगाव आणि कलापंढरी संस्थेच्या



पुढाकारातून ग्राम बाल संरक्षण समिती सदस्यांचे प्रशिक्षण ३० जानेवारी रोजी आयोजीत करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी उपसरपंच प्रमिला वाघमारे होत्या.

यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटन ग्रामपंचायत सदस्या रंजना गालफाडे यांनी केले.

तर ग्रामपंचायत सदस्य तथा ग्राम बाल संरक्षण समिती सदस्य कुलभूषण संपत्ते यांची प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती होती. तर प्रशिक्षक म्हणून कलापंढरीचे समन्वयक शिवदर्शन सदाकाळे उपस्थीत होते.

पुढे बोलताना कुलभूषण संपत्ते म्हणाले की, पानगावची बाल संरक्षण समिती ही बालकांच्या प्रश्नावर काम करणारी राज्यात प्रथम क्रमांकाची समिती आसून बालकांचे अनेक प्रश्न या समितीने गावातील नाही तर संपूर्ण लातूर जिल्ह्यातील अनेक ठिकाणची कार्य केली आहेत. ही समिती सक्रीय झाली. आता गाव बालस्नेही करण्यासाठी तसेच ग्रामपंचायत बालस्नेही करण्यासाठी ग्रामपंचायत पुढाकार घेणार असून गाव बालविवाह, बाल मजूरी मुक्त करण्यासाठी आदीसह बालस्नेही गाव करण्यासाठी ग्रामपंचायत पुढाकार घेऊन पानगावच नाही तर परीसरातील गावात जाऊन ग्राम बाल संरक्षण समित्या सक्रीय करण्याचे काम करणार असून इतरही गावातील बालकांचे प्रश्न गावातच सुटले पाहिजेत आशा प्रकारे कार्य पानगावची ग्राम बाल संरक्षण समिती पुढाकार घेणार असल्याचे प्रतिपादन कुलभूषण संपत्ते यांनी केले. या प्रशिक्षणाला गोविंदनगर, भंडारवाडी, मुसळेवाडी, फावडेवाडी तसेच पानगाव येथील ग्राम बाल संरक्षण समितीचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन मधुकर गालफाडे यांनी केली तर आभार सुप्रिया गोरे यांनी मानले.

लातूर
दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# जिल्ह्यात 'जीबीएस'चे दोन संशयित रुग्ण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जानेवारी -** गॅलन बेरि सिंड्रोमची (जीबीएस) लागण झालेले दोन संशयित रुग्ण आढळून आले असून, त्यांच्यावर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हे रुग्ण सोमवारी आढळले असून, ते धोक्याबाहेर आहेत, अशी माहिती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधीष्ठाता डॉ. उदय मोहिते यांनी दिली.

'जीबीएस'ची लागण झालेल्या रुग्णापासून इतरांना कोणताच त्रास अथवा संसर्ग होत नाही. शिळे अन्न, अस्वच्छ ठिकाणी खाणे, घाणीशी संबंध आल्यास 'जीबीएस'चा प्रादुर्भाव होतो. रुग्णास मळमळ होणे, ताप येणे, डोकेदुखी, दम लागणे, श्वास घेण्यास त्रास होणे, अशी लक्षणे दिसतात. लागण झाल्यास पाणी उकळून पिणे, ताजे अन्न खाणे, सतत हात धुणे, असे उपाय करावेत. 'जीबीएस' रुग्णाची रिकव्हरी लवकर होत नाही. रुग्णाच्या प्रतिकारशक्तीवर, तंदुरुस्तीवर ते अवलंबून आहे. दोन्ही रुग्ण लातूर जिल्ह्यातील असून, 'जीबीएस'ची लागण झाल्यास रुग्णालयाच्या स्वतंत्र वॉर्डात उपचार घ्यावेत, असे आवाहन अधीष्ठाता डॉ. मोहिते यांनी केले आहे. 'जीबीएस'ची लागण झालेल्या रुग्णांसाठी स्वतंत्र वॉर्ड तयार ठेवला असून, गरज भासल्यास पाच व्हेंटिलेटर नागरिकांसाठी तर एक लहान मुलासाठी असे सहा व्हेंटिलेटर सज्ज ठेवले आहेत. गोळ्या, औषधी मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. परिस्थिती नियंत्रणात आहे. नागरिकांनी घाबरू नये, असे आवाहन डॉ. मोहिते यांनी केले आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...

### ज्ञानेश्वर विद्यालयाचा गौरव

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जानेवारी -** लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या कालावधीमध्ये स्वीप अंतर्गत विविध उपक्रम राबवून उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल ज्ञानेश्वर विद्यालयाचा गौरव करण्यात आला.

दयानंद शिक्षण संस्थेच्या सभागृहात जिल्हाधिकारी कार्यालय तसेच दयानंद कला महाविद्यालय आणि निवडणूक साक्षरता मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलिस अधीक्षक सोमय्य मुंडे, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, उपविभागीय अधिकारी रोहिणी नरहे, अतुल देऊळगावकर यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. यावेळी ज्ञानेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय मलवाडे यांचा सत्कार जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ज्ञानेश्वर विद्यालयाचे उपमुख्याध्यापक माधव शिरसागर, पर्यवेक्षक हणमंत बैनगिरे, पूनम पाटील यांच्यासह शाळेतील शिक्षक उपस्थित होते.

### कर्मयोगी पतसंस्थेतर्फे रक्तदान शिबीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जानेवारी -** लातूर येथील कर्मयोगी शिक्षक पतसंस्थेची विशेष सर्वसाधारण सभा ८ फेब्रुवारी रोजी दुपारी २.३० वाजता भालचंद्र ब्लड बँक येथे संस्थेचे चेअरमन मोहन हाके यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी विविध विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. तसेच रक्तदान शिबीर होणार असून, यावेळी चेअरमन मोहन हाके, माजी महापौर ॲड. दीपक सूळ हे उपस्थित राहणार आहेत.

सभेनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये जास्तीत जास्त सदस्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन चेअरमन मोहन हाके, सचिव सुधाकर मोरे यांनी केले आहे

### जिल्हाध्यक्षपदी नक्का यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जानेवारी -** अखिल भारत पद्मशाली संघम हैद्राबाद संलग्न मराठवाडा पद्मशाली महासभेच्या व्यापक बैठकीत लातूर जिल्ह्यातील सर्व प्रौढ महिला व युवक तालुकाध्यक्षांची निवड करण्यात आली. लातूर जिल्हाध्यक्षपदी श्रीनिवास नक्का तर युवक जिल्हाध्यक्षपदी शिवचंद्र मलफेदवार आणि महिला जिल्हाध्यक्षपदी निर्मलाताई तम्मलवाड यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

रविवारी शिरूर ताजबंद येथील महादेव मंदिर मंगल कार्यालयात नरसिंग मंतलवार यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.

या बैठकीस प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा पद्मशाली युवक संघटनेचे अध्यक्ष गोविंदसेठ कोकुलवार, संग्राम निलपत्रेवार, भारत गठेवार, ज्येष्ठ मार्गदर्शक बाबुराव उडतेवार, शिवाजी पिचकेवार हे होते. लातूर तालुकाध्यक्षपदी व्यंकटराव सुंकरवार, युवक अध्यक्षपदी राम गुडेवार, महिला अध्यक्षपदी सौं. ज्योतीताई अडबलवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

### 'बसवेश्वर'च्या गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जानेवारी -** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे नुकताच संपन्न झालेल्या दीक्षांत समारंभामध्ये महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील गुणवंताचा सत्कार करण्यात आला.

तत्त्वज्ञान विभागातील साक्षी सूर्यवंशी हिला एम.ए. तत्त्वज्ञान विषयात विद्यापीठात सर्व प्रथम आल्याबद्दल तसेच समाजशास्त्र विभागातील एम.ए. द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी माने पूजा विद्यापीठांमध्ये मुलींमधून सर्वप्रथम आल्याबद्दल तसेच आंतर विद्यापीठिय क्रीडा स्पर्धेत विशेष प्राविण्य प्राप्त केल्याबद्दल ऋषभ वाघ खो- खो ,सागर गायकवाड खो- खो, ज्ञानेश्वर महानवर-कुस्ती या क्रीडा प्रकारात विशेष प्राविण्य प्राप्त केल्याबद्दल तसेच राष्ट्रीय युवक महोत्सवात लोकसंगीत या कलाप्रकारात सर्व द्वितीय पारितोषिक प्राप्त केल्याबद्दल महाविद्यालयाचे विद्यार्थी गणेश शिंदे व कैवल्य पांचाळ आदि सर्व विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह तसेच सन्मानपत्र देवून कुलगुरु डॉ. मनोहर चासकर याच्या हस्ते सुवर्ण पदक देवून सत्कार करण्यात आला. यावेळी विचारमंचावर विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

# जिल्हा वार्षिक योजनेचा ४९० कोटींचा प्रारुप आराखडा मंजूर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जानेवारी -** प्रत्येक गावामध्ये स्मशानभूमी असावी, यासाठी 'गाव तिथे स्मशानभूमी' मोहीम जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. यामध्ये पहिल्या टप्प्यात स्मशानभूमीसाठी जमीन उपलब्ध असलेल्या गावांची यादी तयार करून स्मशानभूमी बांधकामाचा प्रस्ताव सादर करावा. या कामांना जिल्हा नियोजन समितीमधून निधी देण्यात येईल. यासोबत ज्या गावांमध्ये जमीन उपलब्ध नाही, अशा गावांमध्ये भूसंपादनासह स्मशानभूमी बांधकामासाठी दुसऱ्या टप्प्यात निधी दिला जाईल. जिल्हा परिषद बांधकाम विभागाने बांधकामाचा आराखडा आणि प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिल्या.

#### ६८३ कोटींची अतिरिक्त मागणी

लातूर जिल्ह्यासाठी २०२५-२६ साठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत ३६१ कोटी २६ लाख रुपये, जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती घटक कार्यक्रम) अंतर्गत १२५ कोटी रुपये आणि जिल्हा वार्षिक योजना (आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना) अंतर्गत ४ कोटी ३ लाख रुपये अशा एकूण ४९० कोटी २९ लाख रुपयांच्या प्रारूप आराखड्याला बैठकीत मंजुरी देण्यात आली. २०२५-२६ साठी अंमलबजावणी यंत्रणांनी ६८२ कोटी ६८ लाख रुपयांची अतिरिक्त मागणी नोंदविली आहे.



जिल्हाधिकारी कार्यालयात गुरुवारी आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री भोसले बोलत होते. यावेळी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार अमित देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, पालक सचिव मनीषा म्हैसकर, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार विक्रम काळे हे दूरदृश्य प्रणालीद्वारे या बैठकीमध्ये सहभागी होते. जिल्हा वार्षिक योजनेतून प्रस्तावित कामे विहित कालावधीत पूर्ण करावीत. उपलब्ध निधीतून अधिकाधिक गुणवत्तापूर्ण आणि लोकोपयोगी कामे करून जिल्ह्याच्या विकासाला गती द्यावी. या कामांमध्ये कोणताही गैरप्रकार किंवा हयगय होणार नाही, याची दक्षता संबंधित विभाग प्रमुखांनी घ्यावी, अशा सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या.

जिल्ह्यातील विकासकामांना गती देण्यासाठी जिल्हा नियोजन समितीला जास्तीत जास्त प्राप्त करून घेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे पालकमंत्री भोसले यांनी सांगितले.

यावेळी लोकप्रतिनिधींनी सोयाबीन खरेदीसाठी कायमस्वरूपी व्यवस्था, रस्ते विकास, आरोग्य व्यवस्था, जलजीवन मिशन, सिंचन प्रकल्प व तलाव, बंधारे यांची दुरुस्ती, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये, प्रधानमंत्री पीक विमा योजना, जिल्हा रुग्णालय आदी विषय मांडले.

## स्त्री सन्मानार्थ रॅलीस प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जानेवारी -** लोकशाही उत्सव समितीच्या पुढाकाराने विविध सेवाभावी संस्था, सामाजिक कार्यकर्ते व महाविद्यालयीन तरुण-तरुणींनी स्त्री सन्मानार्थ स्त्री-पुरुष समानता या विषयावर संविधान रॅली काढली. या रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



लोकशाही उत्सव समितीतर्फे २६ ते ३० जानेवारी दरम्यान विविध उपक्रम शहरात राबवण्यात आले. गुरुवारी महात्मा गांधी स्मृतिदिनानिमित्त स्त्री सन्मानार्थ शहरातील विविध सामाजिक संघटनांच्या महिलांनी संविधान रॅलीचे आयोजन केले होते. यामध्ये नारी प्रबोधन मंच, सनराईज बहुउद्देशीय सामाजिक संस्था, सह्याद्री देवराई, राजर्षि शाहू महाविद्यालय, दयानंद विधी महाविद्यालय यांचा सहभाग होता.

स्त्रियांच्या सन्मानार्थ स्त्री-पुरुष समानतेच्या घोषणा देण्यात आल्या. स्मृतिदिनानिमित्त महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला अभिवादन करून महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिस्थळी अभिवादन करून संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.

या रॅलीत लोकशाही समितीच्या सुमती जगताप, नंदिनी पडिले, विधी महाविद्यालयाच्या ॲड. लता महाजन, सह्याद्री देवराईचे सुपर्ण जगताप, डॉ. गणेश गोमारे, भाई ॲड. उदय गवारे, अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे प्रदेश कार्याध्यक्ष माधव बावगे, शाहू महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. शिंदे, उत्तरेश्वर बिराजदार, पालिकेच्या पर्यावरण विभाग प्रमुख संमती म्हेत्रे, वृक्ष प्राधिकरणचे समाधान सूर्यवंशी, प्रा. दशरथ भिसे, डॉ. बी. आर. पाटील, प्राचार्य डॉ. कुसुम मोरे, कुसुम जाधव, अनुराधा देऊळगावकर, आकाश सोनकांबळे, कवयित्री नयन राजमाने, श्याम जैन यांच्यासह शेकडो विद्यार्थी रॅलीत सहभागी होते.

## अभिनेते चंद्रकांत काळे यांचे लातुरात अभिवाचन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जानेवारी -** विख्यात गायक, अभिनेते चंद्रकांत काळे पुन्हा एकदा लातुरात येत आहेत. २ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रतिभावंत साहित्यकार महेश एलकुंचवार यांच्या 'बिंदुनादकलातीत' या आत्मशोध घेणाऱ्या अभिजात लेखनाचे ते, अभिवाचन करणार आहेत.

'वाडा चिरेबंदी', 'मग्न तळ्याकाठी' व 'युगांत' या नाट्यत्रयीनंतर एलकुंचवार यांनी ललित निबंधांना नवे आयाम दिले. ललित हे केवळ करमणूक करणारी साहित्यरचना नाही. 'बिंदुनादकलातीत' हा कठोर आणि प्रसंगी अत्यंत निघृण असा आत्मशोध आहे. तसाच तो आपल्यासमोर धरलेला आरसाही आहे. दि. २ फेब्रुवारी (रविवार) संध्याकाळी ५.३० वाजता, श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या 'कस्तुर-कंचन सभागृहात सादर 'बिंदुनादकलातीत'च्या होणाऱ्या अभिवाचनास रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन स्वामी स्वामी रामानंदतीर्थ व्याखानमालेच्यावतीने करण्यात आले आहे.

### सेवानिवृत्तांना तीन टक्के वेतनवाढ द्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जानेवारी -** पेन्शन विक्रीची रक्कम परतफेड पंधरा वर्षे ऐवजी बारा वर्षे करण्यात यावी. तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना तीन टक्के वेतन वाढ देण्यात यावी, अशी मागणी मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्या वतीने मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे.

कोरोना काळातील १८ महिन्यांची थकीत वाढ, महागाई निर्देशांकानुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना तीन टक्के वेतन वाढ, अशी मागणी करण्यात आली. निवेदनावर प्रा. अनंत लांडगे, प्रा. एस. टी. मस्के, विजय श्रृंगारे, प्रा. एस. टी. चांदेगावकर, ए. बी. कांबळे, मोहन कांबळे, विनायक बोरीकर, पी.एस. कांबळे आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## आदर्श नागरिक घडवण्या मागे माता पालकांचा मोलाचा वाटा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जानेवारी -** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात मकर संक्रांत निमित्त माता पालक मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते भारतमाता व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संगीता शिंदे, प्रमुख पाहुण्या अरूणा कांदे, शिक्षक पालक संघाच्या उपाध्यक्षा अनुराधा दगडगुंडे, विद्यालयाच्या पर्यवेक्षिका श्रीमती राजश्री कुलकर्णी, श्रीमती अंजली निर्मळे, केशव शिशुवाटिका प्रधानाचार्या श्रीमती मंजुषा जोशी यांची उपस्थिती होती.



**केशवराज मा. विद्यालयात माता - पालक मेळावा**

याप्रसंगी प्रमुख वक्तत्या श्रीमती अरूणा कांदे यांनी वैचारिक वाणाच्या देवाण -घेवाणा निमित्त महिलांचा सन्मान करण्यासाठी हा हळदी कुंकवाचा कार्यक्रम दरवर्षी विद्यालयात साजरा केला जातो,याविषयी आनंद व्यक्त केला. स्त्री रत्न सावित्रीबाई फुले, माता जिजाऊ, रमाबाई, अहिल्याबाई, झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचा आदर्श घ्यावा असे मत व्यक्त केले. तंत्रज्ञानाच्या युगात महिला पालक म्हणून आपली जबाबदारी समजून घेऊन पाल्याला योग्य वळण लावणे आवश्यक आहे. माता पालकांनी आपल्या पाल्यांवर योग्य संस्कार करावे असे आवाहन केले.

अध्यक्षीय समारोपात श्रीमती संगीता शिंदे यांनी उत्तम विचाराने कुटुंबही सुधारतं व उत्तम राष्ट्रही निर्माण होतं असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय, स्वागत अर्चना ठोंबरे यांनी केले. वैयक्तिक गीत श्रीमती कांचन तोडकर यांनी म्हटले. आभार प्रदर्शन व सूत्रसंचालन श्रीमती मीरा चामवाड यांनी केले. श्रीमती शैला कुलकर्णी यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. या मेळाव्यात ६००माता पालकांनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक महेश कस्तुरे, यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षिका श्रीमती राजश्री कुलकर्णी, श्रीमती अंजली निर्मळे, कार्यक्रम प्रमुख श्रीमती रंजना साकोळे, सहप्रमुख श्रीमती मनीषा पाटील व व्यवस्थेतील सर्व शिक्षिकांनी परिश्रम घेतले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

### भरधाव दुचाकीची पाठीमागून धडक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जानेवारी -** बार्शी रोडवरून मोटारसायकलवर घराकडे जात असताना पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या अज्ञात दुचाकीने धडक दिल्याने फिर्यादी व फिर्यादीचा मित्र गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.

याबाबत सोमनाथ गायकवाड (रा. आर्वी गायरान) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात दुचाकी चालकाविरुद्ध एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तपास पोलिस हवालदार बिराजदार करीत आहेत. भरधाव वेगात पाठीमागून येऊन दुचाकीने फिर्यादीच्या दुचाकीला धडक दिली. यात फिर्यादीसह त्याचा मित्र गंभीर जखमी झाले. दुचाकीचेही नुकसान झाले, असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

## डायमंड वॉरिअर्सने पटकावले लातूर बॅडमिंटन लीगचे विजेतेपद



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जानेवारी -** लातूर बॅडमिंटन लीगच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विविध वयोगटातील बॅडमिंटन स्पर्धेचे विजेतेपद श्रीकांत हिरेमठ यांच्या डायमंड वॉरिअर्सने पटकावले आहे. आशिष हरिप्रसाद सोमाणी यांच्या संकल्पनेतून लातूर बॅडमिंटन लीग स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

प्रत्येक व्यक्तीने आपल्या शरीर सदृढतेकडे लक्ष देणे गरजेचे आहे. आरोग्य हीच खरी संपत्ती मानून ' हेल्थ इज वेल्थ ' हे ब्रीदवाक्य घेऊन सदर स्पर्धा लातूरच्या दयानंद महाविद्यालयाच्या प्रांगणातील इनडोअर स्टेडिअममध्ये घेण्यात आली. शनिवार आणि रविवारी ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेचे उदघाटन खा. डॉ. शिवाजी काळगे , पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. स्पर्धेपूर्वी जिल्हा क्रीडा संकुल ते इनडोअर स्टेडिअमपर्यंत रॅली काढण्यात आली . रॅलीमध्ये विविध स्तरातील मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

दोन आठवडे प्रत्येक शनिवार आणि रविवारी पार पडलेल्या या स्पर्धेसाठी एकूण ३०० बॅडमिंटन खेळाडूंनी नोंदणी केली होती. त्यामधून २०० खेळाडूंची स्पर्धेसाठी निवड करण्यात आली होती. स्पर्धेत वर्ष ३० ते ४०, ४१ ते ५० , ५१ ते ६० , ६१ ते ७० वर्ष वयोगटातील खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला. स्पर्धेचा अंतिम सामना श्रीकांत हिरेमठ यांच्या डायमंड वॉरियर्स आणि लक्ष्मीकांत कालिया यांच्या माहेश्वरी रॉयल्स या दोन संघात झाला. यामध्ये डायमंड वॉरिअर्सने विजेतेपद पटकावले. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ लातूर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष सतीश देशमुख, सचिव ॲड. आशिष बाजपायी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अनेकांनी परिश्रम घेतले.

## सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी उपाययोजना पुढे याव्यात

### आ. अमित देशमुख यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३१ जानेवारी -** मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनात देशाच्या, राज्याच्या आणि लातूरच्या अर्थव्यवस्थेवर महत्त्वपूर्ण चर्चा व्हावी. शिक्षण, उद्योग, व्यापार आणि विकास यांसारख्या अनेक विषयांवर अर्थशास्त्रज्ञ आपले विचार मांडून या अधिवेशनातून सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी उपाययोजना आणि सूचना पुढे येतील, असा आ.अमित देशमुख यांनी व्यक्त केला.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनाची लातुरात सुरुवात झाली असून या अधिवेशनाचा शुभारंभ सोहळा आ. देशमुख यांच्या उपस्थितीत पार पडला.



यावेळी बोलताना आ. देशमुख म्हणाले की, राज्य आणि देशभरातून उपस्थित राहिलेल्या अर्थशास्त्र अभ्यासकांचे करुन गतिमान पद्धतीने विकसित होत असलेल्या लातूरमध्ये हे अधिवेशन आयोजित केल्याबद्दल संस्थाचालकांचे आभार व्यक्त केले.

दयानंद शिक्षण संस्थेने लातूरात मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४७ व्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनाचे आयोजन केले आहे याचा मला मनस्वी आनंद आहे. अर्थशास्त्रात शास्त्राला अर्थ असतो अर्थाला देखील अर्थ असतो हे समजून घेण्यासाठी आम्ही या ठिकाणी आलो आहोत.

आज या ठिकाणी जगाचा, देशाचा, महाराष्ट्राचा तसेच लातूरच्या देखील अर्थशास्त्राचा उहापोह केला जाणार आहे. देशातील व राज्यातील अलीकडच्या आर्थिक व्यवस्थेवर आपणाला टिप्पणी आज नक्कीच करता येईल असे ते शेवटी म्हणाले.

यावेळी मेघनाथ देसाई, प्रो. डॉ.अनिलकुमार वावरे, परिषदेचे स्वागताध्यक्ष तथा दयानंद शिक्षण संस्था अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, प्रो.डॉ. अविनाश निकम, डॉ.मारोती तेगमपुरे, डॉ.राहुल म्होपरे, डॉ.बालाजी घुटे, दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड आदीसह मराठी अर्थशास्त्र परिषदेचे विविध पदाधिकारी, सदस्य, प्राध्यापक उपस्थित होते.